जुन्या

अप्रसिद्ध लावण्या

य. न. केळकर

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
[illegible] सदाशिव पेठ, [illegible]
[illegible] पुणे-४११ ०३०

जुन्या अप्रसिद्ध लावण्या

टीपा व अर्थासहित

संशोधक व संपादक

यशवन्त नरसिंह केळकर

मुद्रक :
भाऊ लक्ष्मणराव कोकाटे
हनुमान छापखाना,
७१८ सदाशिव पेठ, पुणें ३०.

प्रकाशक :
अरुण सदाशिव कोकाटे
हनुमान प्रकाशन, पुणें ३०.

मूल्य ५ रुपये

प्रस्तावना

गोविंदराव साळी हा बहुजन समाजाचा एक फार मोठा लावणीकार म्हणून प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रांत वरच्या स्तरांत जसे कीर्तनकार, त्याप्रमाणें खालच्या बहुजन समाजांतील स्तरांत भेदिक लावणीकार पसरलेले होते. यापैकीं साताऱ्या शिलारखाने, शिदू राऊळ, नागेश इत्यादि कांहीं कांहीं लावणीकार शाहीर ' वरदी पुरुष ' म्हणून ख्याती पावले होते; त्यापैकींच जुन्नर परिसरांतील हा गोविंदराव साळी होय. याला देवाचा साक्षात्कार झालेला होता, असें लोक मानीत. किंबहुना एका लावणींत असें स्वच्छच म्हटलें आहे, " गोविंदराव साळी याचा स्वामी समर्थ ! प्रसन्न झाले मारुती कडोकडी करितो कवित्व । " आणखी एका तुकांत " बोले गोविंदराव साळी जुन्नरकर ज्ञानी । " असें म्हटलें आहे. कोणाच्या घरांत कांहीं बाधा किंवा पिशाच्च पीडा होऊं लागली तर त्या घरांत गोविंदरावी लावण्यांचा तमाशा करावा म्हणजे ती पीडा नाहींशी होते अशी अद्यापहि जुन्नरदेशीं लोकसमजूत आहे.

हा गोविंदराव भगवत्भक्त संत कवि होता, तरी आपला पिढीजात कोष्टयाचा धंदा त्यानें सोडला नव्हता. कबीर हा पिढीजात विणकर, तो शेले विणता विणतांच आपले दोहे किंवा कवनें रची. प्रसिद्ध परशराम शाहीर हा धंद्यानें शिंपी. तो शिंप्याचें काम करतां करतांच लावण्या रची. दुसऱ्या बाजीरावांनीं त्याला इनाम गांव देण्याची इच्छा दर्शविली तेव्हां त्यानें लावणींतच " सुई दोऱ्याला हयात असो द्या हाची इनाम मोकासा " असें

उत्तर देऊन इनाम नाकारलें होतें. गोविंदरावहि स्वतःच लावणीच्या शेवटीं सांगतो. " तो गाविदराव साळी गातो छंद । हो विणता विणता सहज करी कटिबंध । "

पुणें प्रातांत साताप्पा, धनवटांत परशराम, त्याप्रमाणें जुन्नर प्रातांत गोविंदराव साळ्याचा अस्कारा होता. " साता गवळी कवि पुण्याचा । दक्षिणदेशीं घोशा त्याचा । " किंवा " गाती परशराम वावीवाले छंद चवभासी । चहुंकडे ठसा आहे महशूर धनवट देशीं । " त्या-प्रमाणें " गोविंदराव करि शाहिरी शहर जुन्नरीं । गड शिवाबाई शिवनेरी । " अशी या गोविंदराव साळ्याची प्रख्याती होती. " गोविंदराव साळी जुन्नरचा कवि तो भारी । रोज येकूणता उतारी । बोलणें शास्त्र अधारी । " अशी त्याची महती तत्कालीन शाहीर गात. शाहीरांच्या ज्या नमनाच्या किंवा मुजऱ्याच्या लावण्या आहेत; त्यांत गोविंदरावाचा आवर्जुन उल्लेख असतो. उदाहरणार्थ सीताराम शाहीराच्या लावणींतील हा उल्लेख पहा :— शाली फकीर कलगीवाला । मुजरा मेरा मनींवकरकु । दलभिड कमलीका गावन । मुजरा मेरा रणभिडेकु । पारनेरमें लालमनु कवि । मुजरा मेरा तुकन-गीरकू । वाकलगड कलगीवाला । मुजरा मरा केशव नथुकु । राम राम मावजी ठाकूरकू । सलाम साहेबू कविकू । मेरा सलाम मलिक फांदिकु । जुन्नरमें गोविंदरावकु ।

शाहीर मंडळांत त्याला केवढा मान दिला जात असे तें कलगी-तुऱ्याचा लग्नाच्या रूपकात्मक लावणीवरून स्पष्ट होईल. त्या लाव-णींत या लग्नाच्या खटपटीला आणि मंडपशोभेला ज्या तमासगीर

फडकरी शाहीरांना नांवें सांगून आमंत्रण दिलें आहे, त्यांत म्हटलें आहे. – " नागेशाचे घरीं कलगि उपवर । तिला करीनां कोणि, राहिली थोर ॥ नवरीच्या कारभाऱ्यानं केला विचार । द्यावी नेऊन तुऱ्यास तो धुरंधर ॥ लग्नाचें साहित्य करा म्हणे रामदास । तमाम चिटया करा नागेशवळीस ॥ एक चिठ्ठी लिहून पाठवा खेडास । तेथील लक्षुमण साळी बिगार त्यास । चार फाटयाच्या मोळ्या हरी-पुरास । कवठ्याचा भवान्या बोलावा त्यास ॥ सातपुड्यांत (नात्यापुत्यांत ?) येमा शिंपी सांगा त्यास । उंची कापड घेऊन ये तूं लग्नास ॥ निघोऱ्यांत भीमा सोनार त्याला । सांगा काठ चौकडा घेऊन ये लग्नाला ॥ पुण्यांत गंगु हैबती बोलावा त्याला । आणि ताकिद करा सिदु राऊळाला । बाळा गंगु गोविंदा खबर पाठवा । तो शाअल्लीचा शिष्य दगडु बोलावा । **अवघ्यांचे कारभारी गोविंदराव मोकाशी । हरदासवळींचे शाहीर पहा दक्षिणदेशीं ॥"** या शाहीर मानकऱ्यांत " अवघ्यांचे कारभारी गोविंदराव मोकाशी " म्हणून गोविंदरावाला अग्रमान दिलेला आहे.

पण दुर्दैव असें कीं, या शाहीराचे विश्वसनीय जीवनचरित्र कांहींच उपलब्ध नाहीं. आहे तें लोकांस माहीत असलेलें आख्या-यिकावजा, परंपरेनें चालत आलेलेंच ! त्या माहितींत ऐतिहासिक सत्याचा भाग कांहीं थोडा असेलच, परंतु इतिहास लेखकाच्या साधनांच्या कसोटीस तो पूर्णपणें उतरणारा नाहीं, हे उघडच आहे. जी काय त्याच्यासंबंधीं माहिती मिळते ती अशी. हा गोविंदराव जातीचा साळी. आडनांव (भागवत.) याचा बाप गणोजी नांवाचा

होता. तो सत्पुरुष मानला जाई. त्याची समाधी ओतूर येथें वेशीचे बाहेरचे अंगाला अद्यापही दाखवितात. या गणोजीला भिवाजी नांवाचा पुत्र होता, तोही बापासारखाच मान्य पुरुष होता, त्याची समाधी जुन्नरास आहे. गणोजीचा दुसरा पुत्र जो होता तोच प्रस्तुत गोविंदराव शाहीर. तो नुसताच सत्पुरुषच नव्हता तर सत्कवीहि होता.

येवड्या जुजबी माहिती खेरीज अधिक विश्वसनीय माहिती नाहीं. तदभावीं त्याच्या लावण्यांतून माहितीचे कांहीं कण मिळतात कीं काय म्हणून शोधलें तरी विशेष कांहीं हातीं लागत नाहीं. फक्त साक्षात् त्याचे शिष्य असलेल्या किंवा त्याच्या शिष्य परंपरेंत लावणीकार किंवा तमासगीर म्हणून गाजलेल्या शिष्य-प्रशिष्यांचीं नांवें तेवढी मिळतात. ती अशी मल्हारी, बहिरू, विठूआबा, संतु लक्षुमण, राणू देवजी, बापू, संतु, राघू भिमा मल्हारी, राघू यमाजी, राणू न्हावी, भवानी रामचंद्र, गंगाराम शिवराम, (महिपत—आदा करणारा.) इत्यादि. पण तीसुद्धां नांवेंच ! खुद्द गोविंदरावांच्या चरित्राविषयीं अधिक कांहीं कळत नाहीं.

विनायकराव भाव्यांनीं या गोविंदराव साळ्याच्या धौशा नामक एका कवि शिष्याची माहिती दिली आहे. हा धौशा दत्तानुयायी महानुभाव पंथी होता. हा नेवासे प्रांतीं रहात असे. त्याचा फड पांचाळेश्वरास होता, व तिकडे त्याची शिष्य शाखाहि आहे, वगैरे माहिती दिली आहे. खुद्द गोविंदरावासंबंधीं भाव्यांनीं असें म्हटलें आहे. — " गोविंदरावाचाच पुढें रामचंद्र, भिमाजी वगैरे वंश वाढला. " पण येथेंही पंचाईतच आहे. कारण हे रामचंद्र व भिमाजी

त्याचे साक्षात् पुत्र किंवा नातू होते कीं, गुरुशिष्य परंपरेप्रमाणें ते होते, याचा संदेह पडतो.

विनायकराव भाव्यांनीं १९१९ सालीं महाराष्ट्र सारस्वतांत असें म्हटलें होतें कीं, " या गोविंद शाहीराची शेंकडो कवनें अजून मिळण्यासारखी आहेत. " सुदैवानें या गोविंदराव शाहीराची बरी-चशी कविता मला उपलब्ध झाली. सुमारें ४०–५० वर्षांपूर्वीं शाहीरी वाङ्मयाचा मी अभ्यास करण्यास सुरुवात केली. तेव्हां केलेल्या संशोधनांत या शाहीराच्या लावण्यांचें बाड मला मिळालें होतें. आतांपर्यंत मराठी लावण्यांचे जे विविध लहान मोठे संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत, त्यांची संख्या निदान ३०–४० इतकी आहे. त्या संग्रहांतून शोध घेतला असतां, ५–१० च गोविंदरावांच्या लावण्या छापलेल्या आढळतात. १९५६ सालीं मी ' अंधारांतील लावण्या ' म्हणून जो ३०–४० अप्रसिद्ध शाहीरांच्या लावण्यांचा संग्रह प्रसिद्ध केला, त्यांत मला उपलब्ध झालेल्या गोविंदरावी बाडां-तील ४–५ लावण्या नमुन्याकरितां छापल्या होत्या. छापलेली अशी गोविंदरावी लावण्यांची इतकीच गणती; आणि म्हणूनच मी आतां प्रसिद्ध करीत असलेल्या गोविंदरावी लावण्यांच्या बाडाची अपूर्वाई व महती.

प्रस्तुत संग्रहांत उतरून ठेवलेल्या सर्वच लावण्या एकट्या गोविंदरावाच्या आहेत, असे मात्र नाहीं, तर त्याच्या फडांत जे शिष्य-प्रशिष्य लावणीकार शाहीर झाले, त्यांच्याहि लावण्या त्यांत आहेत. या बाडांत जे एक-दोन ऐतिहासिक पोवाडे मला आढळले त्यांचा

समावेश मी माझ्या ऐतिहासिक पोवाडे खंड २--३ मध्यें केलाच आहे. बाकी ज्या सुमारें साठ पासष्ट लावण्या प्रस्तुत संग्रहांत समाविष्ट झाल्या आहेत. त्यांत ईशस्तुतीपर, भेदिक, अध्यात्मपर, वेदांतपर, उपदेशपर, सामाजिक स्थितीवर्णनपर, पौराणिक कथा व लोककथा सांगणाऱ्या व शृंगारिक अशी विविधता आहे. अर्थात शृंगारिक लावण्यांचा हिस्सा सर्वांत मोठा. मला उपलब्ध झालेल्या गोविंदरावी लावण्याच्या बाडांतील कांहीं थोडया निवडून त्यांचा या संग्रहांत समावेश केला आहे.

बहुधा प्रत्येक मराठी शाहीरानें हिंदी भार्षेतही बऱ्याच लावण्या रचलेल्या असतातच. तशा या गोविंदरावी बाडांतही आहेत. मी त्या वगळल्या आहेत. अलीकडे पी. एच. डी. च्या परीक्षेसाठीं हिंदी भार्षेतील मराठी शाहीरांनीं रचलेल्या लावण्यांचा संग्रह करणारे एक दोघे मला भेटले होते. अशा हिंदीभाषापारंगत असलेल्या विद्वान अभ्यासकांनीं उपलब्ध सर्व मराठी शाहीरांच्या हिंदी लावण्यांचा एकत्र संग्रह करून छापला तर ते एक मोठे उपयुक्त काम ठरेल.

— य. न. केळकर

१।८।१९७७

जुन्या अप्रसिद्ध लावण्या

लावणी १

एक दास्य वर हरी, त्याचे दंदी दुस्मान काय करी ? ॥ धृ ॥
हरिश्चंद्राला विश्वामित्रानं केले नाना विघ्न ॥
मोल घेऊन विकले तिघेजण काशीखंडा नेऊन ॥
सत्वासाठीं पावले श्रीहरी, रक्षी परोपरी ॥
त्याचे दंदी दुस्मान काय करी ? ॥ १ ॥
दुर्योधन छळी पांडवाला, देव त्याचे वशिला ॥
विष घातले हो भीमाला, दुसरा उपाय केला ॥
त्यासी रक्षिले लाक्षागृहीं नेले पाताळविवरीं ॥
त्याचे दंदी दुस्मान काय करी ? ॥ २ ॥
प्रल्हादाचा पिता महाबळी नेऊन बुडविले जळीं ॥
लोटला पर्वतातळीं, जाळुनया करा होळी ॥
विषाचे भोजन वाढी सुंदरी, ते अमृतापरी ! ॥
त्याचे दंदी दुस्मान काय करी ? ॥ ३ ॥
बोले गोविंदराव गायन, पदरी असावी पुण्यं ॥
ज्याचे पाठीसी नारायण, पड्ड देइना उणं ॥
यश अपेश त्याचे अक्षरी नवनीत निर्भरी
त्याचे दंदी दुस्मान काय करी ? ॥ ४ ॥

लावणी २

चैतन्य माया सत्ता शिवासी म्हणे ‘ ऐकाहो त्रिपुरारी । माझी विनंती अवधारी ॥ धृ ॥ चवथे दिवशी रुतुवंती होतसे हो मृगनयना । रज समावील कमळणा । कोण्या तिथीला कोण समायेल सुलक्षणा कुलक्षणा । हे सांगा पंचानना ” । शूलपाणी म्हणे । ‘ अग उभे ! मी सांगतो ऐकून ध्यावी तो हा गौरी । माझी विनंती ॥ १ ॥ प्रतिपदेचा हीन दिन । बिजेचा निबुधी होइल । तिजेचा कारीयात राहेल ? ॥ चतुर्थीचा परद्वारी । पंचमीचा अमुल । फार उपकार करी । षष्ठीचा तो चंचळ चित्तीं होईल । मोठा व्यापारी । माझी विनति ॥२॥ सप्तमीचा रीतवंत राहाळसाहाळ तो मोठा । अष्टमीचा करंटा । नव-मीचा तो ×× होईल । दशमीचा तो बरवंटा कारभारी । येकादसीला जो समायेल तो मुक्तीचा अधिकारी । माझी विनंति ॥ ३ ॥ द्वादसीला जो समायेल, करोल । वडिलाची कीर्त । त्रयोदसी चतुर्दशीचा महा-क्षत्रिय, वैरी थरथर कांपत । पुनवे तस्कर (तशेकर) होत । पंधरा तिथींतुन सांगितल्या ऐकुन ध्या तो वागूवरी ! । माझी विनंती अवधारी ॥ ४ ॥ चैतन्य माया तन्मय झाली धन्य धन्य चंद्रमौळी । चरणीं लागी शैल्या बाळी । गोविंदराव कवीगुणी तो जात कवीची ती साळी । पाहे गर्भावळी । उत्तर ऐकुन जाब देता मग करी शाहिरी ॥ ४ ॥

लावणी ३

कां झिडकाउन टाकितां, पदर मी धरते । तुम्ही बसा बसा राजसा विनंती करिते ॥ धृ० ॥ चतुरांचे शिरा मनीं म्हणविता ज्ञाते । जाणुन करिते प्रश्ना सख्या सुज्ञाते । घाला पदरीं, वंदीन शिरी आज्ञा ते । (चाल) अन्याय नसून कांहीं हो स्वामी । काय म्हणून रुसून बसता जी । नेमांत असुन पहा मी हो तुम्ही । झिडझिडकाउन देतां जी । एकांतीं बसुन धामीं हो या मी स्वामी । चरणीं ठिवते माथा जी । (चाल)

वंर्जुन जातां धरिला शेला । जाउ न दे बहु आग्रह केला । म्लान वदन मुखचंद्र सुकला, मान करा मम प्राण भुकेला । म्लान वदन मुख जी । (चाल) मी दासी कुब्जेपरी, तूं श्रीहरी । वचनाच्या तर्का धरी । यावे मथुरापुरीं पावन करो । मज दीनातें उद्धरी. तूं शंकर मी गौरी वनाभीतरीं । भिल्लीण होइन मी खरी । तुम्ही आवले मी तरी । बैसा वरी सागरीं तरते । मनपवनावर शीड । द्याहो, चालले भरतें । कां झिडकाउन इ० ॥ १ ॥ परतो सर हो, नको मज स्पर्श । अंतरांत अंतर व्यर्थच वर वर हास्य । (चाल) तुम्ही स्त्रिया कामस्वार्थी हो अर्थी । नाहीं जाणत परमार्थ । होउन या भारथी हो प्रार्थी । लेपुन या वर भारत जी । (चाल) आम्ही जाणितले हितगुज सारे । तुझिया संगामुळे घडे अनाचार । काय स्त्रिया प्राण भ्रतार । प्राण गेल्या कुडी न ये बराबर । काय या स्त्रिया जीं । (चाल) तैशा तुम्ही सुंदरी ! प्रीत पळभरी लाऊन शेवटीं दुरी बहुतास घातले भरी । या सृष्टीवरी । प्रीतीची रीत नाहीं बरी । अंतीं जातील या कशा ? कमया तुझी वरवरते । आम्ही पंछी मुशाफर मुलुखीचे फिरते । कां झिडकाउन इ० ॥ २ ॥ पतिव्रता जशी दमयंती कीर्त तिही लोकां । नळ वरून तिनें । धिक्कारिले सुरलोकां । तिजलाही टाकिले वनीं पुण्यश्लोका । तैसें मजला किलवाणी दाविता लोका । (चाल) लाउनि प्रीत दावा हो कोण । काय म्हणुन उडविली जी । जीवीची खुण । समजावी हो जाण । भावामधिं कुढविता जी । चरणाची करीन सेवा हो येव्हा कुणीकडे धुडविता जी । (चाल) अमृतवर्षा रोहिणीकांता । वनस्पतीवत रत येकांता । नका नका मज जैशी शकुंतला । वनीं वरूनिया कळविले मे कांता । नका नका मज जी । (चाल) तैसें कुशळा कामिनी लग्न लाउनी । प्रसवली पुत्र मेदिनी जसा दिनमणी । आणिक राजभुवनी राजा म्हणे जाये इथुनी । आलिस कोठुनि । तेव्हां गगनीं झाली ध्वनी । स्त्रिया न पुत्र तुझा नक

धरू जुदाभात्र औरते । तद्वत अंतर शुद्ध जाण विषयावरते । कां झिडकाउन इ० ॥ ३ ॥ गुणवर धनगुणसंपन्न सगुण गुण मित्रा । चुकल्यास मार्ग दाखवी सूज्ञ सुमित्रा । नाम हृदयआकाशी प्रकाश कीजे मित्रा । तम नाशुन शिक्षा करावी विशेष तूं मित्रा । (चाल) संशय मनींचा सोडा हो, जोडा भगवंतानें घडला जी । प्रीतीचा कलह तोडा हो । गोडी गोष्टीनें मोहो जडला जी । भांडार आतां फोडा हो । झोडा जी । नौबत, झेंडा चढवा जी । (चाल) जानपुरी येनें बरे बसविले यमाजीपंतालागी फसविले । स्वामीनीं वर वर जरी रुसविले अंतर्यामीं संगी रंगी हसविले स्वामीनीं वरवरुनी ।(चाल) सुखे शेज पलंगावरी मज धरी । आनंदें क्रीडा करी । धनवित्तासी नाहीं उरी, शरकरा क्षीरीं अधिक अधिक माधुरी । गोविंदराव करी शाहिरी । शेहर जुन्नरीं गड शिवाबाई शिवनेरी । मल्हारी कवि जडी, बहेरूचे गडीगुनिजन सुरते । विठु आबा संतु लक्षुमन करती शर्त. कां झिडकाउनी ॥ ४ ॥

लावणी ४

हिनवर बिजवर दोघीजणी राव बसून एकांतीं । सुखदु:खाच्या गोष्टी एकमेकीला सांगती ॥ धृ ॥ हिनवर म्हणे ' धाकुटेपणी केलें माझें लगनं ! आनंद झाला मोठा हुंडा दिला मायबापानं । मुळ उपाध्ये गुरु भट भिक्षुक ब्राह्मण । वर पहाया पाठविले घरचे विश्वासुक म्हणून । शेले पागुटे जोडे । नाहीं पाहिले वराकडे । त्याचे जिवा नाहक रडे । वरण-भात झाला अंतीं ॥ १ ॥ बिजवराची कांता म्हणे ऐक सुंदरी । माय बापानीं बरं केलं आपलं साजणी । माझी गोर गोई दिली नदीमधीं ढकलुनी । साठ वर्साचा नवरा काय पाहिला चांडाळांनीं । (चाल) मुठ गार केली । पुढें येताच्चि रांडकी झाली । कशी माझी गोर गोयेली । माझी जाती भर नवती ॥ २ ॥ हिनवराची म्हणे ग याचो भुई ग लहान । दिवसा पुरला तरी ग ठावी नाहीं शानपन । विटीदांडू भवरे

चेंडू खेळावर मन । माय बापाचा लाडका मोठे खाय्यावर लक्षण । (चाल) कधीं धरिल ग सोई । माझा वारा पडु ना देई । त्यासी शिकविती सासूबाई । रात्रंदिवस पाळती ॥ ३ ॥ बिजवराची कांता म्हणे ऐक सुंदरी । बहु आनंदें शेज पलंगावरी वाकला देठीं खाकत खोकत येऊनशेनी पडे सेजेवरी । हात पाय दडपिता निजुन राहिला अघोरी । (चाल) मनचे मनिं तरमळी झाली सर्वांगाची होळी । जिवनाविण जैशीं मासोळी । अंगाला किति लाऊ माती ॥ ४ ॥ हिन-वराचीला नणंदा म्हणती मत्सरानं । रांड ! तुला काय होतं ? आमचे मोडेल भावंड । मायबाप खालवर पाहती गोरमोरं तोंड । कधिं ग उ ज र ना, उरावर बसली बळें धोंड । (चाल) असे बोलती शद्ब, ह्रदय फाटुन दोन भाग माझें उरले अर्धे अंग, आतां मी रुसुं कोणा-वरती ? ॥ ५ ॥ बिजवराची म्हणे ग तुजला आहे भरोसा । आता ग नाहीं पुढें होईल वर्सा दो वर्सा । माझा शिजला भात, तिसरा पाहार दिवस जैसा । पौर्णिमेचा, पूर्ण कळा नित पावती नाशा । (चाल) तुझा वर कोवळा । बीजेचा चंद्र चढती कळा । हात लावी ती कपाळा किती सोसू जाच तीं ॥ ६ ॥ सारख्या न सारख्या परंतु दोहींची गांठ । नदी धुयाला जाती त्यांची नित होती भेट । येकीपरिस येक सुंदरा रूप बरबंट । विजा जशा चमकती घडोघडी करति नवा थाट । (चाल) जशा फुलल्या कमळणी । जशा रसीं भरल्या निंबोणी । ऐशा दोघीजणी पद्मिणी । गोविंदराव गुण गाती । हिनवर बिजवर दोघीजणीं राव बसून येकांतीं ॥ ७ ॥

लावणी ५

सभा चतुरहो आयका कथा बत्तिस सिंव्हासनी । राजा भोजाजवळ पुतळी सांगतसे कहाणी ॥ ध्रु ॥ पद्मावती नगर शहर होते गुलजार । पद्मसिंग राजा त्यावर आले परचक्र । आंगें बळवंत राजा होता रणशूर ।

रणखांब रोऊन युद्ध केले घनघोर (चाल) युद्धि राजा पडला । त्याचा पहा मोड झाला । सैन्यसहीत बुडाला । वेढा नगराला पडाला । लुटून केला फन्ना, आनखी झाली धुळधाणी ॥१॥ त्या राजाची राणी कन्या वैतागें करून । रानभरी झाल्या, हिंडती वन उपवन । अन्न ऊदक मिळेना मनामधीं कष्टी होऊन । आल्या एका नगरा, उतरल्या बाग पाहून । (चाल) पत्रें पुष्पें फळें अपार फुळले तरुवर । शिवालय होतें सुंदर । त्याच्या पुढें एक विहीर । विश्रांति पावल्या तेथें बसल्या जाऊन ॥ २ ॥ त्या नगराचें नांव बागानी व्हते मनपूर । मनसंतोष राजा, त्याचा असे मान्य कुमर । आले बागाजवळ दिस होता तिसरा प्रहर । मार्ग चालता त्यानें देखिलें एक विचित्र । (चाल) त्या मायलेकींची वाटेनं वठली पाऊलं । एक लहान, एक मोठालं । ऐसें कौतुक देखिल । पिता पुत्रालागी काय बोलतसे वचनीं ॥ ३ ॥ पुत्र म्हणे या वाटेनें गेल्या त्या बरवंटा । एकीचा पद लहान एकीचा पद मोठा । पिता म्हणे जिचे मोठे पाऊल तो माझा वाटा । पुत्र म्हणे मी तीच घेईन जिचा पद धाकुटा । (चाल) आले बागामधीं ते हो पाहून सुंदर । जैशी आस्मानी तार । त्याचें झाकले नेतर । भुलुन गेले वेडे झाले रूप पाहूनी ॥ ४ ॥ रूप पाहून दोघीजणींचे बहुत आनंद झाला । विषयांध झाले, नाहीं विचार केला । पालखीं बैसऊन गेले आपल्या महाला । कन्येचें मोठे पाऊल, राव तिशी रत झाला ! । (चाल) कोणी, कोणाचे कोण नाहीं केला विचार । आनंदें रमती निर्भर । दोघीसी झाले दोन पुतर । नित येति खेळाया राजाचे राजभुवनीं ॥ ५ ॥ पुतळी म्हणे राजीया ऐक, ऐक. उत्तर । सांग नातें दोघांचें मग ये सिंव्हासनावर । चुलते पुतणे मामे भासे ? हा उकला वर । पिता पुत्र त्या मायलेकी यांचा विस्तार । गोविंदराव साळी जुन्नरचा कवि तो भारी । रोज येकणुकता उतारी । बोलणे शास्त्र आधारी । पाया वाचून व्यर्थ बोलणे, शिणवावी वाणी ॥ ६ ॥

लावणी ६

रावजी मान करा, कर जोडी सुंदरा । लष्करासी जाऊ नका सख्या दिलभरा ॥ धृ ॥ एकच गर्दी झाली मुलखामधीं । तिथें नाहीं कोणाचे वालीं । हरपल्या बुधी । भर दिला कोणीं, हे सांगावे आधीं । सांगते पष्ट मी जाऊ देईना कधीं । (चाल) तुम्ही पहा विचारून पुरते आपले मनीं । त्या शहर पुण्यामधीं श्रीमंत साहेब धनी । धैर्याचे मेरु ते जैसें दिनमणी । भलीबुरी खबर सर्वांची घेती ऐकुनी । खातरजमा लोकांची समजावणी । नित होती. लढाया तोफा दणकावुनी । दंग्यामुळें दख्खन झाले चुरा । लष्करास जाऊ नका दिलभरा ॥ १ ॥ (चाल) होये तिकडे त्वां कां धरलेस घोडं । झाली गरबड । कुचाचि तातड । साहेबापुढें नित्य वाजती चवघड । तलवार करितील फंदीफाकड । (चाल) आमचे जोडीचा गडी चाकरीवरी । नित होती लढाया, पडती कामावरी । आम्ही कसें रहावें निचिंत आपले घरीं ? । कंपूचा नाहीं भरवसा कपट अंतरीं । म्हणुन जिवावर उधारी न करी । मारु तलवारा हेत मनाचा खरा । लष्करासी इ० ॥ २ ॥ जीवलग प्राणी, ऐका मंजुळ वाणी । माझी बाळपणाची ज्यानी, जशि निंबोणी । तारुण्यपणीं ध्यावी हौस पुरवुनी । लाऊन माया मशी कां जातां टाकूनी घाई । (चाल) आग लगो मुलखगिरी जाऊ द्या जळुन । हरपळो फंदफतवा मशी आकळून । रावसाहेबाशीं पठाण राहीला मिळून । रयतीचा खराबा फार घेतले पिळून । अवकाळ प्रजन्य भलतीकुन येतो वळुन । कंपूनें लावल्या तोफा मोहरे ढळुन । पुण्यासभवते प्रळय मांडला सारा । लष्करासी इ० ॥ ३ ॥ सुंदर अबला समजावी सावळा । ऐशा वेळा नारी नको करूं आरथळा । झाला गोळा खड्या फौजेचा मेळा । मौजा सकळा मी पाहीन आपल्या डोळां । (चाल) त्या शहर पुण्यामधि झाली नाकेबंदी । आपले आपल्यामधीं फितुर अंदाधुंदी । आघाडीवर मानाजी फाकडे फंदी ।

तिकडून फिरंगी सैन्य पडे ते छंदी। गोविंदराव म्हणे कल्पना धरू नये जुदी। ईश्वर निवडील · क्षिरनीर हौसासंबंधी। लाऊन तुरा घरिं मौजा करा। लष्करास इ० ॥ ४ ॥

लावणी ७

निवा वेगळे नार अगोचर सांगे पतिला। करीन मी संसार. सवता वाटा घ्या आपला ॥ धृ ॥ नित्य उठुनिया कलह, आपुले भ्रतारास गांजी। "काहो तुमची शुद्ध गेली अक्कल? धरा मनीं। हरप्रकारें कंठले आजवर होत्या फुइजी। आतां मला सोसेना दिराभायाची कठिण मर्जी। पहिल्यापून ठाउके खुलवर करती भावोजी। तुला केले भिकारी। सासले आपआले पुंजी ॥ १ ॥ (चाल) थोरल्याचे कुमर उजवणें दोन चार। त्याची बाइल सिरजोर। करती आपलें बरं। तुझे काय होणार? । लोकांचे करूनिया कर्ज। शेवटीं बुडविती तुजला। धरा अशामधिं सोई." कजिया हवा कशाला ॥ १ ॥ "अग रांडे घरफोडे! बरी ग दिसतीस बाजिंदी। दुष्टच अंतरीं अमंगळ तुझी बुद्धी। स्त्रीबुद्धी प्रलयंगता उदंड ठकले कुबुद्धी। ही शिक्षा वढो लागु नये रांडेचे छंदी। पाटील-कीचें वतन, उणें पाहती दुष्मान दंदी। कुळीवंता कज्या काय नष्टच भाइबंदी। (चाल) थोरला भाऊ जाणा तो बापासमान। मी त्याचे स्वाधीन। सांगेल तैस राहणं। काय जुदे निघुनशान। तीस पन्नासाजण। कंड्या लटक्या पुष्कळ गोष्टी भासवीशील मजला। तुझ्या मनामधिं कल्प, शद्व ठेविशील दुसऱ्याला" ॥ २ ॥ "खोटे न हे मी खरे सांगते ऐका पतिराया। भ्रांतीनें बोलता शेवटी कलह येइल माया। भावावंदामधिं कष्ट करीतां जातील हो वाया। हातपाय राहिल्यावर लागेल तोंडाकडे पहाया। म्हणुन सवती जोड करूनया, झिजवा या बाह्या। अंतीं कामा येईल पैसा बसूनया खाया। (चाल) आपलाले संसार। समजावे हित फार। मोठे मोठे मातबर। जे करिती कारभार राज्याचा विचार। मायेमधिं

गोवून जेष्ठ बुडविती कनिष्ठाला । सारींपाट खेळता वना धाडिलें पांडवाला "॥३॥ " फार दाखले कशास व्हावे रांड बहू बाल । संपदा न आपदा हे भोगणें कर्म आपुलें । कैकयिचे आज्ञेनें भरथें राज्य त्यागिलें । श्रीराम श्रेष्ठ म्हणुन चवदा वर्षें तप केलें । रावणासी मर्दुन सीता घेऊन घरा आले । राज्य करावें स्वामी ऐसें भरत भक्त बोले । (चाल) रामाचे आज्ञेंत । ते बंधू चालत । सापत्नपणें वर्त । कैकया जळे व्यर्थ, ते बंधु येकचित्त, ऐकु नये मातेचें, स्त्रीचा पाड काय ? आणिक भाऊपणामधिं अंतर पडला, लौकिक वाहोक " ॥ ४ ॥ " आतां तुम्हि ऐकाना, पर मी पुढें मौजा पाहीन । तुमचे तुम्हास बर दिसलं तर मी सारे साहीन । यांत अंतर असलं तर देवाची आण वाहीन । घरोघरीं पुसाहीं कीर्ती साइन गोविंदराव गुरुप्रसादें सुबुद्ध मी राहिन । " (चाल) सुंदरा म्हणे " राहू । गणगोतामधें पाहूं, परंतु तुम्ही भाऊ भाऊ, पुढें कलह नका करूं, " । राणु देवजी म्हणे । पुढिल हे नकळे कोणाला । कवि गातो मल्हार बहेरू रंगांत दंग झाला ॥ ५ ॥

लावणी ८

भ्रतार म्हणे ' सुंदरी तुझे प्रितीचे मला वेडे । तुला सोडून आतां गडे जाऊ कोणिकडे ? ' ॥ धृ ॥ नार म्हणे ' पतिराया माझी ऐकावी गोष्ट । घरबसल्या कैसा होइल शेवट । जावा चाकरी धरा, न सोडा अवघी खटपट । वर्षां सहा महिन्यां देव करील भेट " । सजण म्हणे " सुंदरी सांगतो ऐक बरवंट । दीर भाया सासऱ्या नाहीं वरिष्ठ । तारुण्यपणाचा भर तुझे भरज्वानिचा लोट । वाटेचा पाय पडेल आडवाटं । (चाल) जर कलंक लागला तर मग काय करू सुंदरी ? " । इतके ऐकुन हात जोडून नार विनंती करी । " शद्ध जैसें तीक्ष्ण बाण राव लागला उरीं । (चाल) पतिव्रतेचा नेम जशी रामाची सीता सती । नळाची दमयंती हरीचंद्राची तारामती । अत्रीची अनुसया सदाशिवाची पार्वती । तशीच

तुमची प्रिया मी कुळीवंताची म्हणवती । आणा फुलें तोडुन । तुम्हांला कां पडले कोडं । शिरीं लाऊन तुरा मग जावे भलतिकडं " । भ्रतार म्हणे सुंदरी इ० ॥ १ ॥ " ऐका ऐका स्वामी आर्जि करते तुम्हां । हातीं घेऊन करंडी जाहो फुलाला " । नारीच्या वचनावर भ्रतार बागामधिं गेला । तोडुन पुष्पें घेऊन घरासी आला । चतुर नारीनें आपल्या हातें तुरा करून दिला । " लाउन शिरीं मग जाहो चाकरिला । मी पतिव्रता प्रिया जाण ऐशि क्रियानेम केला । परपुरुष पित्याबंधुवत् मनला । (चाल) हा पुरुषार्थ सिद्धिस नेइल माझा परमेश्वर । तुरा नाहीं सुकणार । असाच राहील शिरावर । पतिव्रतेची खूण तुम्ही समजावी निरंतर । (चाल) खरी गोष्ट की खोटी साजणा कळो येईल आंतरी । " दिली तयारी करून जीन ठेविला घोड्यावरी । तीमहिन्याच्या वाटेवर जाऊन धरली चाकरी । एकांड्याची बोली घेतली रोजमुरा पदरीं । दोही वखता दरबारी येऊन बैसे उजविकडं । सारे लोक नित पाहाती याच्याकडं । भ्रतार म्हणे सुंदरीं इ० ॥ २ ॥ नटनाटक बावरा शिपाई चढते उमतीचा, मुखचंद्र जसा मकरंद पौर्णिमेचा । बांधि पाच हत्यारें समला तोडा ब्रिदाचा । आखंड शोभला तुरा मोगऱ्याचा । धनि म्हणे हा शिपाय मोठा हौशी तुऱ्याचा । फुलें कुठुन आणतो करा शोध याचा । शिपायासी पुसता आपण सांगे वर्तमान घरचा । " हा तुरा आहे आमचे स्त्रीचे हातचा । (चाल) रूपवति गुणवती सुंदर जशी चाफ्याची कळी । मी झालो लंपट कधीं तरी नाकरी जीवा वेगळी । सोडुनया रोजगार राहिलो बसुनया जवळी । (चाल) तीच मला बोलली रावजी ! तुम्ही जावा लष्करा । नका धरू संशय तुंम्हाला करून देते तुरा । नेम चळे तर पुष्पें सुकतिल निश्चय झाला खरा । तुम्हाविण जन बंधुसमान मजला प्राणेश्वरा । प्रार्थुनिया सांगते परंतु जतन मात्र करा " । अशि गोष्ट ऐकुन धन्यानें रचिले कैवाड । धाडला शिपाई

कामावर दुसरीकडं । भ्रतार म्हणे इ० ॥ ३ ॥ वस्त्रें भुषणें देऊन शिपाई गौरविला फार । पाठविला नेमुन, प्रधानाशी बोलाऊन मागें केला विचार । " तुरेवाल्याचा पण जाउन पहा रं ! । हरप्रयत्ने करून त्याची भोगावी सुंदर " । ऐकुन निघाला प्रधान सत्वर । दरकुच चालुन त्याचे नगर शोधुन पाहे घर । तिथेंच उतरला तो कामातुर । (चाल) पाणी पिया मागतले म्हणुन म्हातारी घेऊन आली । कडकडुन भेटला तिची मोहोरांनी ओटी भरली । कलयुगीचे अमृत देऊन द्रव्य, जवळ बसविली । किनखाबाची चोळी, तिला नेशवीला पितांबर । झाली थेरडी दंग, घेतली पुरती अंगावर । प्रधान म्हणे " आवाजी ! माझा मनोरथ पूर्ण कर । देईन धन दौलत तुम्हाला करी मी आभर । परंतु आजची रात्र तुझी सून पाठिव शेजेवर " । बरे म्हणुनया घरांत गेली सुनेकडं । केला ढोंग मोहोराचा म्हणे तुझी जोड । भ्रतार म्हणे इ० ॥ ४ ॥ " सुने तुझे चांगुलपण मजला आज कामा आलं । हे तुझ्या जीवावर द्रव्य मेळविलं । जन्माची कमाई एक्या रात्रीमधि होइल । भोगावा अंबिर दौलत देइल " । पतिव्रता सुंदर शब्द साहुन हसुन बोल । फुईजी ! । तुम्ही केले ते मला मान्य झालं । बोलाउन दासीला आपले खोलीमधि बोल । शृंगारून तिजला शिकउन पाठविलं । (चाल) आली प्रधानाजवळ पाहता आनंद झाला मनीं । नेणुनया हिरकणी भुलला पाहुन कांचमणी । नाहीं केली चौकशी करमिली रात्र भोग भोगुनी । (चाल) प्रातःकाळी उठून दासी जाऊन भेटे धनिनीसी । बटकीचे उपकार मानुन खुषाल केशी तिशी । चतुर सुंदर नार काय बोलली आपले सासुशी । भोजन करून जा म्हणून सांगा तुम्ही पाव्हन्याशीं । " ऐकताच राहिला प्रधान, मनांत झाला खुशी । अन्न करून तयार वाढिले दोप्रहरा पंगतिशी । घृत नाहीं वाढले तसाच जेवीतसे मूढ । मतिमंद कळेना अर्थ माने कोडं । भ्रतार म्हणे इ० ॥ ५ ॥

जेऊनया प्रधान चालला जलदी कुचाचो। दिली चतुर नारीनें संदुक भरमाचीं। नेउन राजाजवळ ठेविली संदुक भेटीची। उघडुन पाहता आंत वाढी उसाची ! । हासु लागले लोक थट्टा झाली प्रधानाची। मिळाली खुणेसी खुण मग भोजनाची। राजा म्हणे आम्ही पाहतो पैज नारीची। निघुन चालला तातड स्वारिची। (चाल) येऊन त्या नगरांत राहिले प्रधानाचे गति। उदंड केले उपाय सुंदर नाहीं चढली हातीं। (चाल) रायासी आमंत्रण देऊन बैसविला पंगती। राव म्हणे सासुला सून वाढील तर करू भोजन। होती नार पडद्यांत आली बाहेर, करी रुदन। " याद झाली पित्याची पाहुन रायाचें वदन। एकच स्वरूप दिसे पित्याला तिळभर नाहीं उणं "। इतके ऐकून राव निवाले जैसें अग्निवर जीवन। गेला कन्या म्हणून, तिजला दिले पुष्कळ आंदण। पण रक्षून नारीनं मिळविलं द्रव्य लक्ष क्रोड। निसंग निवाली आपल्या पतिकडं। भ्रतार म्हणे इ० ॥ ६ ॥ ज्या गांवी पति होता त्या गांवामधीं राहिली। वेश्या होऊन बसली, होतीं पाळी। तुरेकरानं वाटेनें जाताना अवचित देखली। कळवंतीण म्हणऊन जाऊन भोगली। खर्ची देता तिने रुमाल कटयार मागितली। असूद्या रावजी यादगिरी आपली। येवढे कार्य करून दुसरे दिवशीं निघाली। मजलीनें मजली चालुन घरा आली। (चाल) पति संगानें गर्भ राहिला हार्षवंत कामिनी। जनामधिं बोभाट सासु चिंताग्रस्त मनीं। तशांत आला पति सातवा मास नारीलागुनी। (चाल) पाहाताच समशेर उपसुन ठेविली मानेवर। रुमाल कटयार काढुन दावी त्यावेळी लौकर। घडिभर होऊन शांत पुसते वृत्तांत सविस्तर। पहिल्यापुन परिबंद (प्रबंध) नारीनें सांगीतला मजकुर। द्वादश वर्षें झालीं तरी टवटवित तुरा डोइवर। ऐकुनया भ्रतार म्हणे तूं पतिव्रता सुंदर। गोविंदराव गुरुराव शहर जुन्नरचे कविश्वर। राणुजी देवजी म्हणती ऐका निवाड। मल्हारी कवि करि छंद बहु गोड ॥ ७ ॥

लावणी ९

सोड मुरारी तुला किती सांगु तरो । नको करू बळजोरी ।। मशी बोल दुरुन ॥ धृ ॥

चार पोरं चावट मेली मोठी नाटबाट । हारी करी वाद, वाट अडविती मिळून । (चाल) दुर व्हा नको झोंबु पदराला । कारे मला येकलिला आणविले वळून । सासुरवाशी नार दारुण भ्रतार । साच बघुन विचार । करसील कळुन । (चाल) जाऊंदे हावा अरे घरीं । जाउदे हात्रा बरी नाही थडा लागल बावास येजा वरुण (?) ॥१॥ हट्टखोर कान्हा करु पाहे अपमान । म्हणे मी घेइन दान आज खडाखडी । धरुनी बोलसी फार फार झेका । येकली नार कोण हेची घडी । समजुन पाडसा घरी अबरूची चाड नाहीं तर ओढताड करतील गडी । (चाल) दे अंगसंग । चेतला ग अग्न । करु रंगरस इच्छा भरून ॥ सोड मुरारी ॥२॥ जळो तुझा संग मला लावितोस जंग; असे अवगुणी संग करु नव्हे हारी ! । फार शानपन दावितोस थोरपण हरी म्हणे आतां सोडीना खरी । (चाल) शाम सुंदर चुमे वर बळे ओढी पदर मुखावरून ॥ निऱ्या सोडू पाहे कंचुकी सोडून कुच आले चढून रगडुन धरी । नंदाचा लेक करी गवळणीचे हाल, पहा पुंडाचे काल गोकुळ नगरी । गोविंद्राव म्हणे अरे हरि । गोविंद्राव म्हणे करि उपाय हरीपदी लाउन मनीं भाव धरून ॥ सोड मुरारी ॥ ४ ॥

लावणी १०

सभाचतुर हो आयिका दोघे मैत्र होते सुज्ञान । एक चित्त दोघांचा प्राण ॥ ध्रृ ॥ दाट मैत्रकी त्या दोघांची. बसले: नदीचे तिरीं । जात नाहीं येकु येराचे घरीं । एक्या मैत्राची नदीवर धुवाया आली सुंदरी । किं आवचीत दृष्ट गेली तिजवरी । दुसरा मैतर आरे हारी । दुसरा मैतर म्हणे हे कोनाचे निधान । सुंदरा केवडयाचें पान ।। १ ॥ सख्या

जिवलगा सहजासहज पडली गांठ। पाहू विचारून घराची वाट। शरीरी हा काम चेतला पाहून हिचा थाट। हिशी कांहीं ओळख राहील दाट। दुसरा मैतर आरे हारी। दुसरा मैतर म्हणे "गड्या हे आज पाहेन आवसान। उद्यां राखीन तुझा मान" ॥२॥ सखे जीवलगे गडे त्याचा तुजवर फिरला हेत। तुशी बोलतो बोलत बहोत। अवचित तुजला दृष्टी देखिले नदीहून येत। तुजला नाहीं तो वळखत। आवश्य म्हणे आहो स्वामी। आवश्य म्हणे मी तुमची आज्ञा मज प्रमाण। ओवाळून टाकिन आपला प्राण। दुसरे दिवशीं येऊन भेटला दुरून दाखवि दार! नारीनें आदर केला फार। भवर मंचकीं शेज केली विडा देती सकुमार। रात्र झाली दोन प्रहर। उजाडे म्हणून आरे हारी। उजाडे पाहाता खंजिर आणि मुलम्यान। मनामधीं चमकला सुज्ञान ॥ ४ ॥ सावध होऊन उठून बसला होता। आशील कुल करीं त्या संवाद। गरत किंवा दासी वेश्या आम्हास केले बाद। खंजिर कोणाचा मुखी आणि वाद। पाहायाला म्हणून आरे हारी। पाहायला म्हणून हाति घेतला। झोकून दिधला प्राण। सुंदरा म्हणे धन्य भगवान ॥ ५ ॥ कपाळ पिटी ऊर बडवी म्हणति हायहाय। कसा मज घडे एक अन्याय। इकडे आड इकडे विहिर ठाव दे धरणी माय। पतिला सांगू मी आता काय। तोच खंजीर आरे हारी। तोच खंजिर तिनें घेतला भोकून दिधला प्राण। टाकली मानेवरती मान ॥ ६ ॥ दिवस उगवला उशीर झाला मगद आली दास। वाहीले रक्त सुटला वास। कवाड उघडून घरांत आली तिने आणिले श्वानास। दोघीच्या प्राणा झाला नाश। तोच खंजिर आरे हारी। तोच खंजिर तिने घेतला भोकुन दिला प्राण। म्हणे मजवर येईल तुफान ॥ ७ ॥ भ्रतार आला पाहू लागला तिथे पडले प्रेत। आपण मग करू लागला खस्त। नार नागवेल चुना भ्रतार बटिक

सुपारि मस्त । चवथा मैत्र चतुर प्रस्त । गोविंदराव म्हणे आरे हारी । गोविंदराव म्हणे कात सुपारि पान विडा हे मुखाचे मंडन ॥ ८॥

लावणी ११

उतरा वारूवरून त्वरे, वर तरी यावे गुणनिधी । घ्या जळ शितळ करते पंखा, बसा झरूक्या मधीं ॥धृ॥ गौर वर्ण शरीर, घर्म फारच शरिरासी आला । नेत्र लाल हिलाल, झगा छातिवर झाला ओला । हे वैशाखी ऊन लागले, चंद्र कोमाळीला । देते काल्पी गुलाबशकरी गुलकंद आण॰ वीला । नाजुक पिवळ्या कळया युक्तिनें तुरा हार गुंफीला । तबकामधिं पोशाख चुणून सरपोस वरून झाकोला (चाल) साहित्य सारे सिद्ध करूनी । रामटेकी पानें वर्ख वरुनी । चोपाळ्यावर नरम बिछोना शेज मंचकी जुदी । घ्या जळ शितळ करीते पंखा बसा झरुक्यामधीं ॥ १ ॥ रम्य स्थळ रंगमहाल रंगीत रुजामे अंथरीले । दरोबस्त झरूक्याशीं हिरवे पडदे चिकाचे दिले । कळसपाक छत आघर चमकती बिल्होरे खंदिले । विलयति तजबीरा हो ऐने चहूकडून लविले । गजदंताचा चवरंग जोड बनलीस । जयत ओह रूण पयपान करांचा रस प्राण (?) वदन पाहताच त्वरेनें जे धरली हृदयासी ॥ २ ॥

लावणी १२

प्राणसखे वल्लभे न हें ! का भाव धरसी परका । खचित दिला दाखला विनोदे कां मानसि चरका । मन मानस तुझपाशी सदोदीत मानित जा हारका । तुजपेक्षे प्रेम नाहीं हे पूर्वीची वटिका (चाल) इथल्या रांडा हारधडी उगे पाहती । हात धुऊन लागल्या पाठीं ह्या सवती । खोटयाचे खरे करणार आशा हिकमती । आवभाव दाऊनी तुझी मोहीली मति । त्या गोष्टी ऐकून घरीं येऊन रूसुन बससी ॥ ३ ॥ चाहोल तर मज वधी अधि संबंध पडून चुकला । आतां आशा दुर्दशा कशाला राख भरम

आपला । उपरोधीक परगृहीं कोणते कार्य म्हणुन झुकला । दंदी दुषमान ऊशापायथीं लागलेत तुजला । (चाल) माडीवर तिसरे तालीं रंगमहाली । रतिमदनापरि रुत घटका. संपादली । राहीला गर्भ सुखें तींते, मूर्त सावळी । गोविंदराव कृपेने पुत्रफळा पावली । कवि मल्हारी बहेरू, शहर जुन्नरचे रहीवासी ॥ ४ ॥

लावणी १३

शामरंगे श्रीरंगे धाव माये हो ॥ धृ ॥ दुष्ट दुरात्मा कौरवनाथ । पांडव जिंकुन केला घात । दुःशासन घालुन भवनांत । हरणी आणिली व्याघ्रवनांत । (चाल) द्रौपद बाळी । हे हे पांचाळी मोकली धाये ॥ १ ॥ दुर्योधन म्हणे ये अंकास । बैसुनया तूं धरी मम कास । सोडुन दे पांडव रंकास । द्रौपदी अवलोकी लोकास । (चाल) भिष्म द्रोण साहेना शद्ध घाये होजी । शामरंगे श्रीरंगे ॥ २ ॥ आधीक मानुन त्रास । क्रोध आला कौरवपुत्रास । झडकरी म्हणे फेडावे वस्त्रास । मग आठवी राजीवनेत्रास । (चाल) तेंव्हां श्रीकृष्णाचे स्मरे पाय दोन्ही । शामरंगे ॥ २ ॥ भक्तजनाचा रक्षकपाळ । धावा ऐकुनीया गोपाळ । वस्त्रें फेडीलीं तो पुरपाळ (?) गुप्त रूपें आला:जगपाळ । (चाल) करी उचडी, लुगडयांत लुगडी पाहे हो । शामरंगे इ. ॥ ४ ॥ वस्त्रें फेडीता पडली राख । नकळे अंधाच्या कुमारास । रूप दावीलें त्यास । रक्षले मग सारंगधरास (?) (चाल) गोविंदराव हरीचरणा पहाया हो । शामरंगे इ. ॥ ५ ॥

लावणी १४

सासऱ्या मी जाते सख्या मला मूळ आलें । घरदार सुचेना तुजविण वेडी झाले । अवचित गाठ रे पडली संगत घडली । चित्तवृत्ति तुझे ठाई जडली तऱ्हा आवडली । गेले दिवस आनंदाखाली रंगमहालीं । कल्पना जुदी नाहीं भरली । तनु झिजविली । आज घडि कैसी आली जोड बिघडली । कडकडून जशी विज पडली तसी

गत झाली । (चाल) फुलाच्या झेल्या । अंबिरा राजबनसी । तुझे वांचुन आतां मी कंठू कैसी । सांग मजला तूं भेटाया कधिं येसी । प्रीतीचे तुझ्या भुकेले म्हणवुन आले । घरदार सुचेना ॥१॥ घोकणी तुझी गुणिराया प्राणविसाव्या । मन मोहुन घेतलें पुरति लावलि माया । सकुमार सजविलि काया दवडू नको वांया । मी दासी लागते पाया, अरे सिपाया । एथल्या स्त्रिया फार हा बंसी वराया । कइक दमल्या तुला धराया दगा कराया । (चाल) राहात जा सावध हरघडी विनंती करिते । निभावेल कैसी अब्रू म्हणउन झरते । मी इथें जरी असते तरी तुला मी रक्षित फिरते । रक्षावे पाणी आपले, सावध केले । घरदार सुचेना ॥ २ ॥ तूं माशुक छेलछबीले बरे शिकविले । चित्त आमचें उदास झालें शरीर गळालें । ईश्वरें असें कां केलें, दैव उदवलें । अघटित कैसें घडलें तुला मुळ आलें । संगतिनें तुझ्या कर्मिले विलास केले । तंव तितके निर्फळ झाले होष गळाले । (चाल) नको होउ कष्टी जिवलगा अतीं मजसाठीं । अवळून कवळून कवटाळून धरली कंठीं । अधिर नका होऊ उद्यां ईश्वर घडविल भेटी । दैवामधिं असेच लिहिले फळास आले घरदार सुचेना इ० ॥ ३ ॥ उभयता आनंदाखालीं रंगमहालीं । जलदीनें तयारी केली पलंगन्याहाली । शेजारी सख्याच्या निजली गळा हात घाली । घडि येकांताची कर्मीली उठून बसली । निसंग निर्भय झाला हौस पुरली । शेलारी पिवळी दिधली बोळवण केली । संगाती माझ्या जिवलगा बोळवित याव । स्फुदान बोले मज मार्गे कठिण व्हावे । गोविंदराया सख्याला फिरवून न्यावे । बुद्धिवान रसिक रसीले प्रीतीनें केले घरदार सुचेना इ. ॥ ४ ॥

लावणी १५

मिळाले राजे शाण्णवकुळी। स्वयंवरा आले चंद्रमौळी ॥ धृ ॥ खंडोखंडीचे भूपाळ द्रौपदनगरीं झाला मेळा। पांचाळींचें स्वयंवर होतें पृथ्वींत फिरे धांडोळा।! "मच्छयंत्र सभेस भेदील तो परिणील पांचाळी।" तयानें पण केला मासोळी। मिळाले राजे शाण्णव कुळी ॥ १ ॥ भलेभले भूपती एकमेकांचो पाहती वदन। कौरवनाथ गर्जुन बोले उठिला दुर्योधन। तीन बाण घेऊन हातीं कढईंत न्याहाळीं। ज्वाळा उठल्या भूमंडळी। मिळाले राजे ॥ २ ॥ पहिला बाण हो व्यर्थच गेला दुजे करी संधान। तीही लक्षें चुकून गेली साहे उठला कर्ण। कर्णबाण हो व्यर्थच गेला मग झाली टाळी हेटाळी सभेमधि, हर्षें वनमाळी। मिळाले राजे ॥ ३ ॥ कापड्यांच्या रूपें पांडव बसले एक कोणीं। सभेंत फिरतो कृष्ण विडयास हात ना लावी कोणी। नेत्रें करून अर्जुन खुणाविला उठला त्या वेळीं। मग श्रीहरिचे चरण कवळी। मिळाले राजेशाण्णव कुळी ॥ ४ ॥ सकळहि म्हणती "या जोग्याचें व्यर्थच मरण। चुकेल आतां लक्ष्य ऐकतिल" कढईंत नेऊन धनुष्य बाण घेउन। हातीं, कढईंत न्याहाळी। चक्राकार फिरे मासोळी। मिळाले राजे शाण्णव कुळी ॥ ५ ॥ करंगळीचो मुद्रा दिधली कढईंत टाकून। तेल शांत करून अर्जुनें चित्तें लाविला बाण। विंधुन मासुळी तळीं पाडली कौरव तोंडें काळी। कंठीं माळ घाली पांचाळी। मिळाले राजे शाण्णव कुळी ॥ ६ ॥ कैचा जोगी? अर्जुन! ऐसें कौरवास कळले। कौरवनाथ दुर्योधनें सैन्य तयार केलें। हिरोन न्यावी द्रौपदकुमारी। दुर्योधन तरमळी। जिवा लागली काळजी। मिळाले राजे शाण्णवकुळी ॥ ७ ॥ गांडीव घेऊन हातीं अर्जुन करितसे संधान। भीम लागला पाठी कौरव पळती जैशी हरणं। अपेश घेऊन गेले कौरव, दुर्योधन। तळमळी भीम गदा करिं पडताळी।

मिळाले राजे शाण्णव कुळी ।। ८ ॥ सकळहि कौरव विचार करती बसुन हस्तनापुरीं । कैसें वांचले पांडव म्हणती जळता लाखाजोहोरी । गोविंदराव म्हणे जगन्निवासा आली विघ्नें टाळी । पाळिवा मागें पुढें सभाळी, मिळाले राजे शाण्णव कुळी ॥ ९ ॥

लावणी १६

वळली विराट-नगरी । गोधनें वळली विराट-नगरीं । दक्षणच्या गायी वळाया सुशर्मा धाडिला । उत्तरेची वळणि, अपुन दुर्योधन राहिला । भीष्मद्रोण कृपाचार्य शकुनि दुराचारी । गोधनें वळली विराट नगरीं ॥ १ ॥ विराट राजा, धर्म, भीमसेन दक्षिणेसी गेले । उत्तरेचीं हांक गवारीं घेऊनश्यानि आले । रत्नपारखी राजकुमरा ! धाड पोचली खरी । गोधनें .... ॥ २ ॥ उत्तर म्हणे " नाहीं सारथि, युद्ध कसें करूं, × × ये " । सैरंध्रि म्हणे " विराटपुत्रा नाटक शाळेंत जाये । विचार पुसावा बृहन्नळेसि होइल बरवेपरि " । गोधनें ...... ॥ ३ ॥ उत्तर बैसला रथीं सारथी झाली बृहन्नळा । येतां रथ येकी देखिला । कौरव पाहति डोळा । सकळहीं म्हणती येक लेकरू । दुसरी दिसती नारीं, गोधनें .... ॥ ४॥ भीष्म म्हणे हो दुर्योधना ! जो का आला येक रथीं । असेल कोणी अवतार, भार्गवरामासारखा ख्याती । अर्जुन ऐसें मला वाटते. आपले मनीं विचारी । गोधनें .... ॥ ५ ॥ कौरव सैन्य देखून विराट-पुत्र मनांत भ्याला । म्हणे जळो हें युद्ध, रथावरून पळूं लागला । अर्जुन पहातां, उत्तर पळतो, आणला रथावरी । अर्जुनें बांधिला रथावरी । गोधनें .... ॥ ६ ॥ अर्जुन म्हणे मी युद्ध करितो तूं का पळसी मूर्खा । कंकभट तो धर्मराज, बल्लव भीमसेन सखा । नकुळसहदेव माद्रीकुमर, द्रोपदी ते सैरंध्री । गोधनें .... ॥ ७ ॥ दशनामेंचा जप अर्जुनें उत्तरा उपदेशिला । कृशनीचें शस्त्रें आणुनि ध्वज फडकूं लागला । देवदत्त शंख स्फुरिला । मारुति भुभुःकारी ।

(ध्वजासि मारुति भुभुःकारी ।) गोधनें .... ॥ ८ ॥ कौरव सैन्य कांपे थरथरा, म्हणतो आला अर्जुन । रथ लोटला घडघडा, येता हो दुभंग केलें सैन्य । गाई वळुन नगरद्वारीं । मग स × × करीं गोधनें .... ॥ ९ ॥ अर्जुनानें द्रौपदीचें उसने घेणें आज । बीजमंत्रानीं जो बाण काढिला जो शंत्रूसी नीज । सकळ सैन्यासि आली निद्रा । मग आज्ञा करीं । अर्जुन बाणास आज्ञा करी । गोधनें .... ॥ १० ॥ भीष्म–द्रोण कृपाचार्य । दोन्ही करून भिन्न । सकळ सैन्याचीं वस्त्रें घेतलीं । अवघी केली नग्न । गोविंदराव म्हणे " ऐक राणू , ऐक, ऐसी झाली परी । " शकुनि म्हणे, " हीं मेली बरी " । गोधनें .... ॥ ११ ॥

लावणी १७

या शिवाना शिवपुराणीं ज्योतलिंग म्हणतीं बारा । सभानाइक मना आणावे हे विज्ञप्ती उत्तरा ॥ धृ० ॥ मिळून ऋषी मंडळीशी गेले तपासी ऋषीवर्या । आश्रम निधान ते स्त्री रत्न मिळुन बसल्या ऋषी-भार्या । शंकर जोगी झाले वैराग्य, आले भिक्षा मागाया । लिंगविस्तारण नेत्रीं पाहून विस्मित झाल्या त्या सखया । वेडया झाल्या पाहू लागल्या निमित्त आणले शंकरा । सभा नाईक इ० .... ॥ १ ॥ ऋषी आले पाहू लागले नाहीं आश्रमी सुंदरी । आत्मज्ञानें विचार करूनी मग ते पाहतो दिगंतरी । श्राप देती 'कोण पातकी लिंग पतन हो सत्वरी । ' लिंग गळाले धरणी पडले मग खडबडली धरत्री । वराट पाट करी सपाट आकांत झाला जगता । सभा नाईक इ० .... ॥ २ ॥ असें अरिष्ट महाद्रुष्ट पडले संकष्ट विष्णुला । तेहतीस कोटी मिळून मग विनविती सदाशिवाला । बारा खंडया करून त्याचे बिनणी (?) रुप विष्णू झाला । देहशाळूंक लिंग त्रिंबक, शिवपुराणीं दाखला । कोण कोणत्या जागा प्रथक लिग रूपले अवधारा । सभा नाईक इ० .... ॥ ३ ॥ नाम

उज्जनी अवंतिका प्रथम लिंग हे स्थापीलं । महाकाळेश्वर नाम तयाचे साधूमुखें ऐकिलं । देश सोरट महासोमनाथा निर्मिल । अर्धचंद्र भाळीं तयाच्या तया स्थळा ठेवील । हेमाद्रि बद्रीकेदार तिसरें लिंग हे अवधारा । सभा नाईक .... ॥ ४ ॥ आनंदवन वारानशी काशी म्हणती सांप्रतकाळ । काशी विश्वनाथ तारक निर्मळ जान्हवीचें जळ । स्नान करतां दर्शन घेतां पापें जळती तत्काळ । ते ठाई देहकाळ होता मोक्ष पावे केवळ । कलयुगांत करि पावन चला जाऊं काशी यात्रा । सभा नाईक ....॥ ५ ॥ नर्मदा कावेरी ह्या दोघींचा संगम पवित्र । ओंकारेश्वर लिंग पांचवें याचा महिमा विचित्र । वेरुळ विश्वेश्वर येणचिले (?) सहावा भीष्मेश्वर । वैजनाथ हो लिंग सातवें उत्तम परळी नगर । गिरीजेसहित तिथें रहाणें । चंद्रमौळी शंकरा । सभा नाईक .... ॥ ६ ॥ आवंढया नागनाथ तेथें भक्ति मुक्ति उत्तम। त्रिंबकराज गोदातीर हे तो परमनिजधाम । बारा वर्षें सिंहस्थ थरे चवयुगाचे (?) नाशीक ग्राम । बारा मुलूख येती दर्शना पापा होत कर्दम । भिमाशंकरी बेल नाहीं दहावें लिंग हे भिमा तिरा । सभा नाइक .... ॥ ७ ॥ मल्लिकार्जुन अकरावें लिंग रामेश्वर तो बारावा । तांब्रण (?) नदी हो समुद्रसंगम रत्नाकर सागर बारावा । स्वाति पडती मोती पिकती सेतु बांधला राघवा । वानर आठरा पद्म उतरून गेले वेगळे कसे थवा । शाहण्णव हजार हुडे लंकेचे कसे वाटले वानरा । सभा नाइक .... ॥ ७ ॥ सात पर्वत पृथ्वीवरती ठेविले श्रीभगवंते । शेषाद्री शैयाद्री, हिमाद्री विंद्याद्री तो गुरु × × । वषाद्री, मलयाद्री, पयाद्री ऐसें झाले सात । कोणकोणत्या पर्वतावर कोण लिंग राहत । गोविंदराव म्हणे गावना येवढे सांग शाहिरा । सभा नाईक .... ॥ ८ ॥

लावणी १८

ऐक सुंदरी राजमंदिरी स्वप्न देखिलें कुठून । मी वेडी झाले उठून

॥ धृ ॥ डोळ्यांत लहान डोळा त्या डोळ्यानं गिळिलं गगन । गंगा ज्यांत घेतली अग्न । त्या अग्नीमधि मच्छ पोहतो देखुन झाले मग्न । एक नार नाचती नग्न । सशा म्हशाच त्या दोघांचं लागुन गेलं लग्न । त्रिभुवनी झालं जघन्य । त्याही सशानं सिंह गिळिला । सहज गेला घुटघुटुन । मी वेडी झाले उठून ॥ १ ॥ त्याही सिंहानं केला कधीं विंगाना । मुंगी धरिली बळं । त्या मुंगीचं आंग निळं । आणिक एक कौतुक तिच्या मुखी तीन्ही ताळ । तिच्या डोइवर भरलं तळं । मुंगी माता आंडी विली पांच पंचीस निर्मळ । तिचं पहिलं आंडं ढवळं । एक एक आंडं अरे हरी । एक एक अंडं अनंत ब्रम्हांड । गेलं फुटुन । मी वेडी झाले उठून ॥ २ ॥ दो प्रहरी अर्धे रात्री पक्षी देखिला काळा । त्याचा अणू येवढा डोळा । त्या डोळ्यानं त्रिभुवन भक्षिलं येकच वेळां । अशी धनकर त्याची कळा । शिरी देखला मोड उगवला आरक्त हिरवा निळा । अशीं अवटित ज्याची कळा । तिसरे प्रहरी स्वप्न देखिल अवधेच नेलं लुटून । मी वेडी झाले उठून ॥ ३ ॥ पहाट झाली डुकलि लागली वृक्ष देखिला उफराटा । बावन पेड सरती जागी वाडा शाखा गेल्या तळवटा । त्याचा विस्तार झाला मोठा । गोविंदराव करी लावव । तिला नाहीं बाट । जसा वजन ताजवा काटं । अक्षरे तोडा कसर काढा जाइना तुटून । मी वेडी झाले उठून ॥ ४ ॥

लावणी १९

कुठें कमेली मजवांचून रात्रा । स्वामी मम वल्लभा प्राणमित्रा । प्राणपति मजला तुमची आस्था । मार्ग लक्षीता रविअस्ता । बाळपणापुन एक चित्त आसता । रात्री काही केली अनास्था । चतुर्थदिन ऋतकाळी जरी असतां । रेत रक्त संगम घडला असता । (चाल) सेवा करूनी म्या आर्जविले ईश्वरा । शुभ शकुन दाविला मजला परमेश्वरा । ऋतु-काळी अंतर दिधले मनचोरा । (चाल) पुष्कर्गीच्या पुष्करा सख्या

भास्करा विसर का पडला ?। मी तव तुमची आश्रींत पदीमौस्थित। विघड का घडला। स्वामी या सगुण माणिकाते त्यजून आणिका जारेशी जडला। (चाल) आभ्यंग नाहले मी तव प्राप्तीलागी सुगंध चर्चिले। स्वकरें भींति लागी। वर चित्रशाळा लिहिल्या शोभेलागी। (चाल) एकांती वनवास येता उमाकांत वसे विव्हळ। त्रिनेत्री कंदर्प दाहिना तद्वत मम कर्म ठेवावा। (चाल) काय करू शेजे मंचका। निष्ठूर तूं मम वंचका। परगृहीं प्राणपंचका। स्वस्त्रियेसी प्रपंच कां। (चाल) ऐका विनंती। राजेंद्र मम मानससुखचंद्र। रात्रीं लोपविले वदनचंद्र। रति वांचुन सुख चंद्र। रात्रीं लोपविले जी। (चाल) काय करू धनमाल माड्या वस्त्रें अलंकार। चांगुलपण चांगलें तशामधी वय तरुणकोरं। म्हणूनिया प्रार्थीते धरला तुझा भावकार।

लावणी २०

संसार फार जोजार कोणता तुशी। म्हणवून भ्रमण रूपगुणसंपन्ना दिननिशी॥ धृ॥ दिपवाळीचा अवशीचा प्रहर यामिनी। ही प्रीत रीत का? निद्रा तव लोचनीं। दिसे कडु काळ मज तुमची बहु काचणी। समजाना मना येवजेना काय जाचणी। (चाल) आहे गर्भश्रीमंतापरी विपुल सदनीं। कोणत्या निमित्यें मज त्यागुनी टाकुन जाता सांगा तरि घरधनी। अनुचित कृत्य हे सत्य भासले मशी॥ १॥ द्वय प्रहरो घरीं क्षणभरी तरी जागता। परगृहो निवारी गृही कसे भागता। मज विषई द्वैत भासले वृधिंगता। आंतरयाम अंतर्मन भज तर ना सांगता। (चाल) हा जीव माझा अगदीच करवतो। धगधगित आग भरनवती कशी धरवती। विसरून मला दुसरीची मुरवती। सारखा जीवा निर्जीव करून नेणसो॥ २॥ तिसरे प्रहरी लाव खोलीला कडी। चुकवूनया आला भोगुनि कुणी रोकडी। मजपरिस कोणती दुजी आहे फाकडी। रूतुक्षेत्र वर सहि मयत वाकडी (?)। (चाल) हा प्राण सख्या अर्पिला

हा तुमचे पदीं । अन्याय काय असला, मज वधो । निष्ठुरपणें धरली कल्पना जुदी । कोणती दुजी भाळली सांग मजपशी ॥ ३ ॥ चवथे प्रहरीं मंचकावरी आवळा । निजली नेत्रीं वाहे जीवन घळाघळा । दाटला मोह सख्यानें लाविली गळा । गोविंदराव म्हणे कर खुषवक्ति सोहळा । (चाल) माडीवर तिसरें ताळीं मग ते क्षणीं । भोगी प्रियकर मनइच्छा सुलक्षणीं । मल्हारी बहिरू प्रख्यात कवी दक्षिणी । संतु रावु हरीभजनीं दिननिशी ।

लावणी २१

थोरा घरचें भांडण ऐका कुजा गमतीचा । गंगा आणि पार्वती भांडती झगडा सवतीचा ॥ धृ ॥ आपला भ्रतार टाकुन शान् शांतनराव नृपति । भोळा शंकर वेडा केला तुवां माझे सवती । तूं सर्वांची धुनी जनलोकांचें पाप धेशी । भर नवतीची मस्ती अंगीं चार मास वाहतीं निर्लज्जे निर्दये ! लाज वाटेना कशी चित्तीं । सात पुत्र मर्दिले आठवा भीष्म करी संती । ठिकाण नाहीं तुझी वस्ती । ऋषीमुनी तापसी येउनी तुजपाशी राहती । स्वांगी ज्यारउडन्यामाझी प्रीती । जटेमधीं राहुन भोग भोगशील एकांतीं । अर्धे अंगीं अंकावर मज अधिकार बसायाचा । घर निघे ने वनास नेला लंपट कामाचा ॥ १ ॥ गंगा म्हणे गौरीला " ग माझी कां निंदा करशी । गंगास्नानें भस्म होती पापाच्या राशी । हरिचरणापुन जन्म माझा झाला आकाशीं । कार्या॰ कारण येथें मजला आणिले राहायासी । सहजगती मूर्तिमंत उभी होते मी तीरासी । शंतनूनें वरियेले मजला गोवून भासी । अष्टपुत्र ते वसु- श्रापें आले जन्मासी । श्रापाचे निर्गति होताना गेले ठायासी । मज कोणाची अशाच नाहीं, खेद शांतनूसी । म्हणउन भीष्म दिधला तो एक धन्य सोमवंशी । भाक मोकळी करून, तोडिला संग शांतनूचा । तुज- वाणी म्यां नाहिं शब्द मोडिला भ्रताराचा ॥ २ ॥ सदाशिव सांगता

ऐकिलं नाहीं उत्तर । मुळाविण माहेरास गेली वर्जुन भ्रतार । पतिअज्ञा भंगु नव्हे, तो प्रत्यक्ष विश्वेश्वर । ऐसें असून गेलिस फळ पावलिस सत्वर । दक्षपिता अन सुमती माता, पाहता समूर । बहिणी म्हणती जोगिणी ग, येथुन पळति सर । हातीं शंखाच्या माळा रुद्राक्षाचें अलंकार । स्मशानीं राहतेस नित्य भुतांचा व्यवहार । आम्ही देवाच्या पत्न्या, तूं अमंगळा अपवित्र । मंडपांत येऊन ग विटाळ केलास मात्र । मग तो दिधला प्राण राहिला यत्न पितयाचा । चित्‌शक्तिला पहा डाग लाविती लंछनाचा ॥ ३ ॥ गंगे मजला नांव ठेवशी रांड ! कमजाती । क्रियानष्ट तूं भ्रष्ट, पहा शोधुन आपले चित्तीं । कुळमुळ लोपुन तुवां आपली वाचवलीस कृती । धिग धिग त्याचें जिणें ग जे मुळ पहावया विसरती । तीर्थवासी तपस्वी पाहे पृथ्वीस्थळ फिरती । परि ते जन्मभुमी एकदां येऊन विलोकती । तूं जेथें जन्मसी तिथें जाइनास मागुती । लेश ओहळ मिळता थार भरपूर भरे मस्ती । जैसा नर अज्ञाना गुंतला प्रपंच्यावरती । सूज्ञ न विसरला भोगणें चवऱ्यांशीं प्राप्ति । म्हणउन मुळ माहेराशी जातां आग्रह कशाचा । चित्‌शक्तिला पहा डाग लाविती लंछनाचा ॥ ४ ॥ फार बढाई आपल्या तोंडें कां करिशील गौरी । दुसऱ्याशी निंदुन आपली दावितेस थोरी । सध्याची प्रथा (?) आपले मनांत विचारी । शिवरेतें जन्मला स्वामी कार्तिक ब्रह्मचारी । जन्मापुन वांझुटी, नाहीं संतान तुझे उदरीं । तोही मुख पाहेना मोहो लाविता पळे दुरी । ऐशी तूं अवगुणी म्हणून रुसले त्रिपुरारी । वनांमधीं जाऊन भाव दावशी जशी सवरी । हीनयाति भिल्लीणी कशि करशिल माझी बराबरी । मी निर्मळ गंगा जळ ब्रह्म-कपाळ तासवारी (?) । जडमुढ तारुन मार्ग लक्षिला पूर्वसमुद्राचा । मागें फिरून पाहेना जैसा धडा शुकेंद्राचा ॥ ५ ॥ ऊंच नाक करून भोगसी कां मोठेपण । लाज सोडलीस गंगे हिंडशी उघड्या माथ्यानं । बळेच

पडशी गळा चांगला समर्थ पाहून। अंग संग देऊन शेवटीं फशी पाडशी फिरून। सदाशिवापश्चात लाविले शांतनूशी लग्न। त्याजलाहि टाकिले नष्ट असें तुझे गुण। निसंग होऊनशान गेली सागरासी शयन। तोही आपंगेना तेव्हां तूं केलें सहस्त्रवदन। झाली त्याची प्रिया मिळाले जिवनास जीवन। म्हणउन सरितापति बोलती शास्त्रपुराण। गोविंदराव म्हणे नित्य निर्मळ गंगाकुळ। तशीच ती पार्वती, तिजला नांव ठेविल कोण। देवादिकांत कलह असे सवतीचें लक्षण। म्हणउन दोन स्त्रिया करित नाहींत बुद्धीवान। कार्याकारण केल्यावर मग नाहीं दोष याचा। भिमा मल्हारी म्हणे वेल वाढेल संततीचा।

लावणी २२

रूप निर्मळ एक ऐना, स्वरूप सकुमार पद्मनयना। गोड बोलणी जशी मैना, सुंदर नाजुक गहेना। ॥ धृ० ॥ जणु इंद्राची रंभा देवांगना। चंद्रबिंबा। मोतीं ओतली त्याच बिंबा। कर्ता धन्य अंबा। मदन डळमळी तनुकुंभा। दाटला ज्यानीचा तुंभा। जसा रुतकाळी बहार निंबानवतीचा अचंबा। (चाल) कंचुकी आंत कुच गमले जन्मापुन जमत जमले। तैसें व्दादश वर्षे रमले। भरामधिं आल्या पुष्प उमलें। नोक लावून प्रीत समले। उभी श्रीमंताची सैना ॥ १ ॥ उभय सरदाराच्या झुंडा। मोडिल्या भल्या भल्या मुंडा। केल्या कैकांच्या मुरकुंडा। मारती नयनखांडा। हाजारामधिं एक गुंडा। शर्त लावुन चढवी झेंडा। खर्चिता मालाचा हुंडा। विरळाच एक दुन्डा। (चाल) कायाकिल्ला उभय बुरजी। बांधिला विचित्र नवदर जी। थोपले लोक परा दुर जी। मार मारती नयनशर जी। लाऊ पाहती ऊरा उर जी। थक्कित लैनाच्या लैना ॥ २ ॥ रूप नाजुक माजमुष्टी। देखिले खाशाला दृष्टी। जशी कां स्वातीची वृष्टी। बोलणें मधुर मिष्टी। तुम्ही श्रीमंत धन्य सृष्टी। आम्ही सुंदरा कर्मनष्टी। व्यर्थ कां पडला

दुर्धष्टी । अवघड कठीण गोष्टी । (चाल) होईल भोभाट जगीं अवघा । बारापुन नर जगवा । दहा घेऊन दोन जुगवा । आतां भरमात कार्य उगवा । चढला वर झेंडा भगवा । अंमल: तुमचा मला भय ना । सुंदर नाजुक गहेना ॥ ३ ॥ गुणी गोविंदराव गुरुवर्या । सुंदरा करी भावक्रिया । आस्तमाना जाइल सुर्या । मंदिरांतिल भार्या । अशी लाल युवतीची चर्या । चतुर लावून पर्या । भोगिती भलत्याची भार्या । बहुतेक ह्याच कार्या । (चाल) सोडा विषयांचा धंदा । प्रीतीनें हरीहरा वंदा । भिमा मल्हारी दीन बंदा । म्हणे बोलता घडे निंदा । खोट्या कर्माच्या छंदा । भोगिती पैनावर पैना । सुंदर नाजुक गहेना ॥ ४ ॥

लावणी २३

चाल दूर होय ग चंचल चपळ अचपळ । कशाला बळच पडशील गळा । जगठकणी अंतरचि खोटी वर लावी ळळा ॥ धृ० ॥ परघरची परनार देऊन इतबार करून करार गोविले मला । माया लावुनी गोड बोलुनी दगा शेवटी दिला । जेव्हां केली प्रीत तेव्हां किंचित नाहीं अनुचित मोह लाविला । सवेच दुसरे दिवशीं बेमानीचा शब्द लाविला । घडोवडीचे रंग लबाडी ढंग भल्या कि ग तुझ्या संगतीला । एकांतीची गोष्ट केली लोकांत भरम फोडीला । (चाल) जनलोकामधिं झाली फजेती घरीं कजीया लाविला । हाकमाच्या कानावर गेल्या गोष्टी खंड बांधिला । शेजारी पाजारी हासती म्हणती भलारे भला । बदलौकिक दुर्नाम झालें । बदलाम बुडाले काम वाळला मळा । शरिर गेले वांया हातापायास लागल्या कळा ॥ १ ॥ उत्तरा प्रतिउत्तर देती सुंदरा म्हणे तूं फार बरा बोलशी । बेशरमीचा बुरखा घेऊन लौकिकास सांगसी । खटनट अमंगळ मी वंगाळ, परंतु तूं निर्मळ दिससी । आरे मुर्खा गव्हारा पाणी पिऊन घर

पुसासि । विसरलास तूं कसा प्रथम दिवसास माणसामधिं गप्पा झोकसी । कुतऱ्यावाणी हाड हाड म्हणता बळेच झड घालसी । (चाल) सहा महिनेपर्यंत केल्या येरझारा ऐशापरी । झिडझिडकारुन देतां बळेच बसशी वसरीवरी । केला बाजावाजा भाक देऊन घातलेस भरी । तुझ्या हाडाची माळ लेईन नितकाळ वचन संभाळ होईन अवकळा । निसंग झाले आतां तुलारे घालिन रसातळा ॥ २ ॥ अग रांडे गलधट बोलशिल धीट कीं माझा त्रिट कैसा मांडिला । जनलज्जा सोडिलीस मनाची लज्जा नाहीं तुला । माझे घरीं सुंदर, दिला पदर यंदा तिला । शेजेवर भरपणी कसे टाकावे एकलिला । प्रपंच न परमार्थ लौकिकार्थ पाहिला स्वार्थ मिनी आपला । परधन परकामीना जीवा लाधत नसते दाखला । (चाल) कथिल पितळ सत्तेचे, नलगे जडाव जायेजना । वाईट किंवा बरी पद्मिनी परघरची अंगना । ऐसा निश्चय जाणून पुरता विचार केला मना । पोरपणीं खेळलो येथ झोळलो जीवापाळीक पावलो फळा । परनारीचा संग आतां मज नको रंगसोहळा ॥ ३ ॥ शोधुनिया शिरताज गुणी गुणीराज कवीमहाराज कविता करी । ऐकून बे गावना गोविंदरायाची शाहिरी । उदकापुन तरुवर वाढला वर म्हणूया तर महासागरीं । आपले जाणुन मग सोडू नये समजावे अंतरीं । मैत्रकीचे कर्मधर्म अधर्म सोडून हें वर्म उणे उतरी । पदरी पडले पवित्र झाले निभाव शेवट करी । (चाल) जन्मांतरीचे ऋणानुबंध पूर्वीची कल्पना । हेत प्रितीनें घडून आलासे सत्य संकल्पना । आतां वावगा वाद कशाला जनवार्त जल्पना । इष्कबाज रसभरी शहर जुन्नरी कवी मल्हारी छंद आगळा । बहिरु विठूची जोड गोड गाती राधा कोकिळा .... ॥ ४ ॥

लावणी २४

स्वामी टाकुन मज गेले प्रवासा हे जगन्निवासा ॥ धृ० ॥ माझे

आंगीं भर नवती कोमळ कवळी। जैशी शेंग चवळी। रंगी नारंगी सुरंग पिवळी। माजामधिं चिवळी। नेसुन जरतार पैठणी ढवळी कंचुकीस अवळी। चढणार नाहीं भ्रमर या गेंदसुवासा। जीव कापला हो स्वामी ॥ १ ॥ महालीं एकली दीन किलवाणी झुरे मोरावाणी। राघोला ज्याची हृदयावर दोन्हीस वाणी (?)। कुचकुच बोलोनी। राघोला घातला भरी सर्वांनीं। दुरले दूर वनीं। आतां पति पाहेन तरी कव्हासा। मज पात्र दुर्वासा। खंतीं कांताची करी मृगनयना। नाहाती दर महिना। बसली झरूक्यांत पाहातसे आयना। सुंदर गुणगहिना। वाचे बोलतसे मंजुळ मैना। जाते हे वय ना (चढाव) हे वय ना आतां पति पाहेन तरी केव्हां ॥ २ ॥

लावणी २५

जिवलग जीवीचा बाई। शेज मंचकीं नाहीं ॥ धृ० ॥ अनुचित किंचित खचित नसता। वांछित उचित चित्त गृहीं असतां। वर्जित अर्जित अर्पित असता। विकल्प आला कांहीं। शेज मंचकीं नाहीं ॥१॥ तारुण्य लावण्य दिव्य जवाणी। त्याविण स्वाधीन मज किलवाणी। व्यथिष्ट स्वादिष्ट मन किलवाणी। तितुर्केहि व्यर्थच जाई। शेज मंचकीं नाहीं ॥ २ ॥ सजणी वद समंध गोविंदराया। करवा हो ठरवा हो जपुन माया। जपुन आपुन आजपुन क्रिया। बहेरू बापू गाई। शेज मंचकीं नाहीं ॥ ३ ॥

लावणी २६

किती राहसी नटनटून जणु का दिवस आहेत मागले। सर्जेदार नथणी दे टाकून ले पोती चांगले ॥ धृ० ॥ स्वरूपवान देखणी फारशी होती सर्वापरी। कदंकबर उंबर पंधराची। सुरत मुरत गोजरी। भर ज्वानीचा भर ××× खुब रंग होता तुजवरी। आतां उतरलीस फार,

नको पोशाख तुला भरजरी। किती करशील शिणगार म्हणू जशी कसबीण एखादी बरी। वृद्धपणाची लाज वाटेना बसून राहात जा घरीं। आम्ही काय शिकवावे तुजला ? कैक शिकवून भागले ॥ १ ॥ आली उतरती दशा ढिले जोबन केवळ दिसती। रंगाचा बदरंग गाल खलडवाणी भासती। किती राहशील ठीकठाक परंतु लोक बघून हसती। तुझें मैत्र जे सखे तुला ते पाहुनया त्रासती। अशी काय सोन्याची तूं जनलोकाला भासती। याकरितां ना कळे कोणी लंपट तुजवर असती। अजुन तरी धर शरम जाहला (?) का तुला येड लागले ॥ २ ॥ बाळ-पणीं शहरांत तुझ्या नांवाचा लौकिक बरा। शेटे महाजन चालुनशानी येत होते घरा। वाणी उदमी सराफ बुडवून बसलीस सवदागरा। नाहीं राहीला अंत खराबिस आणले हलवाई घरा। एकावर आकत्यार असा का नाहीं तुझा शेरा। तुला देइल जो द्रव्य साजणी तो तुझा सोयरा ॥ ३ ॥ असे कर्म आचरलीस बशीव वेश्येहून आगळे। कुळवंताची असून चाड अबरूची नाहीं जरा। कुसंगाची आवड हीमल ये गाची (?) तऱ्हा। गोविंदराव म्हणे भजावे प्रीतीनें शंकरा। नाम-स्मरण करून पार हा भवसागर उतरा। संत समागम गोड, जोड सद्गुरुचरणाची करा। अनुभवसुख लाधेल, प्रपंचादिक माया विसरा। प्रथम कवन राजारामाचे हे चुकले पळाले (?)

लावणी २७

कुंभ शिरी घेतला जळाचा, छनन घुंगरु गेंद विरोद्या वाजवी घनवटुन तुटुन येणार पनवटावरी पहा ॥ ध्रु० ॥ गोरी गुणी आलबेली नीभासी। गोरी असुन दिसे मोर्त ल्हानशी। लघु कठिण कांचोळींत गारसी। मुस ओतली सोन्याची आटुनी। छननन घुंगरु इ० .... ॥ १ ॥ मुखकमळ नथनिला झुमके। फिरवी नयन सौदामिन चमके। निघे

चपळ जैशी नागण धमके । चाले ठिकत मोहोरे तूं × जनीं ।
छननन .... ॥ २ ॥ करीं आदा मारीतसे भारी ।
गल्लोगल्ली बिसनीचे कहारी (?)। रहाती घरीं किती अहेरी गहेरी ।
दर्शनास नित येती उठुनी । छननन घुंगरु .... ॥ ३ ॥
गोविंदराव म्हणे ती गुणवंती । गेली निघुनी किती टकमक पहाती ।
बापूनें तिनें टकविले आनती । गुणिजन घेती रंग लुटून ।
छननन .... ॥ ४ ॥

लावणी २८

घे खेळूनया फुगडी दिवस गडे नाहीं राहणार । उतरून जाईल रंग तुझे भरजानींचा तोर ॥ ध्रु० ॥ तुझी ग जानी रंग तुफानी राहिल कुटून । गुले आनारा फुल हजारा जाईल विटून । सांचपाणी हे ग तळ्याचें जाईल अटून । दो दिवसाचा पंछि मुशाफर जाईल उडून । (चाल) हे लवंग सुपारी भरून पान । एक एक सख्याला म्हणसील लवकर आण । सण नागरपंचमी श्रावण महिना जाण । जाती वारुळाशी नागोबाचा मान । दूध, तूप, साखर । उतरुन जाईल इ० ॥ १ ॥ पुर्णिमेच्या पूर्णकळ्या जसा चंद्रप्रकाश । दिवस न दिवस तुटती कळा पावती नाश । जसा वळवाचा ढग वसरून जाईल पाऊस । तसें तुझें तारुण्य याचा नको धरू भरवस । (चाल) तुवा भांगी भरला सखये गुलाल लाल । कुंकावर टिकली लाल लाल हील्लाळ । तुवा मुखीं घेतला विडा बत्तीशी लाल रे । छातीवर चोळी लाल लाल मदनाचे पिसारे । उतरुन जाईल .... ॥ २ ॥ दो दिवसाची दुनया कशाला गुमान करावा । गेली घटका फिरून येईना ईमान राखावा । गोड बोलणें सज्जनपणा लोकासी वाटावा । जैसा चंदन जाई झिजुन परउपकार करावा । (चाल) ही सज्जनपणाची सखये अशीच वाट । कर उत्तम सौदा, वसरून जाइल हाट । हे मैत्रकीचे कठिण अवघड घाट । शेवट

कर संगतीचा जडली गांठ । गांठ ही नाहीं सुटणार .... ॥ ३ ॥ खेळून फुगडी होऊन सुगडी दुघडी म्हणेना । घाल पिंगा होऊन निसंगा अंगा येईना । तुझा ग रंग जैसा पतंग कोणा कळेना । अक्षर भाळीं लिहिलें कपाळीं तैसें टळेना । (चाल) तो गोविंदराव साळी गातो छंद । हो विणता विणता सहज करी कटीबंध । नित हरिनामाचे करित सदा अभंग । राणु न्हावी डफावर निशाण लावी बंद छंद । जुन्नरचे राहणार । उतरुनी जाई .... ॥ ४ ॥

लावणी २९

पोशाख करू लाल, फुगडी घेऊ चाल ॥ धृ० ॥ अंगी रंग नवतीचा लाल । प्रभा पडे जैसा हिल्लाल । मुखीं घेतला विडाही लाल । कांचोळी छातीवर लाल । भांगी भरून गुलाल लाल । फुगडी घेऊ चाल ...॥१॥ जडीजडीताचा गहीना लाल । हातांत हातसर पवळी लाल । नाकीं नथ सरज्याला लाल । बाजुबंद फुन्ना फुंदडा रेशमी गोंडा लाल । उटी लेऊनी लाल लाल । फुगडी घेऊ चाल .... ॥ २ ॥ नेत्रधुंद कैफामधि लाल । नेसुनया शेलारी लाल । भाळीं कोर कुंकवाची लाल । अंचलामधि लोपिती हिलाळ (?) वर किरमिरी शाल लाल । फुगडी घेऊ चाल .... ॥ ३ ॥ नंदाच्या लालाचा लाल । पूजा घेऊ या पुष्पें लाल । गोविंदराव कवी रंगीलाल । घे फुगडी म्हणुनया ती लाल (?) । पोषाख करू लाल .... ॥४॥

लावणी ३०

प्राणसख्या सजणा सगुणगुणनिधी । नको पाडू अंतर या प्रीतीमधीं ॥ धृ० ॥ तूं चित्तचंचळ चाळका कीं नटनाटका । मनमोहना मन मोहून मनफाट कां । सोडुन वाटा आडमार्गीं मशि हटका । येकांतीचा लोकांती बोभाट कां ? । (चाल) बस खाली सांगते सख्या मी तुला ।

जीवेंभावें हा देह तुला अर्पिला । (चाल) निष्ठुर मन का झाले आज तरी तुमचे । घरींदारीं गांजिती मजला निमित्त याचे । नाहीं दयामोहो निर्दय हो अंतर तुमचे । भरज्वानी ही परतुन येइना कधीं ॥ १ ॥ का धरला मजवर राग सांग फाकड्या । माझ्या तूं प्रियकरणीच्या गड्या । मी जाइजुई तूं चमेलिच्या केवड्या । मी कस्तुरी तूं उंच अबीराच्या पुड्या । (चाल) मी सहाण तूं चंदन मैलागरी । मी मोती तूं सवदागर जोहरी । (चाल) तूं लाल सख्या मी आहे खाण हिऱ्याची । नाहीं मला गोडी तुजवांचुन दुसऱ्याची । घे हातीं खंजीर चाल येकांती वधी । नको पाडु अंतर इ० ॥ २ ॥ घरीं कल्पवृक्ष असून हो चिंतामणी । शोधाव्या कां गारा रानोवनीं । मी गुणभार्या घरीं असता स्वामिनी । परद्वारीं कां रतला परकामिनीं । सोडुनया हरिकथा सुरगायना । मंदधी पाहुन हर्षे सिंदीबना । लुब्धला कामी वेश्येच्या गुणा । टाकुनया अमृत कांजी बळेचि पिता । मुक्ताफळ त्यागुन व्यर्थ फुग्याला रिझता । सत्पात्र त्यागुन दान भुत्याला देता । अलक्ष हें लक्ष सख्या तुजपदीं । नको पाडूं अंतर या प्रीतीमधीं ॥ ३ ॥ गोविंदराव कवीच्या राजकवीच्या गुणा । वळखा या चतुराच्या खुणा । नरदेह हा क्षणभंगुर जायेजणा । मोहिली बोलविली जवळ कामिना । (चाल) ओवाळली पंचारती मुखचंद्रमा रूप न्याहाळी रति मदनप्रतिमा । वय ल्हान गुणवती जैसी रमा । (चाल) मन मिळाले एकं जिवांशिवाचे उभयतां लागलं लग्न सुउवाचे । जोतिशी मिळाली ज्योत हे दा (?) कवि भीमा मल्हारी होऊन लीन हरिपदीं । मग त्याचे (?) नको पाडु अंतर इ० ॥ ४ ॥

लावणी ३१

रात्री काहो दगा दिधला । कुठें तरी तुम्ही रिझला ॥ ध्रृ० ॥ न्हाउनया मी रुतकाळीं । शेज सख्या केली संध्याकाळीं । हुरहुर वाटे

हृदयकमळीं । शरीर करपुन झाली होळी । ह्या रांडांनी आगजाळ्यांनीं फितविले तुजलारे । रात्री काहो० ॥ १ ॥ गळ्याची शपथ सख्या तुजसी । सांग नित नित कोठें जासी । माझी सवत कोण विवशी । तुला भेटली तरी गवशी । प्राणअधारा त्यजुनी दारा । परद्वारीं रिझला । रात्री काहो० ॥ २ ॥ पैशानेंहि होऊन खोरी । जनलोकाला माझी चोरी । फजेती संसारीं दुसरीं । कोणी पाहेना घरींदारीं । शरिर खर्चले वांया गेले । वदनचंद्र सुकला । रात्री काहो० ॥ ३ ॥ गोविंदराव म्हणे तरुणी । सखी गुणवती असुन तव स्मरणीं । उपेक्षू नको रुतुभरणीं । आलिंगून संभोग करूनी । कवि मल्हारी शहर जुन्नरी । स्थळ शिवनेरी किल्ला ॥ रात्री काहो ॥ ४ ॥

लावणी ३२

रात्री काहो दगा जिवलगा मजविषयीं तुजमनीं । अपराध दावा बोलुनी ॥ धृ ॥ चतुर्थ दिन रुतकाळी । सख्या मी आनंदें न्हाऊन । रंगमहालामधें जाऊन । डागीन्यांची पेटी त्वरीत दासीपासून आणवून । नग जडीतघडीत लेऊन । तंग मशरूचें पातळ छेडकावी पाहून । नेसलें मी सरसाऊन । (चाल) आरशामधिं पाहिले । कपाळीं कुंकू दिसे चांगलें । की अंजन सोगेदार रेखिले । भवया जशा कमाना मुलतानी । अपराध दाव बोलुनी .... ॥ १ ॥ करूनया शृंगार बनले तुजसाठीं प्रियकरा । करी शेज मंचक शिरा । किनखापी या गाद्या गिरद्या, न्यारी न्यारी तऱ्हा । छत शुभ्र त्यासी झालरा । समयांचा चकचकाट प्रकाश मेणबत्तीचा बरा । आयने चहुकून तस्वीरा । (चाल) हार गजरे पुष्पाचे । सुवासिक झाड आगरबत्यांचें । पदार्थ उत्तम उपहाराचे । न्यूनता नसे, अनुकुलता सदनीं । अपराध दाव ।।२।। घडी पळ पळ रजनी जाता विलंब तुज फारसा । लागला सख्या राजसा । संकेतावत् याल ऐसा मम चित्ता भरवसा । तुवा वैर साधला कसा ।

(चाल) सुखामधिं दुःख दुणें । घेतले आज तुझ्या संगतीनें । मनोभंग न करती शहाणे । निश्चय मनोगत वळखुनी । दाव बोलुनी । .... ॥३॥ मार्गप्रतिक्षा करिता करिता अरुणउदय झाला । मग श्रम विशेष वाटला । शशी लोपता कमळण आच्छादती तशी गत मला । मुखचंद्र बाल म्लान सुखला । चरणासी लागली सखीनें प्रियकर समजाविला । रुत पंचम दिन साधिला । (चाल) गोविंदराव गुरुचरणीं मल्हारी तत्परू । संकट निवारी ईश्वरु । बहिरु बापू त्याचे भजनी । मजा करी रंग पटकुनी । रात्री काहो दगा .... ॥ ४ ॥

लावणी ३३

चट्टी पट्टी करून कव मारशिल तिंदा । टाकीलास ताळ फार येंदा ॥धृ०॥ तूं राहशील ज्यापशी त्याला लावशील दावा । होत चालली आतां थवा (?) । बळेच झड घालशी पाहुनी कवळासा पट्ठा । दाविशी लोकाशी निष्ठा । उणे वर्म काढिता घालसी कपाळासी अट्ठा । जणूं घेतला तुझा गठ्ठा । हरिभजन टाकून लागलीस तूं भलत्या नादा । टाकिला ताळ फार येंदा ....॥ १ ॥ चट्टी पट्टी काढायची काय दरकार ? । मजला पुसेल सरकार! । मी वाटे ते करी । तुम्ही राव फुकटे मैतर । ऐसें पाहिलेत फार । घरांत नाहीं खर्ची, बाहेर करता कारभार । तुकड्या वांचुन बेजार । नवऱ्यासी तुवा दिधी (?) पैसा कवटाळी (?) धंदा। .... ॥२॥ तोंडाचे आगळीनें फार बोलशील चरचरा । वाटेना लाज मनीं जरा । बेशरमीचा बुरखा घेऊन मिरवशील तोरा । बिघडले तूं पोरासोरा । पोट झाक पदरानें, कोणे फुगविला डेरा । घे औषध पाड परभारा । जन्मभिकारी आपुण करावी दुसऱ्याची निंदा । टाकीला ताळ ...॥३॥ एकांतीचें वर्म तुम्ही राव आणितां लोकांती । पडेना डोळ्यामधिं माती । नाहीं म्हटले म्हणून आला ह्या नष्टाईवरती । फजिती मांडलीस पुरती । गोविंदराव म्हणे म्हणु नये ऐशा ह्या गरती । अंती रवरव भोगिती । राघु

येमानीचे गडे तूं नको पडू छंदा । सर्वा म्हणे बाबा दादा । चट्टी पट्टी करून ....॥ ४ ॥

लावणी ३४

। पति गेले प्रवासासी का पत्र येईना । जर्जर त्याचे घोरानें पंजर झाले बाई । चंचळ चित्तवृत्ति पतिवांचुन करू काई । जाऊनया प्रिय करांनीं केली वसती कोणे ठाई । घरीं येईतों आधार नाहीं । संदेसा येईना ॥ १ ॥ गेल्या दिवसापासुनी उत्तर नाहीं आलें । मजवरी ममता असुनही निष्ठुर मन कां केलें । महालीं एकली त्रासोनी विरहव्याकूळ झाले । धाडुया जासुद जोडी बोहुनर (?) कोण्हा येईना । पति गेले प्रवासासी ....॥ २ ॥ जातेवेळीं भाषणें कशी केली एकांतीं । येऊ एका वर्षानें प्रिये न करावी खंती । सर्वही गेला विसरून संख्या पडे कशी भ्रांती । लक्षितसे अंतर्यामीं शुभदिन काही येईना । पति गेले प्रवासासी ....॥ ३ ॥ तेंच क्षणीं भगवंतानें दाविले नवल । आगमन केलें कांतानं । रुतकाळीं विषय ×× । आलिंगुनी गुणिवंतानं रुतकाळीं विषय वृष्टी । गोविंदराव कवींचें वचन, रहितअर्थ राहीना । पति गेले प्रवासासी .... ॥ ४ ॥

लावणी ३५

। स्वरुप तुझे गुलजार नखरे घडीवडी तूं किती करसी । चाल तुझी गडे झोकाखालीं पाहून अम्ही झालो खुषी ॥ ध्रु० ॥ उमर वर्षें पंधरा-मधि छेलछबेली खुब दिसती । तंग चोळी मशूची छातीवर गेंद गुलाबी मुसमुसती । करून सर्व शृंगार अंगावर जोहर भरले कुलमोती । भांगीं भरुन गुल्लाल मस्तकीं मूदराखडी शोभती । नेसुन पातळ उदी अंगावर शाल फाकडी खुब दिसती । नाजुक साजुक कळ्या जाईच्या देखण्यांत आहे खुबसुरती । हसुन आम्हासी बोलू लागले चित्त सखे हे तुजपाशी

॥ १ ॥ गौरवर्ण सांवळा मुखामधीं विडा रंगला खुबलाली । गतीगतीनें ठुमकत जाशी रुप धरुया मतवाली । कांती तुझी सकुमार लहान वय उंबर दिसती ही कवळी । पातळ पुतळी ठुमक ठेंगणी रसि निंब्रोणी भरियेली । बिचव्यांचा झणकार गळ्यामधिं हार पुतळ्या चाफेकळी । हातसर कंगण्या दोर पाटल्या उटी रेखीलीसे पित्रळी । आशा लागली फार तुझी सुंदरी घुंघट घेऊनी किती जासी........ ॥ २ ॥ वेळा, बाजूबंद, गोट, नाकामधिं नथ सरज्याची माशुकडी । गुणवंती तूं केवळ मैना, घेऊ फुलाची हाती छडा । नयन चकोरा तुझे मानसी तीर लक्षुन हृदय जडी । व्याकुळ झाला प्राण बावरे आतां मनांतील सोड अढी । बहार तुझे ज्यानीचा एकदां संग घडु दे खडोखडी । ही भरज्वानी जाइल निघुनी परतुन येईना हीच घडी । अजुन तरी धर तर्ख, घेऊद्या अर्ध घडी एकल । (अपूर्ण)

लावणी ३६

रंग तुझा खुशरंग पाहून झालो दंग सखे साजणी । हसुन आम्हासंग, बोल ताजवातोल प्राणवदनीं । उर उभार कदंबर सुंदर नादर सुभावणी । मृग अर्धाक्ष नेत्र कटाक्ष मुर्च्छागत प्राणी । स्वर मंजुळ मधुर, अधर तुझे पवळ्यावाणी । लाखमेंदी हिल्लाल लाल रंगला विडा वदनीं । लाल चुनडी लाल काचोळी लाल कंबरेवर उंच गजनी । हसुन आम्हासी बोल ताजवा तोल .... ॥ २ ॥ अंगाकडे पाहुन आंचल घेऊन घुंघट घेसी । जरा आम्हाकडे पाही फिरून मग जा घरासी । मदनाची पुतळी तनुला जक लावली । ओतीली कांब ओतली जैसी । धन्य तुझें तारुण्य उगे आणले सुरसभेशी । दैवी कथलें रूप पुजिलें गौरी शिवपुजनी । हासुन आम्हासी बोलता ॥ २ ॥ पामर (?) अभिमान नको गुमान करु, भरीज्यानी । धन जोबन जशी स्वप्नाची करारी । सावध हो सावध हो करी सार्थक या

संसारीं । मुसाफरासी संग अंग झिनत्री परोपकारी । ज्ञानदिप लाऊन प्रित निभाव आव भजनी । हासुनीं आम्हासी .... ॥ ३ ॥ चित्तापुन हो धीट । काहाड घुंघट । सोड भ्रांती । जाईल वांया काया । मरण होईल त्यावरती । गोविंदराव म्हणे हाच करी शेवट धरी हाती । ऐकून शब्द बरा घरा मग नेला एकांती । स्वरूपीं लावुनि लक्ष सखा भोगि ती दिवसरजनी । हसुन .... ॥ ४ ॥

लावणी ३७

जारे आणा तो गुणी पतिविण शेज सुनी ॥धृ०॥ तारुण्यांत भरतनु कवळी चंपककळी । बनले मी पिवळी । कुच कंचुकीत कसकसु आवळी। विषयविलासी नाहींत जवळी । (चढाव) तळपतळप जी ज्याई मेरा ज्याता होई साजनी । माशुक जोबन तरसरहे झुरत रात हावरदिन । गेला की रे दुःख करूनी अरे राजा पतिविण शेजसुनी ॥ १ ॥ सदनीं कांता दिसे किलवाणी । शोध कराहो जाऊनशानी । लेहून देते पत्र निशाणी । करुणाकर तो आणिल कि ध्यानीं । (चढाव) अटकरनाटकमे सकी । देखो जा गुजरात । कासद मिलना कलसे । देवो पियामें हात । भेटलकी हृदय धरूनी । पतिविण शेजसुनी ॥ २ ॥ लिखित पहाता सुकुमारारे । मजकुर साराकुल अवधारे । मग होईल अवघी तयारी वेळ मुहूर्त लवकर निवारे । (चढाव) कुल न कुल केवा सते कर रहे तकदीर । खबर पोहोचाके खुले आज बंदगी दीर । आणिल को दौलत दुणी । पतिविण शेजसुनी ॥ ३ ॥ प्रेमें आनंदें स्वामी घरासी आले म्हणुनीं होती मंदिरासी । प्रिती कवटळी- तालेवारासी कमळ लंपट अंतीं भ्रमरासी । (चढाव) गोविंदराव कहे खुब अजब तऱ्हेका ख्याल । बोले भवानी रामचंद्र बजाये चंग वर ताल । करी आदा महीपत गुणी । पतिविण शेज सुनी ॥ ३ ॥

लावणी ३८

शब्दमान तुन्ही करा । चला मंदिरा प्रेकरा ॥ धृ० ॥ करून प्रीत जिवलगा माया लाऊन का देता दगा । कार्य करावे जे गा तुम्हाविण मजला कैची वगा । (चाल) दुबळीला दंडिता । तुम्ही श्रीमंत सगुण मंडिता । सख्या गुणीजना चतुर पंडिता । प्रीतीचा ओघ कसा खंडिता । (चाल) ऐका प्राणेश्वरा मम योगिणीच्या योगेश्वरा । पार्वती प्रिय जशी विश्वेश्वरा । लक्ष्मीकांता सर्वेश्वरा । (चाल) बहुतापरी समजाविते लक्ष लाविते सख्याचे पाई । रुक्मीणीपति केशवा मी तुमची सेवा चुकले नाहीं । तीळप्राय काय अन्याय ये हाडावर घाय दुःख न साही । विनंती ऐका करुणा करा ॥ १ ॥ सगुणगुणीमाणसा भाक देऊन का अनमानसा । हा जीव खुर्बानसा काळजी पारखटीन्हा (?) जसा (?) (चाल) दुःख मला साहेना । शरिरासी काचना । जबून ह्या इष्काची जाचणा । नेम निश्चय हाच साचना । भोगवी रोग रोग सासना (?) । (चाल) ऐसें कां केले ? तरी पाहे आंतरीं । काय चुक झाली । आज मर्जी दिसतसे तप्त, नेत्र संतप्त चढली लाली । तुम्ही सोडा मनचा राग नका करू त्याग, चला रंग महालीं । दिल्या वचनाचा शेवट करा ॥२॥ चला चला भुवना सुख सोडून सेविता वना । नरदेह पाहुणा करून घ्या × × जाका भावना । (चाल) मी तुमची आंगना । जशी देवाची देवांगना । उभी सुरपतिपुढें रागीणा । सदा रंजवी मनोभंग ना । (चाल) घरीं कल्प वृक्ष असुनया मजला दुर्भीक्ष कां । प्रतीला परमेश्वर साक्षिका । भोजनी विवशी कां मक्षिका । (चाल) राजसा राजअंबीरा गुण गंभीरा किती समजाऊ । नाहीं साळुकी (?) भोपळा दोन चिरफळ्या करूनया दाऊ । तोडुन जन्माचा ळळा कोणाच्या गळा पडाया जाऊ । तुम्ही चित्तचंद्र अमृतकरा ॥ ३ ॥ कपट्या निर्दया प्रार्थीता द्रव न येई हृदया । आत्मवत् भूतदया

जाणूनी मजवर कीजे दया । (चाल) नये दिसुन गर्वसा । पाहीला नारीचा भरवसा । पार प्रिती सागर तरवसा । मग सोडीला क्रोध सर्वसा । (चाल) आलिंगीली कामीना । धरून हृदयासी गजगामीना । कांचनावर सारला मिना । तशी शोभली गृहस्वामिना । (चाल) ल्याली सोळा शृंगार जडीत भूंगार रंग रूतकाळीं । धुंडून सारे शहर फुलांचे हार गुंफिली जाळी । गोविंदराव कवि चातुरा डफावर तुरा लाव नितकाळी । कवि मल्हारी छंद करा । शब्दा मान तुम्ही करा इ. ॥ ४ ॥

लावणी ३९

मला होता भरोसा फार । सख्या तुझ्या पाई रे झाले खोर ॥ धृ०॥ असुन आपल्या स्वामीची जाया । लंपट झाले पाहून तुला सखया । अर्पण केली कोमळ काया । खर्चिलें द्रव्य अपार । सख्या तुझ्या पाई रे झाले ख्वोर ॥ १ ॥ स्वरुप तुझे पाहुन रिझले । म्हणुन आपल्या पतिशीं त्यजिले । भोळ्यापणें स्वांगीं झिजले । सांडिला म्या संवसार । सख्या तुझ्या पाई इ० ॥२॥ तुम्ही कळला जो कपटभावा । भोगीली मजलागी करून कावा । आतां वसशी धरून दावा । तुज ठाई केला थार । सख्या तुजसाठीं इ० ॥ ३ ॥ शरण आले गोविंदराया । करा मजवरी कृपेची छाया । नाहींतर जी जन्माची वांया । उतरा पहिले पार । सख्या तुजसाठीं० ॥ ४ ॥

लावणी ४०

करूनिया प्रीत मशी । कां इतराजी अशी, अपराधी तुझी मी काय सांग तरी । लाऊनि माया निर्दया होशी सांगा जी ॥ धृ० ॥ मन हें तुजपासी तुझे फार ठाई । ममतेच्या गाळामधिं फसली गाई । पुरे पुरे संगतिनें तुझ्या झाली भरपाई । अरे ळळा लाउन गळा । असा कापितोस की रे । येऊं न कणव तरि मनाला । अशी तुझी मरजी रे ।

करूनिया इ० ॥ १ ॥ वर वर जाशी करून कार्यापुरता । जरा बे (?) गो मी (?) तरी । घडिमधिं फिरता । सर आतां त्रास आला । मन तुझें धरता । अरे काळजास । कसा हात घातलास । सख्या तूं रसिक रंगबाजीरे करूनिया इ० ॥ २ ॥ (३ रें कडवें फाटलें) अग सखे कां करसी खेद वांया । सहज विनोद केला अंतरीं माया । शपथ गळ्याची, विचार गोविंदराया । मल्हारी बहिरू म्हणे भोगावे तिसी ने मंदिरीं आतां । करी रंगबाजी रे । करूनिया प्रीत इ० ॥ ४ ॥

लावणी ४१

माझ्या प्राणसख्या राजसा । तुजवर माझा कीं भरवसा । जाऊ नको दूरल्या देशा । अर्जी करिते । नूतन वय बाळतनू अंगीं मदनाचें भरतें ॥ ध्रु० ॥ पूर्वीपासुनया आजवरीं । मजवर ममता ठेवली बरी । जशी मिश्रित शर्करा क्षीरीं । प्रीत या परिची । लाउन मजला विषय चटक । तुजला कसें आठवले कटक । एकाएकी करिता तुटक । कशी मी कंठू । आजन्म सुकृत असता मग्न । योग होतो कैसा जघन्य । वाटे कडकडले हे गगन । जणु मजवरते । नूतन वय इ० ॥ १ ॥ अबलख रंग देखिला सुरंग । विशाळ लोचन तीक्ष्ण तुरंग । उपमे जैसा तुमचा कुरंग । रेखिव चित्रीं, रंभास्तंभ तद्वत कवळा । त्यावर थाट करूनिया ढवळा (?) आपण कर्दळीचा (?) आवळा । गळ्यांतील हार । त्यावर पाहुन होती सर्द । तलवारीचे येक सुमत (?) । गुणी खसुर (?) तेजी । नूतन वय इ० ॥ २ ॥ नाहीं कांहीं निवता सदनीं । तवर भोगुनि ध्या भर-अमदानी । वारंवार कितीतरी वदनीं । मी बोलुन दाऊ । जोबन किल्ल्या-वर कर हल्ला । सर झाल्यावर होइल सल्ला । आपण स्वतःसिद्ध कुल-कल्ला । करतृत्व करते । बसला रुपासारखा जुवा । अशामधिं उडवुन द्यावी हवा । एकांती नेउन घालावी । चुंबन ध्या जी । नूतन वय इ० ॥ ३ ॥ राहिला छेलछबेला गडी । उभवली आकाडशांची (?) गुडी ।

सजली अठोकाठ फुलझडी। मांडली बाजी। नारिसी झाली फार खुशाली। वाटी लोका शाल दुशाली। गोविंदराया तुमच्या चाली। ह्याच तऱ्हेच्या। मल्हारी बहेरु लावणी चातुर ऐकुनया मानव्रती। बापु रती मतिनें गाती शोधुन पुरते। नूतन वय इ० ॥ ४ ॥

लावणी ४२

वया सारखो वरतणूक कर आजपून साजणी। चाल जनासी भिऊन राही भ्रमांत चढेल पाणी ॥ धृ०॥ कळा कुशळता रूप रंग वसल्या तुझे साही। परी तेथें प्रचित घेई। लक्ष लावी इश्वरपायी। त्रास मानीं आंतरीं बरा संसार ××। म्हणे पतिचा हात पाय येतिल येहीन ××। तिकडील आतां इकडील मजा घ्यावी डौल ×× शहाणपणाच्या शाबासी घ्यावी। वाकड पाऊल खालते ×××। चाल जनासी इ. ॥१॥ इष्टत्वाचे रितीनें आम्ही शिकवीतो। विषय वर्जी। दूर करी दूरगुणा रक्षी कांताची जपुन मर्जी। जे तुझी स्तुती करिती निंदा दुष्मान पाजी। धणीनपणा तुजला सुखाचे दिवस पुढें मोजी। खरासि टोणपा इषारतेसे भडके तेजी। बुद्धीबळे खेळता होतो प्याद्याचा सहज फर्जी। साधारण राहात जा नको उकलू तिंदा वेणी। चाल जनासी इ. ॥ २ ॥ घडले आजाणतपणें, आतां शिराहून ओझें उतरी। दान धर्म दक्षणा कर बस पुण्याचे पारी। पतिव्रता दुनियांत कचित म्हणतात घरोघरीं। शहाणपणा मधीं शाव (?) होय हाच लाभ करी। केलें कर्म जिरवीता गोष्ट फिरवीता लपंट भारी। क्षमा शांती मर्यादा धरी गुण घेति परभारी। साधु संभावित चांगला गुरू करगे ब्रह्मज्ञानी। चाल जनासी इ. ॥३॥ होती सुंदरा गुणी वर शतगुणी बोध झाला। विषयाचा त्याग केला। अनुतापें तापुन कंठ सद्गतित प्राण थिजला। कर जोडी संतासी करावें पावन पतिताला। गोविंदराव गुणीराज पदीं लागुन भावें पुजीला। शरणांगत दीनबंधु मार्ग भक्तिचा दाखविला।

मल्हारीचें कवन मोत्याचीं जशी वत्रणी। बहीरू बापू किती आर्थ आक्षरी शिरा जडणी।

लावणी ४३

पति गेले परदेशा कांहीं येइना संदेशा। कुठें केली छावणी॥ धृ॥ पाटिलबाबा संगे गेले आमचे जिवलग। त्याला झाली सहावर्षे। दिला होता मला पदर। पति माय बापा वदर (?) पुढें होती अवकाश आज उद्यां घडल सुत्र। इतक्यांत आलें पत्र। तेंव्हां आणले ध्यानासी। मग मिळून व्हान थोरू। बाई केला विचारू। पति मोठा भीडसरू। सजविला चपळ वारू। मला कळला समाचारू। जिव गेला उडोनी ॥ १ ॥ पति जातो लष्करा। माझा जिव झाला व्रारा। वाटले परम दुःख। अंगि नव्हती डळमळी। लसलशीत ज्यानी कवळी। देखीले नाहीं सुख। केलें मदनानें धुंद। नाहीं घडला संबंध। करी मनचे मनीं शोका। भरभरू येई छाती। भिरभिरा पाहे भवती। निसंग होऊन चित्तीं। म्या केली विनंती। ऐकाना प्राणपति। केली उदंड मनधरणी॥ २ ॥ हे विषयाचें सुख। कांहीं नव्हते ठाऊक। नेणतपणाच्या गोष्टी। भर दिला लोकांनीं। गेला हिन्दुस्थानी। आतां कधीं पडेल दृष्टी। कवळी माझी काया। चालली व्यर्थ वांया। कसें केले परमेष्ठी। धन्य कर्माची करणी। सुंदरा नवि तरणी। तन बागांतील खिरणी। आली मदनाची भरणी। दोहिल्यालाची (?) धरणी। नित करती जाचणी॥ ३ ॥ आग लागो जोडीला। दूर देशा दवडीला। जिवीचा जिवलग प्यारा। कुठवर वाट पाहू। कितीतरी तरी मन समजाऊ। धाडिलें पत्र लष्करा। हरवडी हाची छंद। तेव्हां आले जासूद। बहु खुशालीच्या खबरी। नदीवर उभी स्वारी। कर लवकर तयारी। पुढें जाते सामोरी। दोही रस्ता भीड भारी। मग आणली सारी। आले मिरवत निजभवना ॥४॥ मग आनंदली नार। करी सोळा शृंगार। जशी कमळण रुतवंती।

नेला भवर एकांती । प्रीतीनें कवटाळी । फार दिवसाचा हेत । पुरविला मनोरथ । बोले गोविंदराव साळी । उभयता काम गर्जी । वरवर सुंदर वरड वर्जी । संशय फिरली मर्जी । तनगड केला सर जी । गाती जुन्नरकर राणू देवजी वाणी ॥ ५ ॥

लावणी ४४

लावण्य रत्न खाणी । गोरी जशी चंद्राची कळा, रुप रेखीले बत्तीस लक्षणी । .... ॥ धृ० ॥ ब्रम्ह्यानें हातीं घडली त्याली सोळाही शृंगार बाहुली नेत्रामधिं जडली । तैसी छाया पडली श्रीफळासारखे कुच तंग चोळी वर तडतडली । विड्या लाली चढली तोंडल्याची रंगरंग जोत अधरावर भिडली । (चाल) जसें आम्रफळाचें बीज तशी हनवटी । गोधळी बाळविषा (?) दिसें गोमटी । वृंदावनासारख्या हुया चाऊटी । रंगला रंग मेंदीचा चतुर गोमटी । पहा अशेचा शृंगार गार चतुर भूषणी । लावण्य रत्न खाणी........... ॥ १ ॥ सकुमार तनु सुरंग चंपकासारखा वर्ण जरी पातळ कुसुंबी रंग । केकती सारखे अंग । घमघमित सदा धुनकार त्यावरी डुले सर्प अनंग । बत्तिशी बहुत खुषरंग गुलाब फुलला हारोहारी फकड्यांत (?) धडी आबंग (?) । (चाल) करकमळे कमळाकार परम साजरी । हिरकण्या जडित मुद्रिका शोभल्या वरी । समतोल पाहुन शृंगार सुंदरा करी । धनकर त्यानें निर्मिली मोर्त गोजिरी । अस्मानीं तुटली तार । तार तार गगन गामिनी ॥ २ ॥ स्वरूपानें परम सुगडी कोकिळेसारखा कंठ गीतगायनी बहुत आवडी । बोलता शब्द मोठडी रावी सारखे नाक नथ सर्जाची ती लालडी । (चाल) चालते चाल धजदार जशी हत्तीणी । पायीं बिचव्याचे झणत्कार उठे मधुनी । रेखली हो सुंदर नार सर्व भूषणी । संपूर्णगुण विरळा पाहे शोधुनि । फळ पुष्पें पक्षी चार चार चार । द्वादशी गुणी ॥ ३ ॥ लावण्याची लहरी लाखामधीं विरळा कार्य एक राधेची करील

सरी। थेडीला (?) सरवा श्रीहरी कृष्णासि करिल संवाद पूर्ण पुण्याई जन्मांतरीं। गोविंदराव करी शाहीरी जोडा घोडा संपदा दैवी असेल ती खरी। (चाल) अज्ञान भिमा मल्हारी गति लाधली। चतुराई करून रतिरति पिसुन लाविली। नवी चाल तऱ्हा बहिरूनें धरून दाविली। विठू रंग करी गुलजार मजा पाहिली। कवी राया ऐसें ख्याल ख्याल राव गाऊनी लावण्य रत्न खाणी .... ॥ ४ ॥

लावणी ४५

राजस्थानें कन्या पद्मीनी बत्तिस लक्षणी। तिनें वाणीपुत्र पाहुन गोविला वचनीं ॥ धृ० ॥ राजकन्या रुप सुंदर। तारुण्यांत आली उपवर। वाणीपुत्र महा च्यातुर। (चाल) दोघे जाती बराबर नित्य लेह्याला। त्या पंतोजीणें धाक होता घातला। तो वाणीपुत्र शिकवी मदन मोहनेला। मग वाणीपुत्र म्हणे मदन मोहनेला। मी शिकविन परंतु काय देशील मला। म्हणे मागशिल मी तेच देईन तुला। दिली भाक हातावरी हात मारीला। हे काय आहे सांग तुझे मनीं। काया वाचा इमान तुझे चरणी ॥ १ ॥ विद्या शिकवी कडाकड। राजकन्येशी तुटेना भीड। येरु येरासी बोलती गोड। (चाल) माझी पुरवावी आवड म्हणी सुंदरी। राजकन्या म्हणे आई (?) रुना कोरी (?)। पितयासी हळहळ केला वर विचारी। पत्रिका लिहून पाठविल्या मुलखावरी। मातेनें साहित्य केलें अवघी तयारी। मी पतीआगोदर तुझे मनोरथ पुरवी। हा निश्चय माझा, भोगीन तुजलागुनी। घे भाक माझी बेचाळीस बांधोनी ॥ २ ॥ ऐसा झाला हो करार। थांबविला वाणीकुमर। पुढें जवळ आलें स्वयंवर। (चाल) लागल्या हळदी झाला गजर मदनमोहनेसी। ते साडें झालें वरात आली घरासी। मग वधुवर उभयता एकांतासी। नानापरी करी कसें लास्य येरोणयेरासी (?)। तेव्हां अवचित सय हो झाली मदनमोहनेसी। मग म्हणे पतीला माझी विनंति ऐसी। म्हणे म्यां भाक दिधली

त्या वाणिपुत्रासी । मी पतीआगोदर भोगीन तुजलागुनी । अशी दिली भाक मी गुंतले इमानीं ॥ ३ ॥ पती म्हणे ग वचनासाठीं पितापुत्राच्या पडल्या तुटी । राम वनवास भोगी संकटीं । (चाल) आतां जाये जाये गोष्टी वचन उगवाया । करी सोळाही शृंगार जाय त्या ठाया । हातीं पंचारती संगे घेतल्या सखया । बाहेर निघाली अर्धे रात्रीच्या समया । खापऱ्या चोर आला होता चोरी कराया । त्याची अवचित पडली गांठ मोकली धाया । तो म्हणे कोठें जाता गे कोणा पहाया । मग मदनमोहनी लागे त्याच्या पाया । मी जाते आपल्या सजणाला भेटाया । मी जाते रे तशी येते रे परतुनी । दिली क्रिया वचन तस्करा लागुनी ॥ ४ ॥ ऐसा झाला हो विस्तार । पावले सोमदत्ताचे घर । निजला होता वाणी कुमर । (चाल) त्याशी हाका मारी सुंदर जागा केला । तो सावध होऊन पलंगावर बैसला । मग मदनमोहिनी काय बोले त्याला । म्या पूर्वी भाक दिधली तुला । करी अंगसंग उगवून ध्यावे बोलला । तो म्हणे तुझ्या पतीनें कसा ग निरोप दिला । त्याचा नाहीं भरवसा, असेल मागे आला । ती म्हणे आले आपल्या स्वामीची आज्ञा घेऊनी । कांहीं जुदा भाव नाहीं त्याचे मनीं ॥ ५ ॥ वाणीपुत्र म्हणे ग बाई । पावलीस वचन झालीस उतराई । आता आल्या मार्गानें जाई । (चाल) तुझ्या पतीला उपमा नाहीं धन्य बुद्धिवंत । तूं नार मिळालीस त्यालागुणी पतिव्रत । ज्या घरीं स्त्रीपुरुषांचें एकचित्त । तेथें लक्ष्मीसहीत राहे भगवंत । मग काय करिता झाला सोमदत्त । दिले अलंकार भूषणें सख्या सहीत । दोन अविंध मोती दिधले बेकिंमत । सांग तुझ्या पतीला रामराम असुदे हेत । काय जुदा भाव आणु नको मनीं । ही तुझी पत्नी माझी आहे जननी ॥ ६ ॥ तिथून फिरली त्याच वेळे । लागले खापऱ्याचे डोळे । वचनाप्रमाण आली वेल्हाळ (चाल) खापऱ्या लपाला तात्काळ एकीकडं । मग मदनमोहनी पाहे चोहकड । त्याशी हाका मारी गेला कुणीकड । मग आला खापऱ्या येऊन पाया पड । चोरीचें धन ठेवीलें तिच्यापुढं । मग आले पती वैसा

गेला विवाड (?) वेताळ म्हणे विक्रमा उगवी गाड। या चौघामधीं सत्त्वधिर कोण करी निवाड। बोले गोविंदराव साळी जुन्नरकर ज्ञानी। तिचा पती सत्त्वधिर सत्त्वाची खाणी।

लावणी ४६

हरीहर भज सजणा नको आपकीर्ती दाऊ जना॥ धृ ॥ तुझ्या पदरीं वडलाचे नांव जुन्या चालीवर चाहती गांव। सुलक्षणी सर्व करूनीया वाव। धरसी परस्त्रिठाई दृढ भाव। कवटाळ्या रांडाचा माव। मोहीले तुला दाऊनी आवभाव। पाहुनी धनवानाला हाव भाव करून मग बहुत बनाव। आहे तंवर लाऊन जीवभाव। उणे पडल्यावर ठेवीती नांव। उडाले मैतर सरली धाव। लुच्चेबाजी बुद्धीबळाचा डाव। येइल फिकेपणा नको अपकीर्ती दाऊ जना॥ १ ॥ मी तरमळते मनांत। आपलें रूप पाहून दर्पणांत। नवीनवती आली तारुण्यपणांत। कुचाग्र आचळे नाहारपनांत (?)। किती विनवु तुज मधुरपणांत। नकळे गे घडले जे पोरपणांत। ती रूढी हानी करील थोरपणांत। नाहीं मजा सखया दुर्जनांत। सोडुन वाट कुमार्ग वनांत। ते जाशील चोर जार दुरवनांत। सदैव म्हणवीत होते मनांत। विषयापाई बसले उन्हांत। मग करती रोजना। नको अपकीर्ती दाऊ जना॥ २ ॥ संगत साधुजनाची स्वकिार। दुरवृत्तीचा मोडील विकार। करू नये पाप्याचा अंगिकार। देवधर्मासी कारण कर। पुढें जरी कमी दिधले सकार। तरीच पुंण्यांशी अपरंपार। नरदेह दो दिवसाचा आकार। भर ती पाती परउपकार। वेद आज्ञेसी देइ अकार। भवसिंधु-तीळ तारू हाकार। सत्‌किर्तीची पुडु दे पुकार। त्याग कुवासना॥३॥ तसें सिमा झाली सख्या आजपासुन। तुम्हाला आवड चित्तापासुन। वर्तत जा तिकडे आसुन। कवि गोविंदराव किति पाहसी कसुन। व्यर्थ प्रीतीचा बोब आला मनीं दिसुन। सखे तु जवाणी कांता असुन।

दूर जाऊ लागले फसुन। कवन मल्हारी करीती निसुन। सुलक्षीत अक्षर जडले ठसुन। आठवी गुरुचरणा। नको नको फंद कोर्ती दाव जना।

लावणी ४७

नहाण आल्याचे आधीं पति गावा। कसें गेले नकळे कर्माचा ठेवा ॥ धृ ॥ लहानपणीं मी नव्हते लइ गरजी। आजवर मजला नव्हता विषय जी। गडे मायबापाचे सदनीं वापर जी। आवडती एकुलती एक जीवापर जी। तेव्हां जर कळते तर पायाची रजी। हक्कानें राहते सन्मुख तत्पर जी। रुतसमय सखे हा जीव किती अवरावा। कसें गेले नकळे कर्माचा ठेवा ॥ १ ॥ रूपगुणसंपत्ती ईश्वरें दिधली पुरती। लावली माया अंगीं मदनाची भरती। सासुसासऱ्याची प्रीत मजवरती। मोत्या पवळ्याचे डागिने करती। मोहनमाळ गडे बोरमाळ छातीवरती। पैठणी भडक सखि अवरुनिया धरती। सुखांत वर्तते परंतु दुःख हो साथी ॥ २ ॥ न्हाते दरमहिना नवती मुसमुसती। नेत्र लाल अंगी आली विषयाची सुस्ती। उत्तम पदार्थ विषप्राय दिसताती। विषयव्याप मनीं हा कधीं चढेल हातीं ?। बाई या शहराची कठिण ग वस्ती। कुठवर मी टाळू कुंटणिच्या गस्ती। सौभाग्य सुखाचा जोडा आणवावा। कसें गेले न कळे इ० ॥ ३ ॥ गोविंदराय म्हणे हरिहर जो कर्ता। धरि भाव तयापदीं येइल तव भर्ता। उपाय स्वल्प दुजा नसे ग यापरता। पांडुरंग भक्ताच्या पुरवील ग आर्ता। बहेरु बापूचें कवन छंद सुरता। गाती सद्गुरुचा वरदहस्त पुरता। गंगारावजीची जोड बडुत अनवा। आदा दाउन विष्की रिझविती नित्य नवा। नहाण आल्याचे आधीं पति गांवा इत्यादि०

लावणी ४८

गुणीजन रावा नयनी मज दावा। साधुन गेला कसा दावा ॥ धृ० ॥ स्वामी माझे मज × भरले। इश्वरें बाई ऐसें का केलें। प्राण प्रियाला

वदना लोपविले । मोहफाशी शेवटीं गुंतविले । वियोगानळानें उभीच जळाले । जीव जातो चित्त व्याकुळ झालें । कुठेंतरी जाऊन सखा तो पहावा । साधुन गेला कसा दावा ॥ १ ॥ स्वरुप तयाचें स्वमुखें काय वानु । निर्मळ मूर्ती द्वितीय भानु । अंतरली मजला कामधेनु । ऐके करि (?) उभया तारी कवणु । त्याचे मनीचे काय मी जाणु । कापुन गेला कसा अंतीं मानु । तनु ही जाईजुई पाला हिरवा ॥ २ ॥ काळीज माझें प्रवासी नसावे । शिरीं असता मग हीन दिसावे । गुज जीवीचें कवणाला पुसावें । अति प्रीतीनें शेजारीं बसावे । दैवहीनातें सुख कैंचें आसावें ? । व्यर्थ कोणावर काय रुसावे । प्राण आतां हा वाटतो जावा ॥ ३ ॥ रुदन करी तो चंपककळिका । दीर्घस्वरें हंबरे आला हुंदका । दुःखीत सारी ऐकूनया शोका । पाठविला त्वरें लेहून रोखा । गोविंदरायें दिधली अभयनौका । पति येइल घरीं, घाबरी तरी का ? । मजा करितो शिवराम तरीं आनवा । साधुन गेला कसा दावा ॥ ४ ॥

लावणी ४९

प्रियकरा तुम्हाविण गांव दिसे मज वाव । कोणाच्या पदीं भाव । ठेऊ लइ सख्या त्यागून नका जाऊ ॥ धृ० ॥ आजवर शरीराचा मान होता लहान, म्हणून अनमान विषयकार्या । आतां पालटली चर्या । वर्षा काळीचा पूर दिसे भरपूर तसा मज नूर चढे सखया । कामें वेष्टिली अति काया । गोजरे रूप चांगट । सिंहकृत कट । नाहीं उद्धट वर्णावया । नांव करूनी पार तीरासी कैक इच्छिति मला पहाया । सौभाग्यसुखाची नांव करूनी पार तीरासी लावू, नका बुडवू सख्या त्यागुन नका जाऊ ॥ १ ॥ प्रथमच रुत प्राप्त ती कोडं करीती ओटी भरती आनंदांत । सासु सासरे सुख भरींत । नणंदा जाऊा भवत । आणी कइकती मिळून बसती विलासांत । कुंकु हळदी लावितात । आंगप्रभा पिवळी पुष्पजाळी । मायबाप सुखी धन-ढिळा भाळीं शोभिवंत । हिरे चमकती कोंदणांत ।

वंत। नसे कांहीं वाण करिती सनूमान बहीण भाऊ। सख्या त्यागुनी नका जाऊ ॥ २ ॥ सुख सोहळा ऐसा पुन्हा नये सजणा म्हणुन प्रार्थना तुझी मी करते। पदर लडिवाळपणें धरते। ईश्वरइच्छे संकुळ द्रव्य विपुल असे पुरतें। आहा सुज्ञ तुम्ही सरते। विकल्प मनापुन सोड बोलुनी गोड पुरवी मम कोड आर्त सरते। क्षेत्र अवयवा आले भरते। शिणगार करूनया साज शिरीं शिरताज। तुम्हाविण आज कोणा दाऊ। सख्या त्यागून नका जाऊ ॥ ३ ॥ करुणावचनें मोहून। सखा राहवू गेली घेऊन रंग महालीं। मुखचंद्र कळा चढली। नग वस्त्रें लेऊन सकुमार हर्ष मनीं फार शेज ती त्वरें केली। विडे घेऊन सुखें रतली। गोविंदराव गुणीजन कविमतिला लाधली। धरण ही नवी, रसिक जडली। अर्थ अक्षरें शिरा बनली। बहेरु बापू हारभास। करति छंदास त्यजुन द्वैतास भक्तिभाऊ। सख्या त्यजुन नका जाऊ ॥ ४ ॥

लावणी ५०

वदनाचा ताजवा ग तोल। प्रीतीनें बोल। सुरतीवर मोल खरीदी सौदा। आम्ही गरजवंत अंतरीं नको धरु पडदा ॥ धृ ॥ नाजुक चाफ्याची कळी। रूपआगळी। मदन पुतळी। ××× । जशि डोळ्यांतिल बाहुली। रेखिती चित्रीं। देवानें दिधलें रूप। तेज अमूप। देखिलीं चित्रीं। तुझ्या वेळीं रिकामा होता कळसूत्री। (चाल) कळसूत्री घेतली मोहोनी। देहगात्री गेली भेदूनी। लिही पत्रीं। लिही पत्रीं। पाहे शोधुनी। लेही पत्रीं लेही पत्री सविस्तर। काय उत्तर होईल अखेर रंग हा गरदा। आम्ही गरजवंत अंतरीं इ० ॥ १ ॥ वचनानें मोहली नार। झाली उदार। प्रीतीची वार लागली वर्मी। जन हसेल म्हणुन बोलते मी शरमाशरमी। तनमन तुम्हा अर्पण परंतु जन खोटे हे भरमी। पाहताच मला म्हणतील रांड अधर्मी। (चाल) अधर्मी म्हणती सकळ बेकर्मी। बेकर्मी लिहिले न टळें हें कर्मी। हे कर्मी

दैव अनकुल हे कर्मी पाहिजे फळ । कुंकु वरदळ (?) जिवावर गुरदा । आम्ही इ० ॥ २ ॥ सजणानें केला सल्ला । म्हणे तुम्ही चला रंगित बंगला । पहा वर नक्षी । मंदिरांत घेऊन गेली चतुर हरिणाक्षी । षड्रस वाढलें अन्न । बहुत मिष्टान्न मुसाफर भक्षी । लाविली प्रीत भूमी सूर्य अग्नि आहे साक्षी । (चाल) आहे साक्षी तो भगवान । त्यापक्षी अधिक आहे कोण । पहा लक्षी । पहा लक्षी । गेले मिळुन । लयलक्षी । राहिलो वाव । जिंकिला डाव । निजविल्हा नरदा ॥ ३ ॥ गुणी गोविंदराव कविराज । धन्य महाराज । देखिली आज । तुमची दस्ती । विरळा चतुर जे असती, अर्थ समजती । राणु देवजीची मती । धरून यादी ती । मल्हारी रति । करूनया गाती । शिवनेर किल्ला जुन्नरठिकाणीं वस्ती । (चाल) राव वस्तीं कीं प्रबळ । मज दिसती सुजाण सकळ । चित्तवृत्ती कीं निर्मळ । बहिरू गाणार धरून आधार विष्किया वार लागला गुरदा । आम्ही गरजवंत इ० ॥ ४ ॥

लावणी ५१

वारुळासी चालली बावरी ठुमकत ठुमकत चतुर गोरटी । नेसुनया शेलारी जरी, घेतली केशरी उटी ॥ धृ ॥ श्रावण शुद्ध पंचमी नागपूजनाशी जाति कामिना । सर्व नगरच्या नारी मिळुन, सुंदरा राव गजगामिना । प्रभा पडे चहुकडे नभामधीं चमक झमकति जशा सौदामिना । (चाल) डुबचौकामधींच्या (?) बरी शोभति दिव्य देह पद्मीणा । चित्त शासनी आलंकार भूषणी विषय तोशनी विशाळ नेत्र रोशनी । जसें कनकावर ठिकडे सुंदर नादर भांडार स्वरूपभूषणी कामविशनि । नेसुनया शेलारी इ० ॥ १ ॥ तारुण्याच्या बळे जोर सिंहकटी । मदनाचा, कोमळपणा । मधुर मंजुळवाणी बोलति कोकीळा आंबेबना । कमळणिच्या तवरांत भ्रमर जमले रंगले रंगजावत् बाण इष्काचे मारले अधर सरसावी ती मुखचुंबना (चाल) निष्कलंक नित निर्मळ ।

स्वरूप कोमळ। कुरुळे केस कृष्णशामल, गंध परिमळ। सुवर्ण कर्ण, अमळ न साहे मळ। मदन गलोल्यामधिं तंग काचोळी ऊरीं तटतटी। नेसुनया इ० ॥ २ ॥ हार मोत्याचे गळ्यांत पदरोपदरीं जडिताच्या जडल्या टिका। नवरत्न कोंदणी सुमुशा समवेत चिंचपेटीका। अक्षय अभंग रंगीत प्रवाळवेली कळी फुलली होटीका। सरळ शुकाचे परि घ्राण आवघ्राण पुष्पवटिका। (चाल) जाई जुई बकुळ मालती घेऊन चालती गजगती। तऱ्हा, डोलती देह तोलती। आस्थापूर्वक सोहोळती शब्द बोलती। इश्कबाज बावरे तमाशा पाहायाला जमले। ऊटी नेसुनया इ० ॥ ३ ॥ पंचामृत पाजुन वारूळाभवती घालती राव प्रदक्षणा। एकमेकीला वाणे वाटिती दानधर्म दक्षिणा। फुगड्या घेति निसंग तरण्या नारी सुलक्षणा। वेडी वाकुडी गाणीं गाती निर्भीड ते क्षणा। (चाल) संग संपादुन सुंदरी आल्या मंदीरीं मंदीरीं। ठिकाण शहर जुन्नरीं तऱ्हा बंदरी बंदरी (?)। गोविंदरावचेले धरी हेत अंतरीं। मल्हारी कवि जडीं धरून लीनता। ठाई ठाई नवा रंग लुटी, नेसुनया शेलारी इ० ॥ ४ ॥

लावणी ५२

का सख्या घरीं नाहीं आला। मज कमळणीच्या फुला। कुठें गुंतला ॥ धृ ॥ मध्यरात्री वाट पाहीली। द्वारांत बसुन राहीली। नेत्रें शिणली। रंगेली पानें आणली। विड्यानें तबकें भरयेली। जपुन ठेवली। राती शेज फुलाची केली। ही सर्व सुकुनीया गेली। नाहीं राहीली। (चाल) हार गजरे तुरे आणविले। चौफुले भरून ठेविले। मी स्वस्थपणें राहीले। दोन प्रहर अंमल झालारे। जीव कंटाळला। का सख्या इ. ॥ १ ॥ तुम्ही माझे कल्पतरु। नका मज दूर विसरू। किती तरी स्मरू। हा भर नवतिचा भरू। वसरूनीया जाईल पुरू। नदी सागरू। तुम्ही राजहंस पाखरूं। मुक्ताफळ चारा चरू। बसुनया तीरू (?)। (चाल) आज

निर्दय मज भासला । अपराध नसुन त्रासला । कोणी मंत्र उपदेशीला । किती विनवू बाई याला । कळुनया आला ॥ २ ॥ किती वारंवार विनवू । माझा कंठीं उर आला जिवू । वाट किती पाहू । हृदयांत दुःख किती साहू । नाहीं ×× ळुक पोहुन दाऊ (?) । दृष्टांत किती देऊ । कां दूरदेशाला जाऊ । जहराचा पेला पिऊ । सुचित्तपणें राहू । (चाल) आशी कोण रांड विवशी । तिनें मोहनी घातली तुशी । वरकांती बोलता मशी । दुरवर पाहे तरी, काये धुर आला । का सखा इ० ॥ ३ ॥ अशी विनवीतसे कामीन । दिर्घस्वरें करी रोदन । स्फुंद स्फूंदून द्रवलें सख्याचें मन । हृदयाशी आलींगुन धरी आवळुन । गोविंदराव चतुर सुज्ञान । बहीरूबापू गुणीजन । कटिबंद आळवून । (चाल) राघु यमाजी बहु भला । त्यानें प्रबंध करून गाइला । ऐकून हर्ष वाटला । मल्हारी कवि गुणी पाहू जाऊ त्याला । का सख्या इ० ॥ ४ ॥

लावणी ५३

नकोरे जिवलगा आतां मजसाठीं । रात्रन्दिवस घालु घरटी । जपणी लागले तुला तात्काळ । दिर भाये लोकपाळ । माझे प्रितिला दोन दिस जाळ । आहे भ्रतार कृतांत काळ । (चाल) अपलाली फार दिसे गोडी । चातक पक्षाची जोडी । आज केली तडातोडी । लागो सवतीचें द्वारीं काठी । घातली मधीं आडकाटी ॥ १ ॥ नकोरे हा भरम आपला फोडू । वृक्षाची छाया मोडू । दाटून नको धड काटयावर फाडू । तुला हात किती मी जोडू । (चाल) रक्षुन रहा आपले पाणी । आहे साहाय्य चक्रपाणी । नको हिंडू सख्या कुपानी । वेश्यांनीं फारच केली दाटी । दुष्मन उभे तुजसाठीं ॥ २ ॥ पहा पहा च्यास (?) संगत घडली । दोहीची गांठ पडली । कमळण भ्रमराचे हातास चढली । घडवार (?) गोष्ट घडली नाहीं । (चाल) जिवलगा तुझ्यासंगें । निघाले आष्टआंगें । प्रीतित नव्हता भंग । शिर म्या कापून ठेवलें ताटीं । पडे ह्यामधीं

आडफाटी ॥ ३ ॥ गोविंदराव बोलले ज्ञानी । विरळांत सुंदर शाहाणी । आपले मैत्राचें रक्षुन पाणी । लक्षामधीं एक इमानी । (चाल) सखयाचेसाठीं झुरते । जन हें भ्रम धरते । कावळा पराचा करि तें । म्हणे मल्हारी लिखित लल्हाटी । ब्रह्मयानीं दिधली गांठी ॥ ४ ॥

लावणी ५४

बडोद्याचे गायकवाड बहादूर । रजवाडा जय्यतपुर जोतपूर । काठेवाडा मुलुख काठूर । उठे द्वारकेंत फितुर । खंडेराव महाराज लढाऊ शूर । बंडवाले मारून केले चूर । कडींहून आमरोळी हे दूर किरर् झाडी रस्ता लई भेसूर । दिसे आमदाबादा डाकुर भडुच नर्मदा भरपूर । सुरत शहर तिस कोस दूर । नवसरी घणदिवी समूर । त्यापुढें चिंचणी तारापूर । केळवे माहीम बाग महासूर

लावणी ५५

अवंदा केली छावणी कोण्या जागा । जासुद दादा वर्तमान मजला सांगा ॥ धृ ॥ रावजी गेले मोहिमेस दुरल्या देशा । बहुता दिवसा घरिं पाठविला संदेसा । सर्व साकल्य वर्तमान सांगा मैसा । सुखी ऐकावा मज न गडे जोड पैसा । मम हौसिणीचा तूं हौसपक्षी जैसा । विघड पडला म्हणुन मज लागे घोर लइसा । (चाल) कठिण चौमासा हिवाळा हिंदुस्तानीं । उन्हाळा दारुण, जीव करितो पाणी पाणी । लढाया होती झगडा रगडा नित्यानीं । होळकराच्या संगें खाशाची पागा । जासुद दादा इ० ॥ १ ॥ सकुमाराची तनु नाजुक कोमळ कांती । माझा राघो राहिला कसा त्या प्रांतीं । नको मनधरणी करून बोलूं वरकांती । कानोकानीं ऐकते खबर लोकांतीं । मिळाल्या फौजा यास्तव जिवाला खंती । कधिं या नयनीं पाहेन सखा एकांतीं । (चाल) लखोटा फोडून वाचुनया दावा कोणी । बरे कीं वाईट पत्रामधिं अर्थ दोन्ही । काळिज कापें म्हणे बैस सावरुनी । घाबरी झाले रोमांच उठले

अंगा । जासुदा दादा इ० ॥ २ ॥ धीर धरवेना बोलतसे मंजुळवाणी । वाचुन दावा स्वामीचे मुखाची वाणी । आस्था धरली सख्या नंदाजावानीं । बैसल्या भवते, लाविलें लक्ष सर्वांनीं । मनुष्य अवघे निस्तेज परम किलवाणी । कुल्पी लखोटा फोडिला तेव्हां भावानीं । (चाल) वाचिता पत्र आनंद हो सर्वांला । शिंदे होळकर उभयता सल्ला झाला । धन्यानें दिला जागिर मुलुख अपल्याला । पंढरपुरी वाहुदे छत्र पांडुरंगा । जासुदा दादा इ० ॥ ३ ॥ हर्षली अबला वाचिता स्वामीचें पत्र । पांडुरंगासी अर्पिलें सुवर्ण छत्र । तशामधिं तिकडुन पति आले पंढरीयात्रं । भेटी उपरांतिक दिले भोजन लक्षपात्र । भक्ती जाणुनया वर दिधला राजिवनेत्रं । सदा सौभाग्य नांदशील पुत्रपौत्र । (चाल) गोविंदराव झाले विठ्ठलपाई । बहिरु बापू हरिचे गुण गाई । विठू संतूची रंगबाजी जोड सवाई । आदागत दावी शिवराम होऊन निसंगा । जासुदा दादा० ॥ ४ ॥

लावणी ५६

नमु शिवशंकर श्रीहरा । अपर्णावरा हलाहलधरा सगुण शुळपाणी । हे पंचलिंग विख्यात । पहा प्रख्यात ऋषींची वाणी ॥ ध्रु० ॥ जगव्यापक जास्वनीळ । करी त्रिशुळ वाहे झुळझुळ मस्तकीं गंगा । त्रिपुरांतक भय मोचना भाळ-लोचना । तूं जोतिर्लिंगा । खळदुर्जना निक्रंदना । कामकंदना सुरा वंदना भक्तभवभंगा । दक्षासी शिक्षा । विरूपाक्षा अव्यंगा । प्रावरण व्याघ्रांबर रुद्र दिगंबर विभूती अंगा । वरशे भारुड तुझे रभारी करपूरंगा (?) । वासुकी भूषण, गळा रुंडमाळा तमाळनिळा । करणीं भुजंगा । शोभती जटपिंगट निकटसकट उमा अर्धांगा । पंचलिंग सर्वेश्वर तूंच ईश्वर मुखीं सुरवर कीर्ती वाखाणी । कवि किमर्थ शिवसमर्थ वदवी लीलामृत वाणी ॥ १ ॥ शिव निर्गुण निर्विकार मूर्त सांकार धरून आकार सगुण-स्वयंभा । पंचलिंग पंचपिंडी सह्याद्री खंडीं कथा प्रारंभा । त्रितापदोषहारका । सौख्यकारका भक्ततारका । आकाश-

स्तंभा । साधुजनमनविश्राम शांतीचें धाम काम अधमा (?)। शिवनामाचा महिमा वर्णिता सीमा आगमनिगमा मूळआरंभा। स्वरूपीं होईल अनुग्रह सोडी ग्रह कमळनाभा। समर भा सवसारीं विटल मन। चतुरानन सेवी कानन, सांडूनी दंभा। प्रक्तनी लागी तरमळी नीर डळमळी नेत्रकुंभा। अहोरात्र करी तगमग शोधिलें जग सह्याद्री नग देखीला नयनीं। चतुरानन चिंताक्रांत पुसती वृत्तांत पक्षी दोन्ही ॥ २ ॥ पक्षी या चतुर व गत्र कथी सर्वत्र साधनें परत्र मम आपक्षा। कोण देइल मजला मोक्ष, ज्ञान अपरोक्ष, फिटल समक्षा। ते म्हणती ब्रह्मया भज भज पंचलिंगा नाही शिवगंगा पातक-भंगा भवभयरक्षा। मतिभ्रम हारवील तोच करवील अंतिम परीक्षा। एक कलंक ब्राह्मण नष्ट भ्रष्ट कनिष्ट वर्तला दूर कर्म ऐशा। कैवर्तक होऊन पारधी स्वपदें वधीं भक्षी पशुपक्षा। पहा तपोनिधी ब्राह्मण आकळूनि मन करी स्मरण घेतली दीक्षा। मारिला कलंके बाण घेतला प्राण भेदले लक्षा। मृग जाणून केला वध, आला सन्निध, ब्राह्मण शुद्ध वळखला चित्तीं। म्हणे कलंक वधिले मिथ्या घडली हत्या मजलागुनी ॥ ३ ॥ ब्रह्महत्येचें महापाप झाला अनुताप शरण निष्पाप पंचवगात्रा। भक्तीनें निष्कलंक घाडला कलंक शिवपरत्रा। तो कलंक कैवर्तक भक्ती अणिक करूनी सार्थक उद्धरी गोत्रा। विमान आले आम्हासी जातो कैलासी अक्षईयात्रा। ऐसा तो जगत्‌जामात पक्षी सांगे ब्रह्मया मात ये बममात जल मुनी धात्रा। तीर्थं केले स्पर्शेनें शिवदर्शनें निमाके गात्रा। (?) बोधीला (?) विधी त्रिवेंगी पंचलिंगी येऊन साष्टांगी नमी त्रिनेत्रा। मस्तकीं ठेविला हस्त, रुद्र म्हणे स्वस्त रहा हरिपुत्रा। विधिलागी केली आज्ञा तूं सर्वज्ञा आरंभ यज्ञा अभिमानी। आले ब्रह्मयाच्या कार्यासी देव ऋषी विष्णू आदी करूनी ॥ ४ ॥ विधी कंकण बांधी करा ऋषी चित्तवरा बोल इश्वरा जेष्ठ जे भार्या। विलंब लागला तिला सावित्रीला योजिले कार्या। आलीसे त्वरा करूनया स्नान कनिष्ठमान देखता जाण

मानी आश्चर्या । अधिकारी सूर्यपुत्र, पुजे सावित्री कशी ऋषीवर्या । दाटला त्वरे संतापें, दिधला श्राप, नाहीं उश्राप विधीहरीहरया । जडदेह झाले तात्काळ देव दिक्पाळ रविशशीसूर्या । अघटित केलें दुष्कर्म, राहिला धर्म, कळेना वर्म, स्वरेच्या (?) धर्विर्या (?) । स्थावर जंगम सुरवर विसरले स्वर्ग, सांगतो पर्या । सह्याद्रीखंडीची कथा घेऊन समस्ता स्वामीची सत्ता मनोची धानी (?) । हे पंचलिंग प्राचीन अतां अर्चीन देव ऋषी मुनी ।

लावणी ५७

ग रात्री रंगमहालांत देखिले स्वप्नामधि खासे । खडबडून उठली तेंच रूप हृदयामधि असे । वैशाख शुद्ध पौर्णिमा चंद्रमा पूर्ण आकाशीं । भूतळामधीं प्रभा सर्व सृष्टीतें प्रकाशी । समूळ × बळे पाहता पुत्र-मुखासी । सरोवरी कमळिणी उदई होति विकासी । घरोघरीं आनंद भोगविलास सुखासीं । सुगंध आणि उपचार अर्पिती एकमेकासी । (चाल) आनंद पाहुन सर्व जगाला चित्तिं आठवले वल्लभाला । कर्मफास फोडी जुगाला । विरहहरणीचा तो मृग आला । तद्वत मी हात लाऊन गाला । सहज शिर ठेऊन पलंगाला । निजले होते डावे बगला । स्वामी सुखसंगासी निवाला । भोगिलें प्रतक्ष मज भासे ॥ १ ॥ एकांतीं कांतासि प्रार्थिता मन तल्लीन झालें । पंचबाण पेटता वृष्टीनें विझाले । आनंदानें विस्मित चित्त भ्रांतिनें बुडाले । जागृति होता दिसेना कुठें गुप्त झाले । वेड्यापिशाचेपरी मंदिरीं पलंगाभवताले । दैत्यकन्यका उखा पाहते सखा तसें झालें । (चाल) का माझें प्राक्तन ओढविलें । चित्र विचित्र कोणीकडे पडले । म्हणून × × मी हडबडले, जसें पर्वता-हून गडबडले । भूमीवर येऊन पडले; बिन्दुप्राय चांदणें आखडलें । मला दिवीतुनी ×× खल येशे (?) खडबडून इ० ॥ २ ॥ गेल्या तागाईत म्या ×× रात्रीं स्वप्न देखीलें । तसें रूपरंगांत स्वरुप भिंगांत

रेखिलें । स्वार होऊन वारूवर, पुढें हालकारे फेकिले । आभ्र जसें चांदण्यांत म्या स्वामीला वळखले । करानी पंचारति ओवाळून अंतरि हारुशले । (चाल) मेणबत्ति समया मशाला । प्रकाशवान फार कशाला । जाणीतले आपुले पुरुषाला । ववविंत वस्त्रें हाऊशाला । आलींगुन निजली तयास । खडबड इ० ॥ ३ ॥ हान सांगावि मना, लाभ सांगावा जना । बचनागाची ×× तसें घडले स्वप्ना । दुबळ्यानें पुष्कळ द्रव्य देखिलें स्वप्नांत । तृषाक्रांत मृगजळास पाहून हार्षे वनांत । राजहंस पांखरू पडलें जळत्या वनांत । वनवासी रामाविण सांपडले राक्षस आगीत । देशाधडी पर्वत कुग्रामा । आशोकवनीं आठवितसे श्रीरामा । गोविंदराव राणू नि रामा । स्थळ निर्मळ जीर्णपुरी ग्रामा । कवि मल्हारी दत्तदास खडबडुनी इ० ॥ ४ ॥

लावणी ५८

ऐकत होतो दुरून परंतु गुण दृष्टि आज पडले । रूपस्वरूप चांगले पाहिले, सहज बोलणें घडले । द्रव्यप्राप्तिच्या लोभावेगळा आंतर नाहीं शुद्ध । बागाचे बाग × ध्यापर (?) इच्छी मीनाचा वध । आयुरभाव कळो न ये जैसा सवचोर मिलींद । डावघाव बाणल्यावर न धरी आळस, राहे सावध । त्या तूं ह्या रूपा लागी करसीं प्रात समद (?) । क्रिया–वचन मतलबापुरते मग वैर प्रसिद्ध । तुझें बोलणें खरे मानती तेव्हा याचे ओढवले ॥ १ ॥ उंच निंच बोलणें पटवून सालसपणें मिरवसी । नांद-णुक बयमाना ! तुझी माहीत सर्वत्रासी । बांड दपर (?) आड, वाट वेगळा उगेच भटकत फिरसी । यजमानकृत्य तवर भृत्य, तसा कळलासी । आलगरजी गरजेस्तव लांडगा लोपूनया क्रोधसी । दहा पांच वेळा धमकाविले तरी लाज ना धरसी । भेटुन भोंदुन मला फसविले आजपावेतों नडले ॥ २ ॥ गरतीचा हा आळ तुला आला वरतुणक तरी नष्ट । परिचयाविण आनुभव आला सत्य, भासलिस खष्ट । तुझ्या हिकमती

दुजीत नाहींत बेदर्दी एकनिष्ठ। शब्दानें वरताळा करशी, उत्तर घेई स्पष्ट। तुझ्यामुळें कैकावर बितले जे होती संतुष्ट। निर्मळ झाले घरीदारीं, आतां भोगिती कष्ट। भरपाई आजपासून आतां शपत हात जोडिले। रूप स्वरूप इ० ॥ ३ ॥ गोविंदराव म्हणे उभयताला लज्जा जर असली। उत्तरासी प्रतिउत्तर भ्रांत समक्षा फिटली। मनमोड झाल्यावर त्रास मान संज्ञा करी। पापपुण्य जन लज्जापाळी चालविली एकाखाली। मल्हारीचें कवन वरदी निर्मळ न्यहार बोली। शहर जुन्नरीं ठिकाणा, बहिरू बापू गाती चाली। आर्थअक्षर शोधुन, शिवरामानें छंद जडले। ऐकत होतो दुरून परंतु गुण दृष्टी आज पडले ॥

लावणी ५९

झरुक्यांत उभी गोरटी, पितांबर कटी नेसुनी पिवळा। बेबहार समय गुजरीचा, करी गतिगतिनें गायनकळा ॥ ध्रु० ॥ कद नाजुकसा खासा. हातीं आरसा घेऊनया जी। मुखडा पुनवेचा चंद्र पाहे प्रीतीनें न्याहाळुनया जी। दासीपासुन आणवून मग पेटी उघडुनया जी। शोभल तितका शिणगार अंगावर जुहार घालुनया जी। (चाल) भांग बरा साजरा टिळा कुंकाचा लावुनया जी। गोट पाटल्या हातीं, केवडा माथा खोऊनया जी। सदा गडे झोकांत, लुब्धले बिसनी पाहुनया जी। रेशमी ठेला जसा तसा शिरि केसाचा गुंडाळा जी। बेबहार इ० ॥ १ ॥ मतवाली सजली, विड्याची कळी वदनांत जी। पदर सावरी सदा आदा, नथणीच्या झोकांत जी। अंगावर शाल भडक, सडक गर्द माजु- मच्या कैफांत जी। सहज बोलणें रुसुन हसुन ओठाच्या ओठांत। (चाल) जरा पुढें सरकुन झुकून झुकून राव पाहे रस्त्यांत जी। गुजरी गेली घनवटुन, माडीचे खालीं उतरत जी। दासी मागेंपुढें मधीं जशी चपळा चमकत जी। मंदगति झुकत लुकत ठुमकत चाले अबळा जी। बेबहार इ० ॥ २ ॥ रस्त्यामधिं गर्दी नाकेबंदी बिसनीची जी।

पुढें फरक होईना, वाट बंद केली जायाची जी। दासीनें पैस करून शिरून जलदी केली निघायाची । जखमो झाले फार फिरत पाहुनया नेत्राची। (चाल) जलद पायऱ्या चढुन पूजा करूनया देवीची जी। उभी राहुनया जरा तऱ्हा आणी ध्याना लोकांची जी। चतुरलक्षणें फार म्हणती हीं आहे नौस्य (?) बरची (?) बोलणें अतिरसी जशी वनांमधिं गरजे कोकिळा जी। बे बहार ॥ ३ ॥ पहाता झोक जिचा बहुतजन भुलले पाहुन जी। उरीं फुलाचे गेंद घे तो पदरानें झाकुन जी। छत्रेली सहल करून झुकुन लुकुनया गेली निघुनशानी जी। विष्की वेडे झाले सोडले संसारा पाणी जी। गोविंदराव म्हणे दगा सर्वांसि देऊनी जी। (चाल) पुढें दिवस हे राहाती असें ? मनिं पाहे विचारूनी जी। नको धरूं अभिमान मान, तूं घे मौजा करुनी जी। मल्हारी म्हणे गडे अशामधिं भोगी सुखसोहळा। बेबहार इ० ॥ ४ ॥

लावणी ६०

धमक चमक मुखड्यावर लाली, ठुमके अलबेली। हळु ग चाल पडशील गडे खालीं ॥ ध्रु० ॥ गोरा रंग गोरट, सडक तनु दिसती नाजुकशी। भडक जरी पातळ हारजिनसी। वरून शाल हिरवी पदर गडे तिंदा सावरशी। गुलाबी गेंद जया गरसी। लइच शरीर सकुमार उड्डनीया सारे जनाशी (?)। हळूच पहावे गुणराशी। गळ्यामधीं कुल मोती, मनगटें सोन्यानें भरलीं। हाळु ग चाल पडशील खालीं ॥ १ ॥ सगुण गुणीलतिका उघडी स्वरुपाची खाणी। कोण्या हौशाची तूं राणी। पाहे फिरून येकदा ऊभे धर भवताले बिसनी। मरूनया जाती तुजवरूनी। ल्हान थोर मनीं × × न बोलती आर्जव करुनी। म्हणती घे द्रव्यपेटी भरुनी। पडली प्रभा चहुकडे विज आस्मानी चमकली। हळू ग चाल इ० ॥ २ ॥ करी सुंदर उत्तर, हात गालावर ठेवूनिया। छबेला सजन पाहुनिया। दावी आदा झोकांत, नोक शब्दाची लावुनिया। मोही

आवभाव दावूनिया । निघे चपळ करी रस्ता राहा मार नेत्राची मारुनिया । मुसाफिर नेला घेरुनिया । गळ्यांत हात घालुन चढे माडी झोकाखाली । हालु ग चाल इ० ॥ ३ ॥ नेऊन सखा एकांतीं दिला पोशाख जरतारी, नेसली पिवळी शेलारी । मोंबत्या खंदिले जळती समया चहुकुन चारी । पलंगी पुष्पाची शेज गहरी । दोडे, लवंगा पिकली पानें चिकणी सुपारी । घेऊन विडे निजले शेजारी । गोविंदराव गुणिराज म्हणे हे सुंदर आलबेली हालु ग चाल इ० ॥ ४ ॥

लावणी ६१

जीवी झुरते आली नवती रसा गे । नको म्हणता सखा गेला कसा गे ? ॥ धृ ॥ आला सण शिमगा सय होती सखयाची । कोणापशी सांगु गती आपुल्या दैवाची । पुरुष आणखी स्त्रिया स्थळ नेमुन एकांताची । करूनया ठेविती साहित्य विलासांची । पातळें चोळ्या चिरड्या ही (?) कुसुंबाचे । बुटी चिकच्या आविली पुऱ्याची (?) ऊसासा टाकुन म्हणे दावा प्राणहंस गे । जीवी झुरते आली नवति रसा गे । नको म्हणता इ० ॥ १ ॥ गर्भश्रीमंत दौलतिला कमी नाहीं । बैठकी खाशाकारणें ठाई ठाई । गच्ची मांडवामधीं मंचक वर जाई । केर वाख्याची (?) वाळ्याची शितळाई । शेज पाहूनया शरीराची होती लाही । पति सुखी येवो, पावावे विठाबाई । निजन शेजाशी हात घालुन त्याच्या उत्संगे जीवी झुरते इ. ॥ २ ॥ नूतन वय माझे दुःख स्वप्नीं कदा नेणें । सासरीं आठदिसा माहेरी येणें जाणें । पाटल्या तोडे मोत्याचे डागिने । अमोलिक वस्ता जडविल्या प्रयत्नानें । असुनया इतके हिन केले नशिबानें । रडे फुंदू फुंदू, दिले अंतर सखयानें । दिवस दुःखाचा भासतो सण सांगे । जीवी झुरते इ. ॥ ३ ॥ सगुण ये कळा स्वामीची करी खंति । पाहे न्याहाळूनिया, खांबाशी उभी होती । स्वाभाविकची जे वामनेत्र लवे पातीं । आले गुणराशी दिसे दाटी चवभवति । ढळे वर चवरी

मैत्र भेटीस्तव येति । भरूनया तबके शर्करा वाटी ती । दिवस सोन्याचा भासतो सण सांगे । × सा विध केले स्वआंगे सणाचे । करंज्या खाज्या भात पिवळे केशराचे । पुऱ्या कानोले बेत पुरणावरणाचे । मिष्ट पक्वानें वाढी पात्रीं सख्याचे । घेऊनया तांबूल सुख भोगी संगतीचें । सिव्हू शेजेसी पाहता, आले भरते आनंदाचें । म्हणे गोविंदराव पुरवी मन सांगे । जीवी झुरते इ. ॥ ४ ॥

लावणी ६२

उभी राहुन बावरे बोल जरा कांहीं । पर्वत खुषीचा, जबरदस्ती नाहीं ॥ धृ० ॥ स्वरुपाची धन्य लावण्य, चतुर दिससी । बोलता शब्द सुहर्षें सदा हासशी । शृंगार करून अगणित, मग्न असशी । पदरची सुखी, द्रव्यानें कमी नसशी । (चाल) गुंतला हेत तुजपाशी । कर मान्य गडे शब्दासि । येऊदे गोष्ट ध्यानासी । त्यागिन अवघा संसार तुझे पायीं । पर्वत .... ॥ १ ॥ समजुन मनामधिं बोलतोस हिरशी । मी आहे कोणाची सुंदर चातुरसी । माझे पतिचे हातांत नित्य बरशी ! । समजले त्यास, सध्याच जिवें मरशी । (चाल) होई फजिती सारी । कर कीर्त येऊन संसारीं । पैक्यानें होशील खोरी । सोडून दे अंतरची नष्टाई । पर्वत .... ॥ २ ॥ सांगसी बरी या उमजून ग नारी । परी काम चेतला शरिरामधिं भारी । मला असें वाटते धनदौलत सारी । लुटुन ब्राह्मणा द्यावी परभारी । (चाल) लागलो तुझे गडे पाठी । घेईन विषाची वाटी । सोशिन कष्ट तुजपाशी । त्यागिन अवघा संसार तुझे पायीं । पर्वत .... ॥ ३ ॥ सख्याची मर्जी पाहून सुंदर ती । घेऊनया गेली रंगमहालावरती । किनखाबो तो शेला बिछोना जरबावी सुरती । केली शेज मंचकीं उभयतापुरती । (चाल) पुरविला सख्याचा हेत । प्रीतीनें चुंबन देत । गोविंदराव कवी दख्खनेंत । साथिदार भवानी गडी दाऊदभाई । पर्वत खुषी .... ॥ ४ ॥

लावणी ६३

प्राणाचा तूं प्राणसखा जिवाचा तुं जिवलग गडी। म्हणून मी प्रार्थीते घडी घडी ॥ धृ० ॥ जन्मांतराचा योग सख्या घडोनी आला आतां। पूर्वापार माझी सत्ता। महेश्वर ईश्वरा सख्या मी भार्या पतिव्रता। एकली का वनीं दवडता। (चाल) तप केले बहू। अर्पण केला जीऊ। आतां कशाला बाहू। फोडींन चक्रविहू। किर्तीच्या लावीन ध्वजा। प्रीतीची आवडी म्हणून मी प्रार्थीते घडी घडी ॥ १ ॥ तव प्रीतीचा बाण सख्या अंतरांत रुतला। विषयफाशांत जीव गुंतला। आस्थापूर्वक लोभ सख्या केला। मनोरथ जुंपोला। रुख्मीणीकांत आंवतिला। सोळा सक्र शाहण्णव घरे फिरून डाव जिंकला। पावेल इच्छित चितोला। हेत प्रीतीचा सखया पदरीं बा × × ×। गोष्टी का परक्या। नळराया सारख्या। विक्राळ पहा कळिकाळ आला। बळच घालून झडी। म्हणून मी प्रार्थिते .... ॥ २ ॥ मी हौसिनी तूं हौस, सख्या सोन्याचे पांखरू। क्रीडाकौतुक दोघे करू। रघुनाथा मी सिता तुझी। नका मला विसरू। जाईल प्राण झुरुझुरु। (चाल) अंगाची साउली। नेत्रांतील बाहुली। श्रोत्रांतील चाहुली। जहाजाचा आवली। नदी नावेस जोडा सख्या जी। उतरा पहिले थडी। म्हणून या .... ॥ ३ ॥ गुळामधिल गोडी सख्या चतुरपणें निवडिता। शर्करेचि साल काढता। दुराग्रह अभिमान धरुन। परतंतू निवडिता। पुष्प गंधास फूट पाडिता। गोविंदराव गुरुराज म्हणे, काहो मन मोडिता। बाग लाऊन पाट फोडिता। (चाल) तूं वाव्रडीचा सडा। गगनामधिं रोकडा। मनपवनाचा धडा। पाहून फंदिफाकडा। मल्हारी एकाग्र चित्तीं रतिरति लाऊन जडी। म्हणून मी .... ॥ ४ ॥

लावणी ६४

स्वरूप सुख संपदा विधीनें लिहिले लल्लाटी। लीहीले लल्लाटी।

बाळक नाहीं पोटीं ॥ ध्रु० ॥ उभयता समवय स्वरूप सुंदर बहू लावण्य। आनंद सर्वापरी कोणच्या गोष्टीचें नसे न्युन्य। लौकिक आणिक शब्द हे सर्वा ठेवि माते। नेमधर्म सत्कर्म यथाशक्तिनें दानपुण्यें। भजन पूजन आचरिला वाटले जन्मांतरी धन्यें। (चाल) चिंतागत आंतर कायावाचामनें। पुत्रावांचुन ओस मंदिर दिसतें सुनें। मजला वांझोटी म्हणती आवघेजणे। संसारामधीं हो सुख असता दुःख दुणे। भ्रतार झुरे आंतरीं घेतलें उणें। (चाल) भावार्थें पतिची सेवा करिते भजुन। सासुसासऱ्यापदीं लक्ष लावितें जपुन। इतक्यांत राव मज दया करिती रिझून। लेकुरवाळ्या हेळसासति हाळवट समजुन (चाल) नणंदा जावा सुंदरा बाळकास धरीती करीं। कोणी घेति कडेवरी। बाळ जे सर्व साजरी। द्या मज पुत्रफळ ईश्वरा वंशवृद्धीसाठीं। बाळक नाहीं पोटीं ॥ १ ॥ संतती संपत्ति त्याची एक धन्य दैवरेषा। पाव मला श्रीहरी पुत्रफळ द्यावें जगदीशा। वृत्तीचा अधिकारी घरी जुमेदारीचा पेशा। बागबगीचे फुलले मज फळप्राप्तीची आशा। रंगमहालीं खुशाली दीप उजळावा प्रकाशा। (चाल) पुत्रावांचुन झुरूझुरू लागले पिसं। नित्य यत्न प्रयत्न करीतीं रात्रंदिस। होई प्रदक्षणा अष्टोत्तरसे तुळशीस। पिंपळाची सेवा भावार्थें बहुवस। बेलपत्र लक्षावळी चंद्रमौळीस। (चाल) हरीहरापदापाशी दृढ भाव लावितें चित्त। स्वरूप हे सगुणाचें रूप भावितें। एकाग्र चित्त भक्तिसी सरसावितें। या परीस देवदेव्हारे नवसीते। (चाल) पंढरीची वारी खरी। माघ मास श्री जेजुरी। आदशक्ति तुळजापुरी भैरव न योगेश्वरी। साक्षी पाळा (?) पुजा आर्पि रत्न दिव्य ताटीं। नदीये काटीं। बाळक नाहीं पोटीं। सौभाग्याचें भाग्य पुत्ररत्न हे दिव्य ज्योति। पुत्राच्या पुण्यानें उद्धारगत पितर होती। यास्तव घट मांडीला आरंभुन सप्तशति पोथी। कधीं गर्भ शिंपल्यामधीं निपजेल हुरमोजी मोती। (चाल) घृत लाडु लक्षब्राह्मण तृप्तीभोजना। देवासमान

मानले संत सज्जना । धर्मानें वर्म लाधले दुरीत गजेना (?)। शृंगार करून मी काय लऊं अंजना । पाझरे नीर नेत्रीं निर्मळ खंजना । (चाल) वसुप हाल याचें देव्हारे दमले करून । घुमारे देति आंगारे निश्चय धरून । तीर्थ यात्रा आटपली पाई फिरफिरून । त्रिवेणी संगमीं नहाळो उभयता शिरून । (चाल) मूल होइल म्हणून इक्षिती । पीर पैगंबर अर्चिती । ठाई ठाई द्रव्य खर्चीती । पाहेन कधिं प्रचीती । आवतुन वनस्पति दिधल्या आवशी अन् पहाटी । आवशी अन् पहाटी । बाळ काय इ. ॥ २ ॥ नारायणबळी नागबळी जाऊन केल्या आधी । गोप्रदान दानें यथाशक्तिनें प्रतिपादी । त्रिंबकेश्वरा कचेश्वरा गुण आपुले अनुवादी । गंगातीरीचे ब्राह्मण शुभ वदविले आशीर्वादी । हरिहरेश्वराप्रति गेलो उभयता आम्ही । बोलती समंधें धन्य पुण्यभूमी । पाहिले चिदंबर स्वामी अनुक्रमें । (चाल) स्वामीचा प्रसादिक वर होई मजला । द्वादश ज्योतिर्लिंगाचा क्रम साधिला । श्रोत्रें (?) यंत्र कवचादिक योग योजिला । पुत्र व्हावा यास्तव देह दंडिला । (चाल) होम हवन केलें आधीं । कठपुतळी घेऊन करीं । सोडीले जळाभीतरीं । आभिषेक करविती वरी । वांझपणाचा डाग फिटेना, ही आस्था मोठी । ही आस्था मोठी । बाळक नाहीं पोटीं इ० ॥ ३ ॥ पुत्रवति स्त्रिया बाळ पालखांत हालविती । कोणी करीं धरूनिया बाळ दुड दुड चालविती । कौतुक पतिला दाविती, आनंदें मान डोलाविती । कोणी मुखचुंबनें शब्द बोबडे बोलविती । (चाल) कडेखांदें घेती तान्हीं पारठी मुलें । रमणी चिमणी कुंचीला रेशमी फुलें । मंगळागौरी आवळा हळदीकुंकु ले । तैसेंच सुख इच्छिती मज आपुले । (चाल) गोविंदराव गुणी गावन एक जुन्नरकर । म्हणे त्रिलोकनाथ स्तवितो निजकिंकर । या पतिव्रतेच मनोरथ पूर्ण कर । कन्यापुत्र घरभर द्या लेकुरं । (चाल) मल्हारी कवि सांगती । पुष्कळ होई संतती । बहिरू बापूची मति ।

हारीपदीं सदा चित्तवृत्ती। चतुर्थ दिन रुतकाळीं रति: बांधी ती शकुन गांठी। बांधी शकुन गांठी। बाळक इ० ॥ ५ ॥

लावणी ६५

झालें दैवानें, कृपा केली भगवंतानें। द्वादश वरुशें नाहाले, गरोदर झालें दैवानें। कृपा केली भगवंतानें ॥ ध्रु ॥ रुतवंतीं रुतली प्रियकरास भोगि ती। आनंदांत कौतुकें येरू येरास आलिंगती। निर्भीड होऊन भीड जशी सोन्याची सवागि ती। मन्मथ द्रवला तेणें रेत रुतु घडली संगती। (चाल) कोकमळाच्या कोशाआंत शुक्र श्रोणीत। पंचप्राण वायुरूपें वसति तिथं। बांधल्या ग्रन्थी गर्भांत योग्यसमई। प्रेमानें पूर प्रवाहे मुळ संचित। (चाल) प्रातःकाळीं पतिवदना अवलोकिले। तितुक्यानें पतिच्यासमान होती मुलें। पहिल्या मासीं भरवशियानें कंठिलें। मासा उपरांतीक खचित आसे वाटले। दुसरे मासीं साजरी। चिन्हें जाणवती मनीं। आरुचिक मिष्ट भोजनी। कृष्ण वर्ण श्रोत्रा। तृतीय चतुर्थ मासीं। प्रकृती पालटेल जाणे। कृपा केली भगवंतानें ॥ १ ॥ डोहोळ्याचे सोहोळे पांचवे मासी पती करवी। साहामासानंतर सातवेमासीं ओटी भरवी। चोळी अंजिरी शिवून पैठणी आणविली हिरवी। घरांत अनुकूळ सर्व पति मनचे मनोरथ पुरवी। (चाल) मम काया सूक्ष्म कोमळ नाजूक बहु। आठवे मासीं तगमग तगमग करी जिऊ। व्याकुळ शरिर मस्तक (?) लागले मऊ। पहेलारु म्हणून वाटतसे उपद्रऊ। (चाल) डवडवा येतसे घाम झाले पिंगट। विगलित अंगाचे शृंगार स्वरुप चोगट। साहेना पदर घडीघडी घेत घुंगट। श्रीहरि कसा उतारील पथ दुर्घट। (चाल) माहेरचें आलें मुळ। सासुसासरे सहेकुळ (?)। बोलती मुरुडी (?) मंजुळ। जसे नंदाचें गोकुळ। स्वस्थळीच प्रसुत होऊ द्या फिरून तुम्ही जाणे। फिरून तुम्ही जाणे ....॥ २ ॥ गवरऊन मरा बंधु लाविला सासुसासऱ्यानें।

इतक्यावर मग डाक ठेविली त्या माहेरच्यानें । मजला नवमास, श्वास दाटे अंतःकरणी । नानापरि उपचार सर्व वाटते विषावाणी । (चाल) नवमास झाले, संपूर्ण झालेवर नववे दिसीं । निराहार होते उपवासी रामनवमीसी । चांदणें शुद्ध माथ्यावर आला शशी । लागले उदर दुखाया उजवे कुशीं । (चाल) लज्जेनें मनचे मनांत आनमानले । वदन पाहुन सासूनें चिन्ह जाणलें । घंघाळें उपसिले पाणी मज नहाणिले । सत्वर जाऊन दाईसी बोलवून आणले । (चाल) जागृत होतें घरधनी । अबळा मिळती सदनीं । वेणी देती वदनी । थरथर कापे दूर धनी । दिला ईश्वरें मार्ग, दृष्टी देखिले बाळ तान्हे । देखिले बाळ तान्हे .... ॥ ३ ॥ शुभतिथी नक्षत्र ग्रह पडले उच्चस्थानीं । सर्व लक्षणेंयुक्त गणित लिहिलें ब्राह्मणानीं । कुळधर्म पंचमी षष्टी पुजली सन्मानी । झाले बारा बळी विधिनें केले वडलानी । (चाल) पुत्रमुख पाहून पति हर्षनिर्भर । बाळका बाळलेणीं आणिती सोयरं । दिवसामासावरचा झाला कुमर । मनइच्छत फळ लाधलें दिलें ईश्वरं । (चाल) विद्येंत निपुण झाला जैसा पंडित । कुळवधु आली घरबसल्या गुणमंडित । स्वयंवर झाले सुखसोहाळे अखंडित । विरळा ऐसें सुशब्द कवि धुंडित । (चाल) गोविंदराव कविचा वर । हर्षे अमृत निजअंतर । मल्हारी पदीं × × × ठिकाणा शहर जुन्नर । बहिरु बापुच्या संगे संतुबा गाती आनंदानें । गाती आनंदानें ...... ॥ ४ ॥

टीपा, शब्दार्थ वगैरे

लावणी नं. १ एक दास्य वर हरी – एक दास्य म्ह. एकांत दास्य, निस्सीमभक्ती. **वर हरी** – हरीची म्ह. ईश्वराची निस्सीम भक्ती. कर त्याचें दास्य म्ह. गुलामगिरी अर्थात भक्ती कर. **दंदी दुस्मान** – वैरी, प्रतिस्पर्धी, शत्रू. **त्याचे वशिला** – त्याचा सहाय्यकर्ता. **गावन** – १ अधिकारी पुरुष, २ गायक.

लावणी नं. २ तो हा – तुवां, त्वां, तूं. **करयात** – करियत, कर्तबगार. **रहाळसाहाळ** – खुल्या दिलाचा, मोकळा, मनमिळाऊ. **बरवंटा** – सुंदर, चांगला. **तस्कर** – चोर, दरोडेखोर. **वागूवरी** – पार्वती. **शैल्या बाळा** – शैलबाळा, म्ह. गिरिजा, पार्वती.

लावणी नं. ३ चतुरांचे शिरा – चतुरांत वरचढ. **आवलें** – वल्हें. **तरी** – नाव, होडी. **भरतें** – भरती, (समुद्राची). **अंतरांत अंतर** – मनांत, अंतर म्ह. दुसराच भाव. **किमया** – किमया, जादुगिरी. **किलवाणी** – दीन, केविलवाणी. **गगनीं झाली ध्वनी** – आकाशवाणी झाली. **मित्रा** – सूर्या ! **मित्र** – सूर्य.

लावणी नं. ४ हिनवर – जिचा नवरा, कोवळा लहान आहे असा **वरणभात होणें** – भातावर वाढलेल्या वरणासारखा बायकोच्या मानानें अगदीं लहान कोवळा असा नवराबायकोचा विजोड जोडा असणें त्याला वरणभात म्हणतात. **गोर गोई** – गरीब गाय. **भुई** – आकारमान. **वाकला दठा** – कमरेंत वाकलेला. **उजरना** – उजरे ना, शहाणपण येईना, तारुण्याची जाण त्याला अद्याप येत नाहीं. **बरवंट** – देखणें, शोभनीय, मनोहर.

लावणी नं. ५ पुतळी – मूर्ती, बाहुली. **वैतागें करून** – वैतागानें, वताग येऊन. **विचित्र** – नवल. **उकला वर** – कोडें सोडवा. **येकणुकता उतारी** – ?

लावणी नं. ६ कंपू – शिंदे होळकरांचे इग्रजी कवाइती शिकाविलेलें सैन्य त्यांना कंपू म्हणत. **हरपळो** – होरपळो, जळो. **अवकाळ प्रजन्य** –

वळवाचा पाऊस. **मोहरे ढळून** – रोख फिरवून, निशाण बदलून. **कल्पना** – संशय. **ईश्वर निवडील क्षीरनीर हंसासंबधी** – ईश्वर तुझ्या हौसासंबधीं म्ह. प्रियकरा संबंधानें खरी खरी बातमी काय आहे ती लवकरच प्रकट करील. भुमका म्हणजे नीर. पाणी - क्षीर म्हणजे खरी बित्तंबातमी.

लावणी ७ अगोचर – अफाट, जहांबाज, अवढंगी. **फुइजी** – सासूबाई. **खुलवर करणें** – धनमालमत्ता गडप करणें. **बाजिन्दी** – हलकट, कारस्थानी, कपटी. **वढी लागणें** – फशी पाडणें, दी लागणें. **जुदे** – निराळे. **सवती** – स्वतंत्र, निराळी. **बहूचाल** – बहुसाळ, पुष्कळ, अनेक. **वाहोक** – वाईट.

लावणी ८ वेडें – वेड. **क्रियानेत्र** – शपथप्रमाण. **पुरुषार्थ** – पण, प्रतिज्ञा. **एकांडा** – मराठी लष्करांतील विशेष मानाचा शिलदार. याचें काम जीव देऊनहि निशाणाचें संरक्षण करण्याचें असे. त्यांना पगारहि भारी असे. **कंवाड** – कपट. **अंगावर घेणें** – वश करून घेणें. **अंबिर** – सरदार **संदुक** – पेटी. **हाती चढणें** – वश होणें, हस्तगत होणें. **यादगिरी** – आठवण, स्मरणचिन्ह. **परिबंध** – प्रबंध, पाहिल्यापासून सर्व साग्र हकीकत.

लावणी नं. ९ नाटबाट – हलकट, चवचाल. **खडाखडी** – रोखठोक, इथल्या इथें. **झेका** – ऐट. **जंग** – काळिमा, बाट, दुर्लौकीक. **चुभे** – चुंबन घेई किंवा घेतलें.

लावणी नं. १० निधान – ठेवा, भांडार; अर्थात सौंदर्याचें व उपभोगाचें. **आज पाहेन अवसान** – आज मी हिचा उपभोग घेईन. **भवरमंचक** – १ भ्रमरमंचक म्ह. ज्या बिछान्यावर झोपले असतां जरा हालचाल होतांच भ्रमराच्या; गुंजारवासारखा सुखकर स्वर ज्यांतून उमटतात. कल्पक बिछाना (२). **मुलस्यान** – वर मुलामा केलेलें म्यान (येथें खंजिराचें.) **आसील** – असील, दासी. मात्र ही गुलाम नसते यामुळें लवंडी वर्गांतील दासीपेक्षां हिचा मान दर्जा वरिष्ठ असतो. **मुखी आणि वाद** – (?) **भोकून** – भोसकून. **रुगद आली दास** – (?)

लावणी नं. ११ जुदी – निराळी, पृथक. **कळसपाक** – उंची

वस्त्राचा एक प्रकार. **बिल्होरे खंदिले** – बिलोरी कांचेचे कंदील.

लावणी नं. १२ हारका – हर्षा, मूळ शब्द हारक म्ह. हर्ष, आनंद. **वटिका** – चाल. **हिकमती** – लबाड. **उपरोधिक** – उपरिआधिक, म्ह. आहे याहून विशेष असें.

लावणी नं. १३ धरी मम कास – कास धरणें, कासेस लागणें म्हणजे आश्रय घेणें. **शब्द घाये होजी** – भीष्म द्रोण त्या शब्दानें म्ह. बोलण्यानें घायाळ झाले. **राख** – ' रास ' पाहिजे. **रास** – ढीग.

लावणी नं. १४ मूळ येणें – बोलावणें येणें. **वंसी** – बनसी, बनसीधर कृष्णासारखा देखणा पुरुष. **रक्षावें पाणी अपलें** – आपली अब्रू, लौकीक जप. **दैव उदवलें** – दुर्दैव उपजलें. **होष** – अवसान.

लावणी नं. १५ चंद्रमौळी – शंकर. **धांडोळा** – डंका, दवंडी, सर्वत्रांना कळण्याकरतां वाद्य वाजवीत केलेली घोषणा. **परिणील** – पाणिग्रहण करील, वरील. **कावडी** – तीर्थयात्रा करीत फिरणारे प्रवासी भिकारी. **जोगी** – योगी, गोसावी, बैरागी. **विंधुन मासुळी** – बाणानें मत्स्यभेद करून. **लाखाजोहरी** – लाखेचें घर पेटवून केलेल्या आगींत. त्या घरांत पांडवाना जाळून मारण्याचा प्रयत्न कौरवांनी केला होता !

लावणी नं. १६ वळणी – गाई वळून नेण्याची कामगिरी. **गवारी**– गौळी, गुराखी. **धाड** – हल्ला, आक्रमण. **येकी** – एकच, एकुता एक. **कृशानी** – शमी वृक्ष (?). **कृशानीचे** – **' वृक्ष शमीचे '** असा तर मूळ पाठ नसावा ? शमी वृक्षावर ठेवलेलीं शस्त्रे काढून अर्जुन कौरवाशीं लढला होता.

लावणी नं. १७ निमित्त आणणें – आरोप घालणे किंवा करणें, आळ घालणें. **वराटपाट करीसपाट** – (?) **हेमाद्रि** – हिमाद्री हिमालयातील. **आनंदवन वारानशी काशी म्हणती सांप्रतकाळ** – वाराणशी काशीचे प्रदेशाला आनंदवन किंवा ' आनंदवन भुवन ' म्हणत. रामदासांनीं जे आनंदवन भूवन म्ह. उल्लेखिलें आहे तो प्रदेश. राजवाड्यांनी त्याचा महाबळेश्वरचा प्रदेश असा अर्थ केला तो चूक आहे असे अलिकडेच प्रा. धोंडांनीं साधार सिद्ध केलें आहे. **पद्म** – दहा हजार लाख, शतकोटी, एकावर बारा पूज्यें असलेली संख्या. **हुडा** – बुरुज.

लावणी नं. १८ जघन्य – लौकिक, प्रसिद्धी. **धनकर** – शोभिवंत, तेजस्वी.

लावणी नं. १९ रवि अस्त – रवि अस्तापासून, सायंकाळपासून. **जारेशी** – जारिणीशी, व्यभिचारिणी स्त्रीशी. **चित्रशाळा लिहिल्या** – चित्रें काढलीं. चित्रशाळा म्ह. चित्रें वेलबुट्टयादिक. **वंचक** – लुच्चा, फसव्या, लबाड.

लावणी नं. २० जोजार – पसारा, व्याप, मोठा खटला. **यामिनी** – रात्र. **कठूकाळ** – वाईट दिवस, अडचणीची स्थिति. **करवतो** – करवतीवर घातल्याप्रमाणें कांपतो. **मुरवती** – भीड, प्रेम, आवड.

लावणी नं. २१ धुनी – नदी--दुसरा अर्थ सर्वांचीं पापे धुणारी, नदीसारखी. **गोवून भासी** – माझेकडून शपथ घेऊन, किंवा मला शपथ घालून. **मूळ जाणें** – बोलावणें येणें किंवा पाठविणें. **वर्जणें** – टाकणें, त्याग करणें. **पळती सर** – चटकन पळून जा, निघून जा. **सवरी** – स्वैरिणी स्त्री, वेश्या. **तूं केलें सहस्त्रवदन** – हज र तोंडे करून करून रडू लागलीस. गंगा समुद्रास मिळताना अनेकशः विभागून सहस्त्र मुखांनीं समुद्रास मिळते त्यास अनुलक्षून. **आपंगणें** – स्वीकारणें.

लावणी नं. २२ एक ऐना – एक–अपूर्व, अद्वितीय. ऐना – आरसा. **गहेना** – गहिना, दागिना. **तुंभा** – १ पूर, २ हत्याराचा दांडा, ज्यांत बसवितात ती जागा. ३ चाकाचा मध्य तो चाकाचा तुंबा. **अचंबा** – आश्चर्य वाटण्यासारखा. **नोक लाऊन** – नखरा, ऐट, नोक झोक करून. **समले**– शेमले. **मुंड** – डोकें, मान, मुंडकें. **मुरकुंडा** – मुरकुंडी वळणें म्हणजे आंग गोळाकरून चिकटून बसणें याला मुरकुंडी वळली असें म्हणतात. म्हणजे कांहीं केल्या धरलेली जागा न सोडणें. **मालाचा हुंडा** – माल, संपत्ति हुंडा, हंडा. **नयनखांडा** – खांडा – तरवार. डोळयाच्या कटाक्षांच्या तरवारी मारतात. **दुंडा** – ‘ धुंडा ’ असा पाठ असावा. धुंडा हणजे धुंडाळा जा, असा पुरुष मिळणें विराळाच आहे. **नवदर** – ‘ नवद्वार ’ असा पाठ असावा. देहाची नवद्वारें प्रसिद्ध आहे. **परादुरजी** – ? **माजमुष्टि** – मुठीत कंबर धरता येईल अशी सुकुमार माज-कंबर. मुष्टी-मूठ. **पैन**– पैज ,आव्हन.

लावणी नं. २३ **अचपळ** – चपळ. **जग ठकणी** – जगाला ठकवणारी, भूल पाडणारी. **इतबार** – विश्वास, भरंवसा. **हाकम** – हकीम. गांवचा मुख्याधिकारी. गांवांतील तंडेबखेडे तोडून शिक्षा सांगण्याचेंहि काम याचें असे. **बदलाम** – दुष्कीर्ती. **वंगाळ** – वाईट. **बाजावाजा** – आरडाओरड, आदळआपट. **गलघट्ट** – गळयाच्या जिवलगासारखी. गळयाला घट्ट लगटण्यासारखी. **विट** – वीट, तिरस्कार, कंटाळा. **जायेजना** – जावयाचा, (आपणापासून जावयाचा) मुलींना हें विशेषण नेहमीं लावतात कारण किती लाडक्या असल्या तरी अखेर परक्या घरी त्या लग्न होऊन जाणारच. **झोळलो** – ? **गावना** – गायका ! (प्रतिस्पर्धी शाहिरास उद्देशून). हे **वर्म उणें उतरी** – या वर्माचें उत्तर दे. (?) **जल्पना** – बढाया.

लावणी नं. २४ **माजामधिं चिवळी** – कंबरेंत बारीक. **कव्हासा** – केव्हां ? केव्हांशी ? **दुर्वासा** – दुर्वास ऋषे ! हा एक कोपिष्ठ शाप देणारा ऋषी होता. **खंती** – हुरहुर.

लावणी नं. २५ **जवानी** – ज्वानी. **त्याविण स्वाधीन** – ? **स्वादिष्ट** – ?

लावणी नं. २६ **ले पोती चांगले** – ले मोती चांगले ? **कदकंबर** – बारीक कमरेची. **उंबर** – उमर. **सुरत** – आकार, ठाणमान. **सवदागर** – व्यापारी. **वशीव वेश्या** – बाजारांत दुकान घालून बसणारी वेश्या. **ही मलयोगाची तऱ्हा** – ' ही कलयुगांची तऱ्हा ' असा शुद्ध पाठ असावा.

लावणी नं. २७ **आलबेली** – सुंदर. **निभासी** – ? **लघु कठिण कांचोळींत गारसी** – गरसी म्ह. स्तन असा अर्थ दिसतो. **झुमका** – झुबका. **अहेरी गहेरी** – ऐरागैरा, अलबल्या गलबल्या, अशक्त, क्षुल्लक. **आनती** – ?

लावणी नं. २८ **जानी** – जवानी, तारुण्य. **गुलेअनार** – डाळिंबीचें फूल. **गुमान** – पर्वा, काळजी. **हाट** – बाजार.

लावणी नं. २९ **फुन्ना** – अलंकार विशेष. **फुंदडा** – फुन्ना, रेशमी गोंड्याचा झुबका.

लावणी नं. ३० **मनफाट** – वैर, विरुद्ध. **निमित्त याचें** – याच्याशी संबंध आहे असा आरोप करून. **निमित्त** – आरोप, संशय. **फुगा** – पोकळ मोती, बिन किंमतीचा खोटा मोती. **भुत्या** – अंबाबाईचा भुत्या. **सूडवाचे** – 'सुमुहूर्त सावधान' इ. म्हणून.

लावणी नं. ३१ **गचशी** – रखेली. **खोरी** – नुकसानांत आलेली.

लावणी नं. ३२ **छडकावी** – ज्यावर रेघा काढलेल्या आहेत असा. **सोगा** – सुरमा डोळ्यांत घालावयाचा. **संकेतावत्** – संकेताप्रमाणें, बेत ठरल्याप्रमाणें. **आच्छादती** – मिटतात.

लावणी नं. ३३ **अठ्ठा** – अठी. **गठ्ठा** – डबोलें. **नष्टाई** – वैर, वैमनस्य.

लावणी नं. ३४ **रूपधरुया** – रूप धारण करणारी अर्थात रूपवान. **दोर** – दागिना विशेष.

लावणी नं. ३६ ताजवातोल – सोनें रूपें मोजण्याच्या काट्याला ताजवा म्हणतात. तो अगदीं बारीक फरकहि किंचित इकडे तिकडे कलून दाखवितो. त्या प्रमाणें अगदीं माफक तितकेंच बोलणें ते ताजवांतोल बोलणें. **कदकंबर** – बारीक कंबर. **सुभावणी** – सुंदर, देखणी. **स्वप्नाची करारी** –?

लावणी नं. ३८ **कांचनावर सारिला मिना** – सोन्याच्या दागिन्यावर केलेले मिन्याचें काम.

लावणी नं. ३९ **ख्वोर** – खोर, नुकसान पावलेली. **कपटमावा** – कपटी, माव – कपट. **थार** – आश्रय.

लावणी नं. ४१ **कटक** – सैन्य, सैन्याची छावणी. **जघन्य** – वाईट. **रंभास्तंभ** – केळीचा सोंठ. **भरअमदानी** – समृद्धि. **कुलकला** – सर्वाधिकारी. **करतृत्व करते** – कर्ते, कर्तृत्ववान.

लावणी नं. ४२ तेजी – घोड्याची एक जात.

लावणी नं. ४३ **भिडसरू** – भिडस्त. **खिरणी** – १ खरबुजाची एक जात. २ रांजणाचें झाड. **भीड** – गर्दी.

लावणी नं. ४४ **श्रीफळासारखे** – बेलफळासारखे. **गोंधळी चाळविद्या** – ? गोंदलेल्या चिन्हाबद्दल कांहीं तरी असावें. शुद्ध पाठ कळत

नाहीं. ' गोंधळी ' या शब्दाचे मूळ ' गोंदली ' असें असावें. हनवटीवर बारीक गोंदलेली अशी ती. **धनकर** – धन्य.

लावणी नं. ४१ येरुयेरासी – परस्पराशी. **जुदाभाव** – वेगळेपणा. **अविंध मोती** – भोक न पडलेलें. असे मोती उत्तम. **बे किंमत** – बेफाम किंमत असलेले अमोल, किंमतीचे. **उगवी गाड** – हे कोडं सोडवून दाखव. **गाड** – कोडं. उगवणें म्ह. सोडवून दाखवणें.

लावणी नं. ४६ वाव – व्यर्थ. **रोजना** – रोदना, शोक. **सकार** – स्वीकार.

लावणी नं. ४७ पायाची रजी – पायाची दासी, पायाच्या माती सारखी.

लावणी नं. ४८ रोखा – पत्र. **अनवा** – अपूर्व, नवीनवी.

लावणी नं. ४९ वाव – ओस. **आज शरिराचा मान होता लहान** – वयांत आले नव्हते. **क्षेत्र अवयव** – योनी. **धरण** – चाल. **राहवू** – राहवून. **शिरा** – उत्कृष्ट. **हारभास** – नेहमीं.

लावणी नं. ५० दरती – धरती, पद्धत, येथें रचना पद्धत. **यादी** – आठवण.

लावणी नं. ५१ विषय तोशानी – विषय सेवनांत तुष्ट करणारी. **तवर** – जोर, तारुण्याचा जोर. **सुमुषा** – एक दागिना विशेष. **होटिका** – ओठ.

लावणी नं. ५२ मंत्र – सल्ला. **धुर** – धुंदी, गर्व.

लावणी नं. ५३ कुपानी – आडवाटेनें. **क्यास** – ' अशात्र असा असावा.

लावणी नं. ५५ मैला – मळा. **कुलपी लखोटा** – लखोट्यांत घातलेला लखोटा. **आदागत** – हावभाव.

लावणी नं. ५७ प्रतक्ष – प्रत्यक्ष. **पंचबाण** – मदन, सुरताची इच्छा. **चित्र विचित्र** – चित्र -- स्वप्न. **बिंदूप्राय चांदणे आखडले** – आकाशभर पसरलेलें चांदणें ओसरून एका बिंदुवत चांदणीसारखे झाले. **भिंगांत** – काचेवर (चित्र काढविलें). **अभ्र जलें चांदण्यांत** – वास्त-

विक ढगामध्यें चांदणी ओळखून काढावी तसें मी प्रियकराला ओळखले असे नायिकेला म्हणावयाचे आहे पण 'चांदण्यांत जसा ढग ओळखावा तसें' अशी उलटापालट कवीने केली आहे! **जाणीतले** – जाणलें, ओळखून काढले.

लावणी नं. ५८ डाव घाव बाण त्यावर – आपला डाव भाव म्ह. हेतू साध्य झाल्यावर. **बागाचि बाग इ०** – बगळ्याचे वाग् व्यापार (वरून बरे) पण मनांतून तो मीनाचा म्हणजे माशाचा वधच इच्छित असतो असा अर्थ असेल? किंवा 'बकाचे वक्र व्यापार इच्छी मीनाचा वध' असा तर मूठ पाठ नसेल? **रुव चोर** – सराईत चोर. **बांड दपर** – ? **लांडगा लोपूनया क्रोधसी** – ? **हिकमती** – युक्त्या. **बेदर्दी** – **वरताळा** – **बितले** – बेतले, ओढवले, अंगावर आले. **निर्मळ होणें** – सर्व लुटलें जाणें. **समक्षा** – समस्या, पेंच, कोडें.

लावणी नं. ५९ बेबहार – भर. **गुजरीचा** – बाजाराचा. **कद** – आकारमान, अंगठाण, आकृति. **शिणगार** – शृंगार. **बिलनी** – रंगेल, इष्की, व्यभिचारी. **ठेला** – बोचकें, संभार. **विज्याची कळी** – पानपट्टी. **धनवटून** – गच्च गर्दी होऊन. **चपळा** – वीज. **फरक होणें** – वाट होणे, वाव सापडणे. **पैस करणें** – दूर सरा दूर सरा असें म्हणून गर्दी दुभंगणें. **फिरत** – सफाईदार टाकलेला तरवारीचा हात, येथें अर्थ तीक्ष्ण नेत्र कटाक्ष. **तऱ्हा लोकांची** – लोकांची लोभाविष्ट अवस्था.

लावणी नं. ६० सुंदर – सुंदरी. **करी रस्ता हा** – रस्ता रहदारीसाठीं मोकळा करून घेते. **खंदिलें** – कंदील. जुन्या भाषेंत खंदिल हा शब्द नपुसकलिंगी बापरीत. जसें 'तें कंदील' **दोडे** – वेलदोडे.

लावणी नं. ६१ नवती – तारुण्य. **हिन केले** – उणें केलें. **सिव्ह** – सिंह, पुरुषसिंह.

लावणी नं. ६२ पर्वत खुषीचा – परवल (परवाना) खुषीचा. खुषी असेल तरच गमन करावे एरवी कोणाही स्त्रीवर जुलूस करता येणार नाहीं अशी राजाज्ञा. **हिरशी** – उद्धट. **वरशी** – वरची. **नष्टाई** –

खोटाई, दुष्टभाव. **लुटुन ब्राह्मणा द्यावी** – ब्राह्मणा लुटवून द्यावी. म्ह. सर्व संपत्ति ब्राह्मणांस अर्पण करून टाकावी.

लावणी नं. ६३ **चक्रविहू** – चक्रव्यूह. **आवंतिला** – बोलावणें पाठवून आणला. **सोळा शक शहाण्णव** – 'शके सोळाशें शहाण्णव' कां 'अनंत घरें फिरून?' **श्रोत्र** – कान. **आवली** – वल्हेबाला. **परतंतू** – ? परतत्त्व ?

लावणी नं. ६४ **लौकिक आणिक शब्द हे सर्वा ठेवि माते** – ? **हळवट** – भिकार हलकी शेतजमीन येथें अर्थ निपुत्रिक, न प्रसवणारी, वांझ. **जुमेदार** – जमेदार, वतनदार देशपांड्या देशमुखासारखा. **लउ** – लेऊं. **आवतून** – आहुती देऊन. ? **श्रोत्रें** – श्रौती लोकांनीं.

लावणी नं. ६५ **सवागी** – टाकणखार, सुहागी. **लाविला** – पाठविला, निरोप दिला.